

कोलकाता कसोटीत ध्रुव जुरेलला संधी

पान ८


# दैनिक महाभूमि

निर्मळ, निकोप, नि:पक्ष

https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com



।। गण गण गणांत बोते ।।
प्रतिक्षा मसाले & ड्रायफ्रूट्स
fssai 21523054003140
। काळा मसाला । मिरची भाजी मसाला । नॉन व्हेज मसाला । व्हेज मसाला
। इडली प्रिमीक्स । डोसा प्रिमीक्स । थिट्टी प्रिमीक्स । ढोकळा प्रिमीक्स
। अप्पे प्रिमीक्स । शेंगदाना लाडू । ड्रायफ्रूट लाडू । डिंक लाडू । जवस लाडू
। मेथी लाडू । तसेच सर्व प्रकारच्या चटण्या मिळेल.
पत्ता:- सर्क्युलर रोड, चिंचोले चौक, अदिती अर्बन समोर, अक्षरा गिफ्ट शॉपी जवळ, शॉप. नं. 2 बुलडाणा
मो. 7666232414


विनम्र अभिवादन



देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांची जयंती आज बालदिन म्हणून साजरी केली जाते.

मतदारांची नवी आकडेवारी जाहीर ▸ सात महिन्यांत १४ लाखाची वाढ

# राज्याची मतदारसंख्या ९ कोटी ८४ लाखांवर

**मुंबई, वृत्तसंस्था :**

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी राज्य निवडणूक आयोगाने मतदारांची अद्ययावत यादी जाहीर केली आहे. आयोगाने १ जुलै २०२५ रोजीची अंतिम मतदार यादी आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केली असून, या नव्या यादीप्रमाणे राज्यातील एकूण मतदारसंख्या ९ कोटी ८४ लाख ९६ हजार ६२६ इतकी झाली आहे. मागील विधानसभा निवडणुकीच्या वेळी ही संख्या ९ कोटी ७० लाख २५ हजार ११९ इतकी होती. त्यामुळे केवळ सात महिन्यांत जवळपास १४.७ लाख नव्या मतदारांची वाढ झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

गेल्या काही महिन्यांत मतदार नोंदणीसाठी नागरिकांचा उत्साह वाढलेला दिसतो. या कालावधीत १८ लाख ८० हजार ५५३ नव्या मतदारांची नोंदणी झाली आहे, तर ४ लाख ९ हजार ४६ मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत.



### राज्याचा मतदार वर्ग अधिक सजग आणि सक्रिय

■ राज्यातील मतदारसंख्या वाढीमुळे आणि निवडणूक आयोगाच्या या नव्या निर्णयांमुळे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका अधिक रोचक ठरण्याची चिन्हे आहेत. नव्या मतदारांचा कल, स्थानिक पातळीवरील राजकीय समीकरणे, तसेच चिन्हांच्या स्पष्टतेमुळे मतदारांमध्ये निर्माण होणारा गोंधळ, या सर्व घटकांमुळे राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे. आयोगाने दिलेल्या आकडेवारीनुसार, राज्याचा मतदार वर्ग अधिक सजग आणि सक्रिय होत आहे, आणि त्याचा थेट परिणाम येणाऱ्या निवडणूक निकालांवर दिसून येईल, अशी अपेक्षा आहे.

राज्यातील मतदारसंख्या वाढीचा हा कल आगामी स्थानिक निवडणुकांवर परिणाम करणारा ठरू शकतो, असा अंदाज राजकीय विश्लेषकांनी वर्तवला आहे. विशेष म्हणजे तरुण मतदार आणि प्रथमच मतदानाचा अधिकार मिळवणाऱ्या युवकांची संख्या या वर्षी लक्षणीयरीत्या वाढली असून, निवडणुकीतील समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### नव्या मतदारांची नोंदणी सर्वाधिक ठाणे जिल्ह्यात..

■ राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये नव्या मतदारांची नोंदणी सर्वाधिक ठाणे जिल्ह्यात झाली आहे. ठाणे जिल्ह्यात २ लाख ७१ हजार ६६६ नव्या मतदारांनी अर्ज दाखल केले आहेत. त्याच वेळी, या जिल्ह्यात ४५ हजार ८०० मतदारांची नावे वगळण्यात आली आहेत. पुणे जिल्ह्यात १ लाख ८२ हजार ४९० नवमतदारांची नोंदणी, तर मुंबई उपनगरात ९५ हजार ६३० नव्या मतदारांची भर पडली आहे. मुंबई उपनगरातील ४४ हजार मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली आहेत. ग्रामीण भागात मात्र मतदार नोंदणीचा वेग तुलनेने मंदावलेला दिसतो.



# पुण्यात नवले पुलावर भीषण अपघात; ८ जणांचा मृत्यू

**पुणे, वृत्तसंस्था :**

मुंबई बंगळुरू महामार्गावर नवले पुल परिसरात गुरूवारीसंध्याकाळी भीषण अपघात झाला. दोन कंटेनर आणि कारला लागलेल्या आगीत आठ जणांचा होरपळून मृत्यू झाला असून मृतांमध्ये कारमधील चौघांचा समावेश आहे. कंटेनरचा ब्रेक निकामी झाल्यामुळे हा अपघात झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

शहरातील ब्लॅकस्पॉट पैकी एक असलेल्या नवले पुलावर गावगाडा हॉटेलसमोर साताऱ्याहून पुण्याच्या दिशेने येणाऱ्या मार्गिकेवर संध्याकाळी अपघात झाला. दोन कंटेनरच्या मध्ये अडकलेल्या स्विफ्ट कारने पेट घेतल्यानंतर त्यात चार जण होरपळून व इतर वाहनांमधील चार जणांचा होरपळून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे. या अपघातात १५ ते २० जण जखमी झाल्याची प्राथमिक माहिती अग्निशमन दलाकडून देण्यात आली आहे.

संध्याकाळी सहा वाजण्याच्या सुमारास नियंत्रण सुटलेल्या कंटेनरने भूमकर चौक ते नवले पुल परिसरातील वाहनांना उडविले. या अपघातात दोन कंटेनरच्या मधोमध एक स्विफ्ट कार चेपली गेल्याने कारने पेट घेतला. यामध्ये कारमधील चौघांचा होरपळून मृत्यू झाला. कार जळून खाक झाल्याने गाडीत नेमके कोण होते ही ओळख पटविणे कठीण जात होते. कारमधून चालक, पती-पत्नी आणि त्यांचे बाळ असे चौघे जण प्रवास करत होते, अशी प्राथमिक माहिती आहे.

### कंटेनरची १० ते १५ वाहनांना धडक

■ भरधाव कंटेनरने भूमकर चौक ते नवले ब्रीज अशा सुमारे एक किलोमीटरपर्यंत १० ते १५ वाहनांना धडक दिली. यात १५ ते २० जण जखमी झाले. जळालेल्या कारची अवस्था बघून कारमधील प्रवाशांची काय अवस्था झाली असेल या विचारानेच प्रत्यक्षदर्शींच्या अंगावर काटा आला होता.

## न्यूज ब्रीफ

### भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्या अडचणीत वाढ

**पुणे :** भाजप नेत्या चित्रा वाघ यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. शिरूर कासार न्यायालयाने चित्रा वाघ यांच्या विरोधात वॉरंट जारी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख यांनी दाखल केलेल्या अब्रूनुकसानीच्या प्रकरणात न्यायालयाने हे वॉरंट जारी केले असल्याची माहिती मेहबूब शेख यांचे वकील अंकुश कांबळे यांनी दिली आहे.

चित्रा वाघ यांनी मेहबूब शेख यांच्याबाबत बदनामीकारक वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### अनेक राज्यांमध्ये थंडीची लाट

**नवी दिल्ली :** मध्य प्रदेश, राजस्थान, हरियाणा, दिल्ली आणि पंजाबसह अनेक राज्यांमध्ये थंडीची लाट पसरली आहे. राजस्थानमधील एकोणीस आणि मध्य प्रदेशातील आठ शहरांमध्ये बुधवारी किमान तापमान १० अंश सेल्सिअसपेक्षा कमी नोंदवले गेले. भोपाळमध्ये सलग पाचव्या दिवशी ८ अंश सेल्सिअस इतके किमान तापमान नोंदवले गेले. हरियाणातील सात शहरांमध्ये तापमान १० अंशांपेक्षा कमी झाले. नारनौलमध्ये ७.७ अंश इतके कमी तापमान नोंदवले गेले.

## 'आम्ही अशी शिक्षा देणार की जग बघत बसेल'

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

लाल किल्ला परिसरात झालेल्या स्फोट प्रकरणाचा तपास सुरू आहे. दरम्यान, आता केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी गंभीर इशारा दिला आहे. या स्फोटासाठी जबाबदार असलेल्यांना इतकी कठोर शिक्षा दिली जाईल की संपूर्ण जग त्यांना पाहेल, असा इशारा शाह यांनी दिला.

गुजरातमधील मोतीभाई चौधरी सागर सैनिक शाळेत व्हिडीओ



कॉन्फरन्सिंगद्वारे एका कार्यक्रमाला संबोधित करताना अमित शहा यांनी हे वक्तव्य केले. अशा घटनांविरुद्ध शून्य सहनशीलतेचे धोरण अवलंबले जाईल यावर त्यांनी भर दिला.

दिल्ली बॉम्बस्फोटाचा संबंध फरिदाबादमध्ये नुकत्याच उघड झालेल्या दहशतवादी नेटवर्कशी आहे. संशयित अनेक व्यक्तींना आधीच अटक करण्यात आली आहे. तपास संस्था फरार असलेल्यांचा शोध घेत आहेत. डॉ. फारुकने हरियाणातील फरीदाबाद येथील अल-फलाह विद्यापीठातून एमबीबीएस आणि एमडी पदवी प्राप्त केली होती. तपास यंत्रणांना संशय आहे की, या विद्यापीठातील काही इतर डॉक्टरांप्रमाणेच डॉ. फारुकचेही दहशतवादी संघटनांशी संबंध असू शकतात.

## धनंजय मुंडे ज्या फांदीवर बसतात तीच फांदी तोडतात : जरांगे

नार्को टेस्ट करण्याचाही पुनरुच्चार..

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी गुरूवारी पुन्हा एकदा सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर निशाणा साधला. धनंजय मुंडे हे शेखचिल्ली आहेत. ते ज्या फांदीवर बसतात, तीच फांदी तोडतात. त्यांनी नार्को टेस्टच्या मागणीवरून मागे हटू नये. या चाचणीतून तरी त्यांनी महादेव मुंडे यांचे काय केले, बापू आंधळेंचे काय केले, गित्तेचे काय केले व संतोष देशमुख प्रकरणात काय केले हे समोर येईल. नार्टो टेस्टमधून त्यांनी अंधारात किती चाली रचल्या हे ही सत्य समोर येईल, असे ते म्हणाले.

मनोज जरांगे यांनी गुरूवारी सकाळी पत्रकारांशी संवाद साधला. त्यात त्यांनी त्यांच्या घातपाताचा कथित कट रचल्याप्रकरणी धनंजय मुंडे यांच्यावर सडकून टीका केली. ते म्हणाले, मी लपत नाही. मला लपता पण येत नाही. राजकारणाचा मला नादच नाही. पण समाजाच्या



जिवावर उठल्यानंतर मी दम खात नाही. तुम्ही तुमचे राजकारण करा. मोठे व्हा. मराठ्यांवर अन्याय का करता? तुम्ही अन्याय केला. मग मी सोडणार नाही. तुम्ही कितीही जहागीरदार असला तरी मी सोडणार नाही.

### संपूर्ण मराठवाडा आरक्षणात जाणार

■ मराठवाड्यात काही ठिकाणी कुणबी प्रमाणपत्र जारी करण्यात अडचणी येत असल्याची बाब पत्रकारांनी यावेळी जरांगेंच्या निदर्शनास आणून दिली. त्यावर ते म्हणाले, यात तथ्य आहे. या प्रकरणी अनेक तक्रारी येत आहेत. नोंदी असूनही प्रमाणपत्र दिले जात नाहीत. संपूर्ण मराठवाडा आरक्षणात जाणार यात शंका नाही, असे ते म्हणाले.

## महायुतीत पहिला आघात राष्ट्रवादीवर होईल : विजय वडेट्टीवार

**मुंबई, वृत्तसंस्था :**

सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर भाजपकडून सत्तेतून बाहेर पडण्याची वेळ आणली जाईल, महायुतीत पहिला आघात राष्ट्रवादीवर होईल, असा दावा काँग्रेसचे नेते आमदार विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार अंबादास दानवे यांनी पार्थ पवार भूखंड घोटाळ्यात अजित पवारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सरकारबाहेर पडण्याचा इशारा दिल्याचा दावा केला आहे. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार



यांनी वरील दावा केला आहे. ते म्हणाले, पुण्यातील जमीन घोटाळ्यात पार्थ पवार जबाबदार आहेत. निवडणुकीच्या तोंडावर हा घोटाळा बाहेर काढून भाजपने या प्रकरणी अजित पवार व त्यांच्या पक्षाची कोंडी केली आहे. या माध्यमातून आगामी निवडणुकीत पुणे, पिंपरी चिंचवड, सातारा, सांगली व मराठवाड्यातील काही जिल्ह्यांत राष्ट्रवादी काँग्रेसने भाजपपुरक भूमिका घ्यावी असा डाव आहे.

# पोक्सो प्रकरण सुरूच ठेवण्याचा आदेश

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री येडियुरप्पांना हायकोर्टाचा धक्का..

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांना लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण प्रकरणी गुरुवारी मोठा धक्का बसला. कर्नाटक उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाच्या (कनिष्ठ न्यायालय) आदेशाला कायम ठेवले असून, येडियुरप्पा यांच्यावर खटला चालवण्यास आणि त्यांना समन्स बजावण्यास सहमती दर्शवली आहे.

या खटल्याची सुनावणी पुढे चालू ठेवण्याची परवानगी देताना, उच्च न्यायालयाने ट्रायल कोर्टाला निर्देश दिले आहेत की, 'येडियुरप्पा यांची व्यक्तिशः उपस्थिती आवश्यक असल्याशिवाय त्यावर आग्रह धरू नये. आवश्यक नसताना त्यांच्या वतीने दाखल होणाऱ्या कोणत्याही सवलत अर्जाचा विचार



करावा. केवळ कार्यवाहीसाठी त्यांची उपस्थिती अत्यावश्यक असेल, तेव्हाच त्यांना हजर राहण्याची सक्ती करावी.'

कर्नाटक उच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ट्रायल कोर्टाने या खटल्याचा निर्णय केवळ सुनावणीदरम्यान सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारावर घ्यावा आणि याच याचिकांवरील उच्च न्यायालयाच्या निरीक्षणांचा त्यावर कोणताही प्रभाव पडू नये. याचिकाकर्त्यांना दोषमुक्तीच्या याचिकेसह सर्व परवानगीयोग्य अर्ज कनिष्ठ न्यायालयासमोर सादर करण्याची मुभा असल्याचेही आहे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

### काय आहे प्रकरण ?

■ २ फेब्रुवारी २०२४ रोजी मागील लैंगिक अत्याचाराच्या आणि इतर मुद्द्यांवर न्याय मिळवून देण्यासाठी महिला आणि तिची मुलगी कर्नाटकच्या माजी मुख्यमंत्र्यांची भेट घेण्यासाठी गेल्या होत्या. यावेळी तक्रार ऐकताना येडियुरप्पा यांनी मुलीचा विनयभंग केला, असा आरोप मुलीच्या आईने केला होता. याप्रकरणी बीएस येडियुरप्पा यांच्यावर गुन्हाही दाखल झाला. यानंतर काही महिन्यांनी तक्रार करणाऱ्या आईचा आरोग्याच्या समस्यांमुळे मृत्यू झाला.

## एमआयएम मुंबई महापालिकेसाठी ५० जागा लढवणार : फारूख शाब्दी

**मुंबई, वृत्तसंस्था :**

एमआयएम मुंबईचे अध्यक्ष फारूख मक्बुल शाब्दी यांनी दिलेल्या माहितीनुसार, एमआयएम कमीत कमी ५० जागांवर आपले उमेदवार देणार आहे. ते म्हणाले, मुंबई महापालिकेसाठी नुकतेच आरक्षण सोडत जाहीर झाली. एससी, एसटी, ओबीसी पवर्गांसाठी काही प्रभाग राखीव ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे गेल्या अनेक दिवसांपासून तयारी करत असलेल्या आणि निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या आमच्या कार्यकर्त्यांची निराशा झाली आहे. तरीदेखील आम्ही ही निवडणूक लढवणार आहोत. कमीत कमी ५० जगा लढवण्याची आमची तयारी आहे, असे हाजी फारुख मक्बुल शाब्दी यांनी सांगितले.

पुढे बोलताना फारुख मक्बुल शाब्दी म्हणाले, गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाचे काम करणाऱ्या आमच्या कार्यकर्त्यांनाच संधी देण्यास आमचे प्राधान्य असेल. निवडणुका लक्षात घेऊन पक्षात आलेल्यांचा आम्ही नंतर विचार करू. तसेच एमआयएम ही भाजपची बी टीम म्हटले जाते, यावर बोलताना ते म्हणाले, आमच्यावरील भाजपची बी टीम हा आरोप काही नवा नाही. परंतु, आम्ही आमच्या ताकदीवर ही निवडणूक लढवणार आहोत, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

# तुतारी सदृश पिपाणी चिन्ह वगळले

शरद पवार गटाला निवडणूक आयोगाचा दिलासा..

**मुंबई, वृत्तसंस्था :**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुतारी वाजवणारा माणूस या चिन्हाशी साधर्म्य असलेल्या पिपाणी (ट्रम्पेट) चिन्हामुळे मोठा फटका बसल्याचा दावा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला शरद पवार गटाला अखेर निवडणूक आयोगाने दिलासा दिला आहे. आयोगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकांसाठी आपल्या मुक्त चिन्हांच्या यादीतून पिपाणी हे चिन्ह वगळले आहे. या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने निवडणूक आयोगाचे आभार मानले आहेत.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत तुतारी (राष्ट्रवादी) आणि पिपाणी (अपक्ष) या दोन्ही चिन्हांमध्ये नावाचे व दर्शनाचे साधर्म्य असल्याने मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या नामसाधर्म्यामुळे पक्षाला मिळणारी मते अपक्ष उमेदवारांना मिळाली. तसेच विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे ९ उमेदवार याच चिन्हामुळे पडल्याचा दावा पक्षाने




केला होता.

लोकसभा निवडणुकीनंतर शरद पवार गटाकडून पिपाणी हे चिन्ह निवडणुकीच्या चिन्हांच्या यादीतून त्वरित वगळण्याची मागणी वारंवार करण्यात येत होती. निवडणूक आयोगाने अखेर राष्ट्रवादीची मागणी मान्य करत आपल्या १९४ मुक्त चिन्हांच्या यादीतून पिपाणी (ट्रम्पेट) हे चिन्ह गोठवले आहे. या निर्णयामुळे राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाला मोठा दिलासा मिळाला असून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदारांचा संभ्रम टळणार आहे.

सिंहस्थ कामाचे विधिवत पूजा करून भूमिपूजन..

# नाशिकचा आध्यात्मिक वारसा अधिक तेजस्वी होईल : मुख्यमंत्री

**नाशिक, वृत्तसंस्था :**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधिवत पूजा करून सिंहस्थ कामाचे भूमिपूजन केले. यावेळी आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरात पहिल्या टप्प्यातील ४४ कामांच्या एकूण ५,६५७.८९ कोटींच्या विकासकामांचे भूमिपूजन करण्यात आले. या विकासकामांमुळे नाशिकचा आध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक तेजस्वी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

केंद्र सरकारच्या भांडवल गुंतवणूकीसाठी राज्यांना विशेष सहाय्य योजनेअंतर्गत ९९.१४



कोटी खर्चाच्या रामकाल पथ प्रकल्पाची पायाभरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिक येथे करण्यात आली. रामकुंड परिसरात झालेल्या या समारंभाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे आणि क्रीडा मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे, यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रकल्पाच्या संकल्पना आराखड्याचा आणि मॉडेलचा आढावा घेतला. रामकाल पथ उपक्रम रामकुंड मार्गावरील वारसा वास्तूंचे पुनरुज्जीवन आणि जतन करणे, दर्शनी भाग पुनर्संचयित करणे आणि पर्यटक आणि यात्रेकरूंसाठी पायाभूत सुविधा वाढवणे यावर लक्ष केंद्रित करेल.

या प्रकल्पाचे उद्दिष्ट रामकुंड, सीता गुफा, काळाराम मंदिर, राम-लक्ष्मण गुफा आणि इतर प्राचीन मंदिरे यासारख्या स्थळांचे आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित करणे आहे. रामकाल पथ प्रकल्पाच्या भूमिपूजनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काळाराम मंदिराला भेट देत दर्शन घेतले. यावेळी मंदिराच्या विश्वस्तांतर्फे मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

### केंद्राच्या पाठिंब्याने उभारलेला रामकाल पथ प्रकल्प

■ आगामी २०२७ च्या नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या तयारीसाठी, सरकारने नाशिकचा सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा जगासमोर आणण्यासाठी मोठ्या प्रमाणात विकास कामे हाती घेतली आहेत. केंद्र सरकारच्या पाठिंब्याने उभारलेला रामकाल पथ प्रकल्प या दिशेने एक मोठे पाऊल आहे. गोदावरी नदीच्या पवित्र तीरावर भेट देणाऱ्या भाविकांना ते अधिक समृद्ध आणि संस्मरणीय अनुभव देईल.

### १५ दिवसांत रुग्ण नोंदणीची १० नवीन केंद्रे उभारण्याचे अधिकाऱ्यांचे आश्वासन

# केईएममध्ये खासगी एमआरआय साठी आता सरकारी दर

**मुंबई / वृत्तसंस्था**

केईएम रुग्णालयातील रुग्णांना खासगी केंद्रात एमआरआय चाचणी घेण्यासाठी आता महापालिकेच्या दरानेच शुल्क आकारले जाणार असून, येत्या सात दिवसांत त्यासाठी निविदा काढल्या जाणार आहेत. रुग्णालयातील नादुरुस्त एमआरआय यंत्र आणि सहा महिन्यांपर्यंतच्या प्रतीक्षा यादीमुळे होणारी रुग्णांची गैरसोय दूर करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मुंबईचे सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या पाहणी दौऱ्यानंतर झालेल्या आढावा बैठकीत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी येत्या १५ दिवसांत रुग्णनोंदणीची १० नवीन केंद्रे उभारण्याचे आणि पुढील दोन वर्षांचा औषधसाठा तयार ठेवण्याचे आश्वासन दिले.

केईएम रुग्णालयातील अपुऱ्या सुविधा, खासगी चाचण्यांमुळे रुग्णांची आर्थिक लूट आणि लांबलचक रांगा, याबाबत मंत्री लोढा यांनी डीन डॉ. संगीता रावत यांना जाब विचारला होता. त्यानंतर पालिका मुख्यालयात लोढा आणि मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार अमित साटम यांच्या उपस्थितीत संयुक्त आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त बिपीन शर्मा, उपायुक्त शरद उघडे, वैद्यकीय संचालक डॉ. नीलम अंद्राडे, अधिष्ठाता डॉ. संगीता रावत, भाजप दक्षिण मुंबई अध्यक्षा शलाका साळवी आणि पदाधिकारी सतीश तिवारी उपस्थित होते.



बैठकीत रुग्णांच्या तक्रारींवर सविस्तर चर्चा करण्यात आली. एमआरआय यंत्र दुरुस्त होईपर्यंत खासगी केंद्रांत पाठवले जाणारे रुग्ण महापालिकेच्या दरानेच चाचणी करतील, अशी सूचना लोढा यांनी केली. त्यानुसार निविदा प्रक्रिया सुरू होईल, अशी माहिती साटम यांनी दिली. रुग्णनोंदणीसाठी १० नवीन केंद्रे उभारली जाणार असून, त्यामुळे रुग्णांचा वेळ आणि पैसा वाचेल, असेही ते म्हणाले.

दरम्यान, गेल्या काही दिवसांत कूपर रुग्णालयात पूर्ण वेळ अधिष्ठाता नसल्याने तिथे अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याचा मुद्दाही या बैठकीत चर्चिला गेला.

#### रुग्णांच्या अडचणी सोडवण्यासाठी दक्षता समिती

पुढील दोन वर्षे पुरेल एवढा औषधसाठा तत्काळ उपलब्ध करण्याचे निर्देश लोढा आणि साटम यांनी अधिकाऱ्यांना दिले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लवकरच याबाबत कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. रुग्णांच्या अडचणी सोडवून त्यांना सुविधा देण्याकरिता केईएममध्ये मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वात दक्षता समिती स्थापन करण्यात येणार असून, यात नागरिकांचा ही समावेश करण्यात येणार असल्याचे या बैठकीत ठरवण्यात आले.

## रुपाली ठोंबरे यांनी पक्षाकडेच मागितला खुलासा

**पुणे :** काही दिवसांपूर्वी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणावर असंवेदनशील वक्तव्य केले होते. यावरून अजित पवार गटाच्या प्रवक्त्या रुपाली पाटील ठोंबरे यांनी रुपाली चाकणकरांवर हल्लाबोल केला होता. दरम्यान पक्षाकडून रुपाली ठोंबरे पाटील यांना पत्र पाठवून खुलासा मागितला होता. पक्षाकडून आलेल्या पत्राला उत्तर देताना रूपाली ठोंबरे यांनी पक्षालाच सवाल विचारला आहे. मी केलेले नेमके कोणते वक्तव्य पक्षाची शिस्तभंग करणारे आहे, याची माहिती मला द्यावी, अशी मागणी रुपाली ठोंबरे यांनी पक्षाकडे केली आहे. रुपाली चाकणकर यांनी जे वक्तव्य केले होते. त्यानंतर पक्षाला देखील रोषाला सामोरे जावे लाले होते. फलटण डॉक्टर आत्महत्या प्रकरणी अजित पवारांनी देखील रूपाली चाकणकर यांच्या विधानाचे समर्थन केले नव्हते. अशात अजित पवारांची बाजू मांडणे हे प्रवक्त्याचे काम होते आणि तेच मी केले, असे रुपाली ठोंबरे यांनी पत्रात म्हटले आहे.

# मेळघाटात कुपोषणामुळे सहा महिन्यांत ६५ बालकांचा मृत्यू

**मुंबई / वृत्तसंस्था**

एकट्या मेळघाटात कुपोषणामुळे गेल्या सहा महिन्यांत ६५ बालकांचा मृत्यू होणे ही अतिशय गंभीर बाब असल्याचे मत व्यक्त करीत हायकोर्टाने आपली तीव्र नाराजी व्यक्त केली. तसेच महाराष्ट्रातील दुर्गम भागात होणाऱ्या बालमृत्यूंबाबत मुंबई उच्च न्यायालयाने गंभीर चिंता व्यक्त करत राज्य सरकारची चांगलीच खरडपट्टी काढली आहे.

कुपोषणामुळे होणारे बालमृत्यू हे अत्यंत भयंकर असून, सरकारच्या अकार्यक्षमतेमुळे एकाच भागात गेल्या सहा महिन्यांत दरमहा ११ बालकांचा बळी गेला. यावरून या गंभीर समस्येकडे पाहण्याचा राज्य सरकारचा दृष्टीकोन अत्यंत बेजबाबदार असल्याचे स्पष्ट होते. अशा शब्दांत फटकारत हायकोर्टाने याप्रकरणी सार्वजनिक आरोग्य विभाग, आदिवासी विकास, महिला आणि बाल कल्याण तसेच वित्त विभागाच्या प्रधान सचिवांना



२४ नोव्हेंबरच्या पुढील सुनावणीला कोर्टापुढे हजर राहण्याचे आदेश जारी केले आहेत.

जिल्हाधिकाऱ्यांकडून स्थानिक पातळीवर आणि नागरिकांशी संपर्क साधला जात नाही. तसे केले तरच समस्यांवर तोडगा काढणे शक्य होईल, अशा शब्दांत याचिकाकर्त्यांनी हायकोर्टाकडे तक्रार केली. वर्ष २००६ पासून हायकोर्ट या मुद्यावर नियमितपणे आदेश देत आले आहे, परंतु सरकार कागदावर सर्वकाही व्यवस्थित असल्याचा दावा करत आहे. मात्र मृत्यूची आकडेवारी पाहता प्रत्यक्षात वास्तव वेगळेच असल्याचे यावेळी हायकोर्टाने अधोरेखित केले.

# भटक्या कुत्र्यांना बसविण्यात येणार मायक्रोचिप

**पुणे / वृत्तसंस्था**

पुण्यातील भटक्या कुत्र्यांची संख्या अडीच लाखांहून अधिक आहे. या कुत्र्यांना रेबीजमुक्त करण्यासाठी आणि त्यांची संख्या नियंत्रणात ठेवण्यासाठी आता महापालिकेने मोठे पाऊल उचलले आहे. महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून कुत्र्यांना मायक्रोचिप बसविण्यात येणार आहेत. राज्यातील हा पहिलाच पथदर्शी प्रकल्प असून, याची सुरुवात या महिन्यापासून होत आहे. याबाबतची अधिक माहिती मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे यांनी दिली.

महापालिकेच्या मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका फुंडे म्हणाल्या की, राज्यात प्रथमच अशा प्रकारचा प्रयोग करण्यात येत आहे. एका खासगी कंपनीकडून या चिप मोफत मिळाल्या आहेत. या चिप कुत्र्यांच्या खांद्याच्या





भागात इंजेक्शनद्वारे टोचल्या जाणार आहेत. या चिपमध्ये आरएफआयडी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. या मायक्रोचिपला १५ अंकी क्रमांक असेल आणि तो कुत्र्याला मिळेल.

दरम्यान, कर्मचारी स्कॅनरच्या साहाय्याने कुत्र्याचा खांदा स्कॅन करतील. तसेच या क्रमांकाच्या आधारे त्याची सर्व माहिती मिळवतील. सुरुवातीच्या टप्प्यात सहाशे कुत्र्यांना मायक्रोचिप लावण्याचे नियोजन करण्यात आले असून, याची सुरुवात या महिन्यापासून होत आहे. गुजरात आणि राजस्थानमध्ये या प्रयोगाचा चांगला परिणाम दिसून आला आहे.

पुण्यातील भटक्या कुत्र्यांची गणना महापालिकेने मे २०२३ मध्ये केली होती. त्यावेळी शहरात १ लाख ७९ हजार ९४० कुत्रे आढळले होते. त्याआधी २०१८ मध्ये ही संख्या ३ लाख १५ हजार होती. त्यात पाच वर्षांत मोठी घट झाल्याचे समोर आले होते. त्यानंतर महापालिकेत ३४ गावे समाविष्ट झाल्याने या गावांतील भटक्या कुत्र्यांची त्यात भर पडली. त्यामुळे भटक्या कुत्र्यांची संख्या सुमारे अडीच लाखांवर पोहोचली आहे.

# माजी आमदार शिरीषकुमार यांचा भाजपमध्ये प्रवेश

**नाशिक / वृत्तसंस्था**

जिल्ह्यातील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार शिरीषकुमार कोतवाल यांनी अखेर भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. गुरुवारी नाशिक येथील वसंत स्मृती कार्यालयात झालेल्या औपचारिक कार्यक्रमात जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत कोतवाल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांच्या सोबत माजी उपमहापौर गुरुमित बग्गा, माजी नगरसेविका नंदिनी बोडके, युवा नेते नरेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे गौरव गोवर्धने तसेच शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रसंगी आमदार राहुल आहेर, आमदार सीमा हिरे, आमदार राहुल ढिकले आणि भाजपचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

मी कोणत्याही स्वार्थासाठी किंवा पदाच्या अपेक्षेने पक्षात आलेलो नाही.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आणि देशाच्या विकासासाठी योगदान देण्यासाठी मी हा निर्णय घेतला आहे. काँग्रेसमध्ये गेल्या काही वर्षांपासून नाराजी होती. कार्यकर्त्यांच्या भावना दाबल्या जात होत्या. ती नाराजी दिवसेंदिवस वाढत गेली आणि अखेर भाजपमध्ये येण्याचा निर्णय घेतला. असे कोतवाल यांनी यावेळी बोलतांना सांगितले.

## पाककला



**– रुपाली गायकवाड**
सुप्रसिद्ध कुक तथा सहाय्यक कृषी अधिकारी,
बुलढाणा मो. ९४२२९४३६०५ (वेळ: सायं. ७ ते ९)

### ड्रॅगन फ्रुट हलवा

**साहित्य :-** एक ड्रॅगन फ्रुट, ड्रायफ्रूट कत्रण तीन चमचे, तूप चार चमचे, बारीक रवा पाव वाटी, बेसन दोन चमचे, साखर अर्धी वाटी. एक चमचा वेलची पूड.

**कृती :-** सर्वप्रथम ड्रॅगन फ्रुट ची साल काढून त्याचा गर मिक्सरच्या भांड्यात घाला व त्याचा पल्प तयार करा, आता एका कढईमध्ये तूप घाला सर्वप्रथम आवडीनुसार ड्रायफ्रूट घेऊन त्याला हलकसं तळून बाजूला काढून घ्या आता त्याच कढईमध्ये रवा घाला आणि गुलाबीसर रंगावर भाजून घ्या रवा भाजत आला की बेसन सुद्धा सोबत भाजून घ्या आता लगेच यामध्ये ड्रॅगन फ्रुट चा पल्प घाला व मागोमाग साखर घालून एकजीव करा सर्व शेवटी



वेलची पूड घाला आणि तळलेले ड्रायफ्रूट घाला गरजेनुसार तूप सुद्धा घाला ड्रॅगन फ्रुट च्या नैसर्गिक गुलाबी रंगामुळे हा हलवा दिसायला जेवढा सुरेख दिसतो तितकाच खायला टेस्टी व पौष्टिक आहे नक्की करून बघा.

**वरील पाककृतीचे व्हिडीओ Rupalis Food Culture या यूट्यूब चॅनलवर पाहू शकता.**




### राशीभविष्य

- **मेष :** महत्त्वाची कामं हातात घ्यायला हवी. आर्थिक उलाढालीत वाढ होईल. अपेक्षापूर्तीचं समाधान लाभेल.
- **वृषभ :** घेतलेल्या निर्णयावर ठाम रहा. कौटुंबिक बाबतीत अनपेक्षित घटना संभवतात. पुरेशी काळजी घ्या.
- **मिथुन :** वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. अनुभवींचं मार्गदर्शन कामी येईल. गेलेल्या संधी पुन्हा लाभतील.
- **कर्क :** कार्यक्षेत्रात छोट्या–मोठ्या अडचणी येतील. दीर्घकालीन गुंतवणूक लाभदायक ठरेल. चिंता नसावी.
- **सिंह :** आर्थिक स्थैर्य वाढीस लागेल. सत्कर्माचं उत्तम फळ प्राप्त होईल. जुनी येणी सहज वसूल होतील.
- **कन्या :** आर्थिक आमिषांना बळी पडू नका. मनाविरूध्द घटना संभवतात. घरगुती वाद वेळीच टाळावेत.
- **तूळ :** आर्थिक आवक समाधानकारक राहील. उत्साहानं कार्यरत रहाल. खाण्या–पिण्यावर नियंत्रण ठेवा.
- **वृश्चिक :** तडजोडीचं धोरण हिताचं ठरेल. नोकरी–व्यवसायात स्पर्धा वाढेल. अनावश्यक खर्च कमी करावा.
- **धनु :** आर्थिक नियोजन अचूक व्हावं. थोरामोठ्यांची मर्जी संपादन कराल. कला–गुणांचा विकास होईल.
- **मकर :** सरकारी प्रलंबित कामं मार्गी लागतील. वैवाहिक जीवनात सुसंवाद ठेवावा. प्रवासाचे योग आहेत.
- **कुंभ :** कार्यक्षेत्रात प्रगती होईल. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. आर्थिक आवक उत्तम राहणार आहे.
- **मीन :** आर्थिक बाबतीत चढ–उतार होतील. कठोर परिश्रमातून यश मिळवू शकाल. बाकी चिंता नसावी.

### १४ नोव्हेंबर

दिनविशेष

**राष्ट्रीय बाल दिन, जागतिक मधुमेह दिन**

**१८८९** : भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांचा जन्मदिवस.
**१९२४** : प्रख्यात कथकनर्तिका रोहिणी भाटे यांचा जन्म.
**१९४२** : आसामी साहित्यिक, कवयित्री, संपादिका इंदिरा गोस्वामी यांचा जन्म.
**१९७१** : 'मरीनर–९' हे अंतराळयान मंगळाच्या कक्षेत पोहोचलं.
**२०१३** : वानखेडे स्टेडियमवर सचिन तेंडुलकरला हृद्य निरोप. सचिनचा कसोटी क्रिकेटला निरोप. सचिनवरील टपाल तिकीटाचं अनावरण.

### आरोग्यमंत्र — जेवण न केल्याचे दुष्परिणाम

खूप काम आहे, असं म्हणत अनेकजण जेवण टाळतात. परंतु, आरोग्यासाठी हे अतिशय घातक ठरू शकतं. यामुळे शरीरात विविध प्रकारचे आजार निर्माण होऊ शकतात. कार्यक्षमतेवर वाईट परिणाम होऊ शकतो. काही व्यक्ती वजन कमी करण्यासाठी जेवण टाळतात. पण, आरोग्यासाठी हे घातक आहे. जेवण वेळेवर न केल्याचे हे आहेत दुष्परिणाम–

१. वेळेत जेवण न केल्यानं चयापचय प्रक्रिया बिघडते. यामुळे फॅट्स जमा होतात. वजन वाढण्यास सुरुवात होते.



२. भुकेलं राहिल्यानं अशक्तपणा येऊन अनेकदा भोवळ येते.

३. भुकेल्या अवस्थेत शरीरात कोर्टिसोल नावाच्या हार्मोन्समध्ये वाढ होते. यामुळे तणाव जाणवतो.

४. वजन घटवायचं असल्यास पौष्टिक खा आणि काही वेळेच्या समप्रमाणात अंतरानं खात राहा. अन्यथा, विविध आजार शरीरात शिरकाव करू शकतात.

५. योग्य आहार आणि व्यायाम वजन नियंत्रणात ठेवायचं असेल तर योग्य–पौष्टिक आहार घ्या आणि व्यायाम करा.

६. योग्य प्रमाणात आणि वेळेत जेवण करा. अन्यथा, रकातली साखरेची पातळी खालावते.

७. भुकेमुळे जास्त चिडचिड होते.

### सफर देशांची — बेटांचा देश : न्यूझीलंड

न्यूझीलंड म्हणजे बेटांचा एक समूह आहे. बेटांवर बरेच डोंगर आहेत. पॅसिफिक महासागरात वसलेला हा देश ऑस्ट्रेलियाचा शेजारी आहे. या दोन देशांमध्ये १६०० किलोमीटरचं अंतर आहे. न्यूझीलंडमध्ये ५० पेक्षा जास्त ज्वालामुखी आहेत. २३ दशलक्ष वर्षांपूर्वी ज्वालामुखीच्या उद्रेकातूनच या बेटांची निर्मिती झाली असल्याचं तज्ज्ञ सांगतात. इथलं निसर्गसौंदर्य डोळ्यात भरण्यासारखं आहे. दक्षिण बेटावर या देशातील सर्वात मोठं 'माउंट कूक' हे शिखर आहे. वेलिंग्टन ही न्यूझीलंडची राजधानी आहे तर न्यूझीलंड डॉलर हे इथलं चलन. इथले ८६ टक्के लोक शहरांमध्ये राहतात. ऑकलंड, ख्राईस्टचर्च ही इथली महत्त्वाची शहरं आहेत. रग्बी हा इथला लोकप्रिय खेळ आहे. इथे क्रिकेटलाही मोठी लोकप्रियता मिळाली आहे. न्यूझीलंडमध्ये लोकशाही आहे. किवी फ्रूट, वाईन, बटर, लॅम्ब यांची निर्यात केली जाते. १९४७ मध्ये हा देश इंग्रजांकडून स्वतंत्र झाला. महिलांना मतदानाचा अधिकार देणारा न्यूझीलंड हा पहिला देश. १८९३ मध्ये इथल्या महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला. इथे विविध प्रजातींचे प्राणी पहायला मिळतात. इतकंच नाही तर काही प्रजाती फक्त न्यूझीलंडमध्येच आढळतात.

### स्टाईल स्टेटमेंट — असा निवडा मॅक्सी ड्रेस

मॅक्सी ड्रेसमुळे इंडो वेस्टर्न लूक मिळून जातो. पण लांबुळका मॅक्सी ड्रेस उंच मुलींनाच शोभून दिसतो, असा बुटक्या महिलांचा गैरसमज असतो. योग्य पद्धतीने कॅरी केला तर उंची कमी असूनही हा प्रकार छान दिसू शकतो.

✻ साईड किंवा फ्रंट स्लिटवाल्या मॅक्सी ड्रेसची निवड करा. यात पाय थोडे दिसले तरी तुम्ही जास्त उंच दिसाल. आपल्या आवडीनुसार स्लिटच्या लांबीची निवड करा. ✻ मॅक्सी ड्रेससोबत छानसा बेल्ट कॅरी करता येईल. बेल्टमुळे तुमचं शरीर सम भागात विभागलं जाईल. यामुळे तुम्ही उंच दिसू शकता. बुटक्या युवतींनी हायवेस्ट बेल्टची निवड करावी. ✻ मॅक्सी ड्रेस खूप घट्ट नसावा तसंच खूप ढगळही नसावा. ढगळ कपड्यांमुळे तुम्ही जास्त बुटक्या दिसता. मॅक्सी ड्रेस घेताना फिटिंगकडे नीट लक्ष द्या. ✻ कमी उंचीच्या मुलींनी उभ्या रेघा असणाऱ्या मॅक्सी ड्रेसची निवड करायला हवी. प्रिंटेड मॅक्सी ड्रेस घ्यायचा असेल तर छोट्या प्रिंट्सची निवड करावी. ✻ गडद रंगाच्या किंवा ब्लॅक अँड व्हाईट मॅक्सी ड्रेसचीही निवड करता येईल. हे काँबिनेशन खूप छान दिसतं. काळा, रॉयल ब्लू, ग्रीन, रेड असे गडद रंगाचे मॅक्सी ड्रेस विशेष खुलून दिसतात.

### पंचांग

**शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
कार्तिक कृ. १० (बालदिन),
चंद्रराशी : सिंह,
नक्षत्र : पू. फाल्गुनी, योग : वैधृति,
सूर्योदय ६.४७, सूर्यास्त ५.५९

### फॉरवर्डस

**लक़ीरें क़भी मामूली नहीं होतीं.. ये माथें पर फ़िक्र.. हथेलीं पर तक़दीर...**

**जमीन पर बटवारा.. रिश्तों में दरार कऱ देतीं हैं...!**

### भटकंती

तुम्हाला ट्रेकिंग आवडतं का? भारतात ट्रेकिंगची बरीच ठिकाणं आहेत. अर्थात ती शोधून काढावी लागतात. काही ठिकाणी गेल्यावर तुम्हाला ट्रेकिंगचा भन्नाट अनुभव मिळू शकतो. अविस्मरणीय ठरू शकणाऱ्या काही ट्रेक्सविषयी...

लडाखमधल्या झंस्कार भागात छादार किंवा फ्रोजन झंस्कार रिव्हर ट्रेक आहे. इथे तुम्हाला थरारक अनुभव मिळू शकतो. १०५ किलोमीटरच्या या ट्रेकमध्ये तुम्ही लडाखी संस्कृतीची जवळून ओळख करून घेऊ शकता. जानेवारी आणि फेब्रुवारी हा काळ या ट्रेकसाठी बेस्ट आहे. या ट्रेकसाठी १३ दिवस लागतील. **(क्रमश:)**

### करिअरवाटा — नोकरी शोधताना...

सध्या नोकरीसाठी ऑनलाईन अर्ज केला जातो. बऱ्याच जॉब पोर्टल्सवर रेझ्युमे अपडेट केला जातो. नोकरी ऑनलाईन शोधणं हा सोयीचा मार्ग असतो. अर्ज ऑनलाईन पोस्ट करून अधिकाधिक कंपन्यांपर्यंत पोहोचणं शक्य आहे. मात्र ऑनलाईन नोकरी शोधताना काही गोष्टींकडे लक्षही द्यायला हवं.



✻ ऑनलाईन जॉब शोधताना सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे उपयुक्त वेबसाईटची यादी बनवणं. कंपनी तुमच्या अपेक्षेप्रमाणे असल्याची खात्री करून मगच अर्ज पाठवावा. इंटरनेटवर नोकरी देऊ करणाऱ्या अनेक कंपन्या असतात. त्यांची विश्वासार्हता जोखून मगच अर्ज पाठवा.

✻ जॉबसाईट शोधताना लोकेशनकडेही लक्ष ठेवा. कंपनी नेमकी कुठं आहे, तुम्हाला तिथं जाणं शक्य आहे का, त्या शहरातली लाईफस्टाईल झेपेल का याचा आधीच विचार केलेला बरा. सर्व बाबी पटल्यावरच अर्ज करणं चांगलं.

✻ रोज मेल चेक करण्याची सवय ठेवा. खास करून जॉब ॲलर्टसकडे लक्ष द्या.

### खेचाखेची

**ढवळाढवळ**

मी लिफ्ट मध्ये एका लहान मुलाला आईस्क्रिम खाताना बघितलं. त्याची काळजी वाटून मी त्याला सहज बोललो, आज खूप थंडी आहे हे आईस्क्रिम खाऊन तू आजारी पडशील!
तो मुलगा उत्तरला, माझी आजी १०३ वर्षांपर्यंत जिवंत राहिली.
मी विचारलं, आइस्क्रिम खाल्यामुळे?
तो म्हणाला, नाही, कारण तिने कधीच दुसऱ्याच्या कामामध्ये नाक खुपसले नाही!

### वेगळं काही

परदेशात ताणतणावाने ग्रस्त लोक कुत्रे भाड्याने आणतात. ताण कमी होईपर्यंत या कुत्र्यांसोबत वेळ घालवतात. लवकरच भारतातही हा प्रकार प्रचलित होण्याची शक्यता आहे. जयपूरचे श्वान व्यवहार तज्ज्ञ वीरेन शर्मा देशभरातल्या महानगरांमध्ये १०० 'मॅड अबाउट डॉग्ज' केंद्रे उघडत आहेत. इथे विविध प्रजातींचे कुत्रे आणि इतर सोयीसुविधाही उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. मुंबई, दिल्ली, बंगळूरू सारख्या शहरांमध्ये डॉग डे आउटसारखी सुविधाही मिळणार आहे. कुत्रे पाळून त्यांची देखभाल करण्याइतका वेळ लोकांकडे नसतो. अनेक जण इच्छा असूनही प्राणी पाळू शकत नाहीत, अशांना कुत्रे भाड्याने घेऊन आपली हौस भागवता येईल.

### स्मार्ट टिप्स — देखभाल भरजरी साड्यांची...

विविध प्रसंगांसाठी आपण साड्या खरेदी करतो. अगदी हौसेने नेसतो. जरीच्या, वर्कवाल्या साड्यांसाठी मोठी रक्कमही मोजतो. अशा साड्या विशिष्ट प्रसंगीच नेसल्या जातात. त्यामुळे अशा महागाईच्या, भरजरी साड्यांची विशेष देखभाल करायला हवी. या साड्यांची देखभाल कशी करायची, याविषयी...



✻ भरजरी सिल्कच्या साड्यांना अधूनमधून ऊन दाखवावं लागतं. यासाठी या साड्या काही तास कोवळ्या उन्हात ठेवा. मात्र कडक ऊन टाळा. साड्यांना ऊन लागल्यामुळे बुरशी लागत नाही. तसंच बराच काळ बंदिस्त राहिल्याने लागलेला वासही निघून जातो. साड्या पुन्हा जागेवर ठेवताना घडी बदला. यामुळे जर खराब होत नाही.

✻ आवडीच्या जरीच्या साडीची चमक कमी होत असेल तर घाबरून जाऊ नका. ही चमक तुम्ही घरच्या घरी परत मिळवू शकता. यासाठी बादलीभर पाण्यात पाव कप व्हिनेगर घाला. यात साडी भिजवून ठेवा. काही वेळाने साडी साध्या पाण्याने नीट धुवा. यामुळे साडीची चमक टिकून राहील.

दैनिक महाभूमि

dainikmahabhoomi@gmail.com

शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५

# बुलढाणा भूमि

### हवामान अंदाज

सूर्योदय : ६.३४ सकाळी
सूर्यास्त : ५.४५ सायं.
तापमान
कमाल : २८°
किमान : १४°

### सोने-चांदी

| | |
|---|---|
| सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) | १२३,००० |
| सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) | १२४,००० |
| चांदी (प्रति किलो) | १५७,००० |

### बाजारभाव

**चिखली कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २२०० | २७५० |
| हरभरा | ४५०० | ५३०० |
| सोयाबीन | ३३०० | ४००० |
| तुर | ५४०० | ६३०० |
| ज्वारी | १६०० | १९०० |

**खामगाव कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २२०० | २४६९ |
| हरभरा | ४६०० | ५८०० |
| सोयाबीन | ३५०० | ४५०० |
| तुर | ६००० | ७४२५ |
| ज्वारी | १७०० | २१५१ |

### दखल...

**पक्षी सप्ताह . . !**

अनेकविध वैशिष्ठयांचे
विविध पक्षी भुतलावर
विहरतांना दिसती . .
त्यांचे निरीक्षण करता
दृष्टीस येती आश्चर्यकारक
मनोरंजक गमती जमती . .
त्यांना नाही मानवासारखी हाव
पोटाला लागते तेवढेच
ते चोचीत घेती राव . .
मानव फारच स्वार्थी
साठवून ठेवे भविष्यासाठी
संचितातून उदारहस्ते
द्यावे पशुपक्षांसाठी ..

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
( ९४२१३९४३३९ )

## २३ नोव्हेंबरला आयोजन | प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात

# बुलढाण्यातील १८ परीक्षा केंद्रांवर होणार भावी शिक्षकांची परीक्षा

बुलढाणा / प्रतिनिधी

राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारी (टीईटी) शिक्षक पात्रता परीक्षा रविवार, २३ नोव्हेंबर रोजी बुलढाणा जिल्ह्यातील १८ परीक्षा केंद्रांवर पार पडणार आहे. या परीक्षेसाठी एकूण ११ हजार २८३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून पेपर एक साठी ५ हजार ३०८ आणि पेपर दोन साठी ५ हजार ९७५ विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

शिक्षक पदासाठी पात्रता मिळविण्यासाठी ही प्राथमिक परीक्षा आहे. शिक्षक बनण्याचे स्वप्न बाळगणाऱ्या विद्यार्थांना शिक्षक पात्रता परीक्षा उतीर्ण होणे अत्यंत महत्वाचे आहे. ही परीक्षा पारदर्शक, सुरळीत आणि शांततेत पार पाडावी यासाठी जिल्हा प्रशासनाने सुबद्ध नियोजन केले असून आवश्यक त्या सूचनाही जिल्हा परीक्षा आयोजन व संनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिल्या आहेत.

परीक्षा आयोजन व संनियंत्रण समितीची बैठकीत जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी शिक्षक पात्रता परीक्षेच्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांना निर्देशित केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, जिल्हा पोलीस अधिक्षकांचे प्रतिनिधी, प्राचार्य, डायट बुलढाणा, शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक / योजना) तसेच जिल्हा कोषागार अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.



**'या' केंद्रावर होणार परीक्षा**

■ शिवाजी हायस्कूल, एडेड हायस्कूल, शारदा ज्ञानपीठ, भारत विद्यालय, उर्दू हायस्कूल, सहकार विद्यामंदिर-१ व २, केंब्रिज स्कूल, पोदार इंग्लिश स्कूल, सेंट जोसेफ इंग्लिश स्कूल, प्रबोधन विद्यालय, शाहू इंजिनिअरिंग कॉलेज, पंकज लद्धड इंजिनिअरिंग कॉलेज, गुरुकुल ज्ञानपीठ सागवान, विद्या विकास विद्यालय कोलवड, शिवसाई ज्ञानपीठ सागवान, राजीव गांधी सैनिकी शाळा कोलवड आणि जिजामाता महाविद्यालय येथे परीक्षा होणार आहे.

**आयोजन समितीकडून महत्वाची सूचना**

■ परीक्षा केंद्रांवर सीसी कॅमेऱ्यांद्वारे देखरेख ठेवली जाणार असून, परीक्षार्थींची सखोल तपासणी करण्यात येईल. परीक्षार्थींनी प्रवेशपत्रासह मूळ ओळखपत्र (आधार, पॅन, वाहन परवाना इ.) अनिवार्यपणे बाळगावे.परीक्षा केंद्रावर हँडहोल्ड डिटेक्टर, बायोमेट्रिक व फेस रिकग्निशन तपासणी होणार असल्याने परीक्षार्थींनी परीक्षा सुरू होण्याच्या दीड तास आधी केंद्रावर उपस्थित राहावे.परीक्षा गृहात मोबाईल, कॅलक्युलेटर, कॅमेरा, डिजिटल घड्याळ नेण्यास सक्त मनाई आहे.

"सर्व परीक्षार्थींनी नियमांचे काटेकोर पालन करावे, जेणेकरून कोणतेही नुकसान होणार नाही. ही परीक्षा अत्यंत पारदर्शकपणे पार पाडणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

– **विकास पाटील,**
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

## मुरुमाची अवैध वाहतूक; तहसीलदारांनी पकडला टिप्पर



बुलढाणा / प्रतिनिधी

गौण खनिजाचे अवैध उत्खनन सुरू असल्याने शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवला जात असल्याचा प्रकार पुन्हा समोर आला आहे. १२ नोव्हेंबरच्या रात्री बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे दौऱ्यावर असतांना त्यांनी मुरुमाची अवैध वाहतूक करणारा टिप्पर पकडून बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात लावला. या कारवाईमुळे मुरूम तस्करांचे धाबे दणाणले आहेत.

जिल्ह्यात अवैध वाळू व गौण खनिज तस्करांवर कारवाई करण्याचे कडक आदेश जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी सर्वच तहसिलदारांना दिलेले आहे. त्यानुसार बुधवारी रात्री १० वाजेच्या सुमारास बुलढाणा तहसीलदार विठ्ठल कुमरे हे तस्करांना चकमा देण्यासाठी एका खाजगी कारने गस्तीवर होते. यावेळी ते चिखली रोडने जात असतांना वृंदावन नगर परिसरातुन त्यांना टिप्पर क्र. एमएच २८ एबी-८३०३ जातांना दिसले. त्याला थांबवून चौकशी केली असता सदर टिप्पर कौस्तुभ शेळके यांच्या मालकीचे असून विना परवानगी मुरुमाची तस्करी होत असल्याचे निदर्शनास आले. महसूल पथकाने टिप्पर जप्त करून बुलढाणा शहर पोलीस ठाण्यात लावले असून दंडात्मक करवाई प्रस्तावित असल्याची माहिती तहसीलदार कुमरे यांनी १३ नोव्हेंबर रोजी दिली आहे. कारवाईत तलाठी गोपाल राजपूत,अतुल झगरे आणि अशोक देवकर सहभागी होते.

## सावखेड तेजन शिवारात कारसमोर बिबट्या



सिंदखेडराजा / प्रतिनिधी

तालुक्यातील सावखेड तेजन शिवारात नागपूर-मुंबई महामार्गावरून जात असलेल्या एका कारसमोर अचानक बिबट्या आल्याने क्षणभर कारमधील प्रवाशांच्या हृदयाचे ठोके चुकले.

कारच्या डॅशबोर्डवर लावलेल्या कॅमेऱ्यात हा बिबट्या स्पष्टपणे कैद झाला असून, या घटनेचा व्हिडिओ सध्या प्रसारमाध्यमांवर वेगाने व्हायरल होत आहे.

काही सेकंदांच्या या दृश्यात बिबट्या महामार्ग ओलांडून झुडुपांच्या दिशेने निघून जाताना दिसतो.

बुलढाणा जिल्ह्यात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे वनविभागाच्या सूत्रांनी सांगितले. ग्रामीण भागात पाळीव जनावरांवर बिबट्यांच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडल्या असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**वन विभागाचे पथक तैनात**

■ वनविभागाने परिसरात बिबट्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी पथक तैनात केले असून, नागरिकांना रात्रीच्या वेळी एकटे न फिरण्याचे आणि खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. गत काही दिवसांपासून उपरोक्त परिसरात बिबटे, अस्वल यासारखे हिंस्त्र प्राणी निदर्शनास येत असल्याने सर्वत्र भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे, परिसरातील लोकांनी घाबरून न जाता वन विभागाच्या संपर्कात राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

## तलवारबाजी स्पर्धेत विद्यार्थी चमकले



**चिखली :** छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राजस्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत श्री शिवशंकर उच्च माध्यमिक विद्यालय भरोसा मिराचौकी येथील विद्यार्थी सोहम आणि आयन खान करीम खान यांनी ब्रांझ पदक प्राप्त करून विद्यालयाचा नाव लौकिक उंचावला आहे. त्यांच्या यशाबद्दल श्री शिवशंकर उच्च माध्यमिक विद्यालय भरोसा संस्थाध्यक्ष शिरसाठ, प्राचार्य पडघान तसेच सर्व शिक्षक वृंद इतर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

## सिंदखेड राजातील युवकांचा शिवसेनेत प्रवेश

### उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत मेळावा

सिंदखेडराजा / प्रतिनिधी

जालना येथे झालेल्या शिवसेना पक्षाच्या मेळाव्यात सिंदखेड राजा येथील युवकांनी पक्षप्रवेश केला. पालिका आणि जिल्हा परिषद निवडणूकीच्या धामधुमीत झालेला हा पक्ष प्रवेश स्थानिक राजकारणात चर्चेचा विषय ठरला आहे.

जालना येथे १२ नोव्हेंबर रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना (शिंदे गट)पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत एक मेळावा पार पडला. यावेळी सिंदखेड राजा तालुक्यातील अतिश जाधव, योगेश इंगळे यांनी जाहीर पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी बुलढाणा जिल्ह्याचे खासदार तथा केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर तसेच माजी आमदार डॉ. शशिकांत खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. श्रीकृष्ण राजे जाधव आणि नरसिंग राजे जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पक्ष प्रवेश केल्याचे अतिश जाधव यांनी सांगितले. दरम्यान, सचिन जाधव, कपिल भाले, चंद्रकांत काटे, आदित्य पाइकवार आणि शंकर देशमुख यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनीही शिवसेना (शिंदे गट) मध्ये प्रवेश केला .



### न्यूज ब्रीफ

**निवडणुकीत जाहिरातींचे पूर्वप्रमाणन आवश्यक**

**बुलढाणा :** जिल्ह्यातील नगरपरिषद निवडणुकीसाठी निवडणूक प्रक्रियेस सुरूवात झाली आहे. या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या सर्व उमेदवारांनी इलेक्ट्रॉनिक जाहिराती प्रसारणापूर्वी जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीच्या माध्यमातून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. याबाबत राज्य निवडणूक आयोगाने शासन राजपत्राद्वारे आदेश जारी केले आहे. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व सनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीत उपविभगीय अधिकारी, अपर पोलीस अधीक्षक, मुद्रित व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचे जिल्हा प्रतिनिधी तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कार्यरत आहेत.

## डॉ. सत्येंद्र भुसारी यांचे रेल्वे अपघातात निधन

चिखली / प्रतिनिधी



तालुका काँग्रेसचे अध्यक्ष तथा बाजार समितीचे माजी सभापती डॉ. सत्येंद्र भुसारी यांचे कासारा रेल्वेस्थानकानजीकच्या टर्निंग पॉइंटवर रेल्वे अपघातात निधन झाल्याची धक्कादायक घटना बुधवारी सायंकाळी सात वाजेच्या सुमारास . घडली.

डॉ. भुसारी हे जालना येथून मुंबईकडे पक्षाच्या बैठकीसाठी जात होते. नाशिक येथील शासकीय रुग्णालयात त्यांच्या पार्थिवाचे परीक्षण करण्यात आले. डॉ. भुसारी हे रेल्वेतून पडल्याची माहिती कळताच, मुंबईतील बुलढाणा जिल्ह्यातील राजकीय नेते, कार्यकर्ते यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. त्यांच्या निधनाने राजकीय वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. १३ नोव्हेंबर, गुरुवार रोजी त्यांच्या मूळगावी भोरसा भोरसी (ता. चिखली) येथे दुपारी चार वाजता त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## मेहकरात अजय उमाळकर यांचा नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल

मेहकर / प्रतिनिधी

नगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली असून मेहकर नगराध्यक्ष पदासाठी शिवसेना (शिंदे) पक्षाकडून महायुतीच्या वतीने अजय अरविंद उमाळकर यांनी उमेदवारी अर्ज गुरुवारी दुपारी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे दाखल केला.

मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या बैठकीत मेहकर नगराध्यक्ष पदासाठी अजय उमाळकर यांचे नाव निश्चित करण्यात आले होते.

महायुतीतील घटक पक्षांच्या वरिष्ठ नेत्यांशी व स्थानिक पातळीवर चर्चा सुरू असल्याचे प्रतापराव जाधव यांनी सांगितले होते. गजानन महाराजांचे निस्सिम भक्त असलेले अजय उमाळकर यांनी गुरुवारचा मुहूर्त साधून उमेदवारी अर्ज दाखल केला.

याप्रसंगी अंजली अजय उमाळकर, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, शिवसेनेचे तालुकाप्रमुख सुरेशतात्या वाळूकर, शहरप्रमुख जयचंद बाठी, रविराज रहाटे, जितूभाऊ सावजी, घनश्याम पाटील यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

अजय उमाळकर हे यापूर्वी नगरपालिकेचे उपाध्यक्ष होते. ते महाराष्ट्र अर्बन पतसंस्थेचे कार्यकारी संचालक आहेत.



**अध्यक्षपदाचा पहिलाच अर्ज**

■ अर्ज भरण्याच्या दिनांकापासून हा पहिलाच उमेदवारी अर्ज दाखल झाला आहे. शिवसेना शिंदे पक्षाकडून अधिकृत उमेदवार अजय उमाळकर यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला असताना डमी अर्ज म्हणून सुरेश वाळूकर यांनी नगराध्यक्ष पदासाठी अर्ज दाखल केला आहे. नगरसेवक पदासाठी एकूण आठ अर्ज आज दाखल झाले आहेत.

## परवानाधारकाकडील शस्त्रे जमा करण्याचे निर्देश

**बुलढाणा :** स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने जिल्ह्यातील परवानाधारकाकडे असलेले शस्त्रे जमा करण्यासंदर्भात मार्गदर्शक सूचना छाननी समितीने जाहिर केले आहे. त्याअनुषंगाने मार्गदर्शक सूचनाचे पालन करुन परवानाधारक व्यक्तींनी आपली शस्त्रे त्वरीत पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्याचे निर्देश जिल्हा दंडाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमीत केले आहेत. बँक, संस्था,सोनार,देवस्थान आणि पेट्रोलपंप धारक यांचेकडे असलेले शस्त्रपरवाने निवडणूक कालावधीत जमा करण्याची आवश्यकता नसल्याचे समितीने निर्णय घेतला आहे.

## अवैध वाळू वाहतुकी विरोधात एलसीबीचा एल्गार!

### अंढेरा हद्दीत दोन दिवसात ६६ लाखांचा मुद्देमाल जप्त

अंढेरा / प्रतिनिधी

अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीचे केंद्र बनलेल्या अंढेरा पोलीस स्टेशन हद्दीत 'एलसीबी'ने कारवाईस्त्र उगारले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाने एल्गार पुकारत पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या नेतृत्वात सलग दोन दिवस कारवाया करीत टिप्पर सह एकूण ६६ लाखांच्या मुद्देमाल हस्तगत केला आहे.

कोनड खु. शिवारात नाकाबंदी दरम्यान एक पांढऱ्या रंगाचे टिप्पर अडविण्यात आले होते. या वाहनातून सहा ब्रास अवैध वाळू (किंमत ६० हजार) मिळून आली. वाहनाची किंमत ३० लाख असून एकूण ३० लाख ६० हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. पीएसआय प्रताप बाजड, हेड कॉन्स्टेबल शरद गिरी, पुरषोत्तम आघाव, निलेश राजपूत, विकास देशमुख यांच्या पथकाने ही कारवाई पार पाडली. गुरुवारी उत्तररात्री दिग्रस शिवारात नाकाबंदी केली असता विना नंबरचे टिप्पर पोलिसांनी पकडले. यामध्ये, चार ब्रास वाळू , टिप्पर किंमत ३५ लाख असून असा एकूण ३५ लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



**स्थानिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह**

■ अंढेरा पोलीस ठाणे हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैध वाळू होत असल्याचे या कारवाईमुळे उघडकीस आले आहे. यावर अंकुश लावणे ही स्थानिक पोलिसांची देखील जबाबदारी आहे. मात्र, एलसीबीच्या पथकाने वाळू वाहतूक प्रकरणी केलेल्या कारवाईमुळे स्थानिक पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत.

## संत विचाराची परंपरा लोकांपर्यंत पोहचवण्याचे तुषार हंसदास यांचे आवाहन

# समाजकार्य महाविद्यालयात 'संत स्वराज्य संविधानाचा' जागर

बुलढाणा / प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांनी वारकरी संतांचा विचार आणि झेंडा घेऊन राज्यकारभार केला. याच विचारांवर चालत महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराजांनी समाजाच्या उत्थानासाठी कार्य केले. हाच विचारांचा वारसा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लेखणीतून भारतीय संविधानात आला.

आपले संविधान आणि आपला देश समजून घ्यायचा असेल तर आपली संत विचारांची परंपरा आपल्याला समजून घ्यावी लागेल आणि ती लोकांपर्यंत पोहोचवावी लागेल, असे आवाहन इंजि.तुषार रुईसा हंसदास यांनी केले. बुधवार १२ नोव्हेंबर रोजी महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालय बुलढाणा येथे 'संत स्वराज्य संविधान' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी तुषार हंसदास बोलत होते. विचारपीठावर सामाजिक कार्यकर्त्या शाहीनाताई पठाण, संविधान सैनिक सुमेध जाधव, प्राचार्य डॉ. अविनाश गेडाम, प्रा.डॉ. हरिश साखरे, प्रा. डॉ. अस्मिता ठोंबरे, प्रा. अर्जुन बोकाडे, प्रा. संदिप मोठे यांची उपस्थिती होती. पुढे बोलतांना तुषार रुईसा हंसदास म्हणाले की, देशात प्रचंड विविधता असूनही भारत एकसंध आणि एकत्र राहिला आहे. कारण संविधानाने विविधतेचा सन्मान केला आहे. व्यक्ती कोणताही धर्म, जात, लिंग, प्रांत, भाषा, गरीब वा श्रीमंत असो, प्रत्येक भारतीयाचा भारतावर आणि संविधानावर समान हक्क आहे. एकंदरीत संविधानाने प्रत्येक भारतीयाला सामावून घेतल्याचेही त्यांनी सांगितले. संविधान सैनिक सुमेध जाधव, गोपाल घेंवदे यांनीही विचार व्यक्त केले. प्रास्ताविक शाहिनाताई पठाण, स्वागत गीत रागिनी तापडीया, सूत्रसंचालन राम हिंगे तर आभार छाया भाग्यवंत यांनी मानले.



**विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये आत्मसात करावी : प्राचार्य डॉ. गेडाम**

■ संविधानाची पायमल्ली रोखणे, संविधानाचं संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. संविधानाचे पालन करणे हीच खरी देशभक्ती असून विद्यार्थ्यांनी संविधानिक मूल्ये आत्मसात करावी, असे आवाहन महात्मा ज्योतीबा फुले समाजकार्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश गेडाम यांनी केले. संविधान सर्वांचे आहे, हे प्रत्येकाला सांगूया.. संविधानाचा विचार घराघरात पोचवूया.. यासाठी आगामी काळात महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रम आयोजित करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## बिहारमध्ये कोण मारणार बाजी?

बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल काही तासांवर येऊन ठेपला आहे. देशभर या निवडणुकीचे पडसाद पडू शकतात. महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका असल्याने या निवडणुकांवरही बिहार विधानसभा निवडणुकीचे परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बिहार विधानसभा निवडणुकीतील दोन्ही टप्प्यातील मतदान नुकतेच पार पडले असून यावेळी मतदारांचा विक्रमी प्रतिसाद बघायला मिळाला. एक्झिट पोलच्या आकड्यात यावेळीही बिहारमध्ये एनडीएचीच सत्ता येईल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विशेष म्हणजे गेल्या निवडणुकीच्या तुलनेत एनडीएच्या काही जागा वाढण्याचाही अंदाज एक्झिट पोलमध्ये व्यक्त करण्यात आला. काही एक्झिट पोलमध्ये नितीश कुमार यांचा जेडीयू तर काही एक्झिट पोलमध्ये अखिलेश यादव यांचा आरजेडी सर्वात जास्त जागा जिंकणार असे भाकित व्यक्त करण्यात आले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून बिहार विधानसभा निवडणुकीची देशभरात चर्चा होती. ही निवडणूक जिंकण्यासाठी एनडीए तसेच महागठबंधनने पूर्ण ताकद लावली होती. याच निवडणुकीसाठी मतदानाची प्रक्रिया ११ नोव्हेंबर रोजी पार पडली. मतदान संपल्यानंतर वेगवेगळ्या संस्थांनी एक्झिट पोलचेही आकडेही जाहीर केले. या एक्झिट पोलच्या आकड्यांत नेमके कोणाचे सरकार येणार? याचाही अंदाज व्यक्त करण्यात आला असून सर्वांनीच भाजप आणि नितीश कुमार यांच्या एनडीएचे पारडे जड भरणार, असा अंदाज व्यक्त केला आहे. अवघ्या काही तासांत बिहारच्या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. त्यामुळे आता राजकाणातील हे युद्ध नेमके कोण जिंकणार? हे लवकच स्पष्ट होणार आहे? बिहार विधानसभा निवडणूक एकूण दोन टप्प्यांत झाली. एकूण २४३ जागांसाठी ही निवडणूक आयोजित करण्यात आली होती. पहिल्या टप्प्यात विधानसभेच्या एकूण १२१ तर दुसऱ्या टप्प्यात एकूण १२२ जागांसाठी मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात आली. पहिल्या टप्प्याचे मतदान ६ नोव्हेंबर रोजी तर दुसऱ्या टप्प्यातील मतदान ११ नोव्हेंबर रोजी पार पडले. आता १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणीनंतर कोणाचे सरकार येणार? हे स्पष्ट होणार आहे. बिहारची विधानसभा निवडणूक यावेळी विशेष होती. एनडीए विरुद्ध महागठबंधन अशी ही सरळ निवडणूक होती. परंतु राजकीय रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी देखील या निवडणुकीत उडी घेत अनेक जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. विशेष म्हणजे त्यांनी केलेला आक्रमक प्रचार आणि नितीश कुमार यांच्यावर केलेला हल्लाबोल यामुळे बिहारमधील राजकारण बदलण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. त्यामुळे यावेळी नेमकं कोण बाजी मारणार, याची सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. भाजपा, नितीश कुमार यांचा जदयू या दोन प्रमुख पक्षांसह इतरही काही मित्रपक्षांनी एनडीए म्हणून निवडणूक लढवली तर महागठबंधनमध्ये काँग्रेस, तेजस्वी यादव यांच्या आरजेडी या प्रमुख पक्षांनी निवडणुकीचे मैदान गाजवले. त्यामुळे आता नेमकं कोण बाजी मारणार? हे लवकरच स्पष्ट होणार आहे. दरम्यान, बिहार विधानसभा निवडणुकीत कोण सर्वात मोठा पक्ष ठरला? कोणाच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडणार? हे स्पष्ट होणार आहे. बिहार विधानसभा निवडणुकीच्या या निकालावरच पुढील राजकीय गणित अवलंबून आहेत. बिहारमध्ये वाढलेले मतदान आणि मतदान वाढीनंतर येणारा निकाल राजकीय स्थिती परिणामकारक शकतो.

# करकपातीनंतरची उलाढाल काय सांगते ?

**अर्थनगरीतून**
- महेश देशपांडे
आर्थिक घडामोडींचे जाणकार

सरत्या काळामध्ये देशाने जोमदार खरेदीयात्रा अनुभवली. दिवाळीच्या खरेदीने अनेकांना चकीत केले. त्या पाठोपाठ आलेल्या जीएसटी संकलनाच्या आकड्यांनीही देशाच्या आर्थिक स्थितीची चुणूक दाखवली. अर्थनगरीमध्ये याच अनुषंगाने उठलेले तरंग अनुभवायला मिळत आहेत. त्यामुळे जीएसटी संकलन किती झाले, जीएसटी महसूल अंदाजापेक्षा जास्त मिळाला की कमी, त्याचा मागील काळाशी संबंध जोडला असता काय चित्र दिसते, याची चर्चा सुरु आहे. दरम्यान, नेमकी आकडेवारी समोर आल्याने सणासुदीमुळे वाहनविक्रीमध्ये मोठी वाढ झाल्याचे पहायला मिळाले.

उत्सवकाळातील खरेदीमुळे ऑक्टोबर मध्ये एकूण जीएसटी संकलन ४.६ टक्क्यांनी वाढून सुमारे एक लाख ९६ हजार कोटी झाले. स्वयंपाकघरातील वस्तू, इलेक्ट्रॉनिक्स आणि ऑटोमोबाईल्ससह ३७५ वस्तूंवर नवीन वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) दर २२ सप्टेंबरपासून लागू झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिवाळीपूर्वी स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात जीएसटी दर कपातीची घोषणा केल्यानंतर ग्राहकांनी जीएसटी दर कपातीच्या अंमलबजावणीची वाट पाहत आपले खरेदीचे निर्णय पुढे ढकलले. सरकारी आकडेवारी नुसार, ऑक्टोबर मध्ये एकूण जीएसटी संकलन एक लाख ९६ हजार कोटी रुपये होते. ते ऑक्टोबर २०२४ मध्ये झालेल्या एक लाख ८७ हजार कोटी रुपयांच्या संकलनापेक्षा ४.६ टक्के जास्त आहे. या वर्षी ऑगस्ट आणि सप्टेंबरमध्ये करसंकलन अनुक्रमे एक लाख ८६ हजार कोटी रुपये आणि एक लाख ८९ हजार कोटी इतके म्हणजेच किंचित कमी होते. ऑक्टोबरमध्ये जीएसटी संकलनात झालेली ४.६ टक्के वार्षिक वाढ मागील महिन्यात झालेल्या सरासरी नऊ टक्क्यांच्या वाढीपेक्षा कमी आहे.

स्थानिक विक्रीचा निर्देशक असलेला एकूण देशांतर्गत महसूल ऑक्टोबरमध्ये दोन टक्क्यांनी वाढून एक लाख ४५ हजार कोटी रुपये झाला. दुसरीकडे, आयात कर अंदाजे १३ टक्क्यांनी वाढून ५० हजार ८८४ कोटी झाला. जीएसटी परतावा देखील वर्षानुवर्षे ३९.६ टक्क्यांनी वाढून २६ हजार ९३४ कोटी रुपये झाला. ऑक्टोबर २०२५ मध्ये निव्वळ जीएसटी महसूल एक लाख ६९ हजार कोटी रुपये होता. तो मागील वर्षाच्या तुलनेत ०.२ टक्क्यांनी वाढला आहे.

दरम्यान, या अनुषंगाने काही भाकितेही समोर येत आहेत. आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये जीएसटी महसूल सरकारच्या बजेट अंदाजांपेक्षा जास्त असेल. अहवालानुसार, राज्यांमध्ये करदरांच्या पुनर्रचनेनंतरही एकूण जीएसटी महसूल मजबूत राहील. हे भारतीय अर्थव्यवस्थेतील करप्रणालीची स्थिरता दर्शवते. 'एसबीआय रिसर्च' अहवालात म्हटले आहे, की आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये जीएसटी संकलन बजेट अंदाजांपेक्षा जास्त असेल. अहवालात 'जीएसटी कौन्सिल'ने जाहीर केलेल्या विकासदर अंदाजांवर बेतून हा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यात म्हटले आहे, की कर दरांच्या अलिकडील पुनर्रचनेनंतरही बहुतेक राज्यांना आर्थिक वर्ष २०२६-२७ मध्ये निव्वळ फायदा दिसेल. सप्टेंबर २०२५ मध्ये लागू केलेल्या जीएसटी दर पुनर्रचनेअंतर्गत आता शून्य टक्के, पाच टक्के, १८ टक्के आणि ४० टक्के अशी कररचना अस्तित्त्वात आहे. या बदलामुळे महाराष्ट्राला अंदाजे सहा टक्के फायदा होईल तर कर्नाटकला १०.७ टक्क्यांपर्यंत वाढ दिसेल. अहवालात पुढे म्हटले आहे की दर पुनर्रचनेनंतर एकूण राज्ये निव्वळ नफा मिळवतील.

'एसबीआय रिसर्च'ने जुलै २०१८ आणि ऑक्टोबर २०१९ च्या जीएसटी दर सुधारणांचा अनुभव आपल्या विश्लेषणात समाविष्ट केला आहे. अहवालानुसार दर बदलानंतर सुरुवातीच्या महिन्यांमध्ये तीन ते चार टक्क्यांची तात्पुरती घट दिसून येते; परंतु त्यानंतर, महसुलात सातत्याने दरमहा पाच ते सहा टक्क्यांनी वाढ होते.




अर्थ मंत्रालयाने जाहीर केलेल्या अधिकृत आकडेवारीनुसार ऑक्टोबर २०२५ मध्ये जीएसटी संकलन ४.६ टक्क्यांनी वाढून एक लाख ९५ हजार कोटी रुपये झाले. जे गेल्या वर्षी याच महिन्यात एक लाख ८७ हजार कोटी रुपये होते. एप्रिल ते ऑक्टोबर २०२५ दरम्यान एकूण करसंकलन नऊ टक्क्यांनी वाढून १३.८९ लाख कोटी रुपये झाले आहे. या कालावधीत केंद्रीय कर संकलन, राज्य कर संकलन आणि एकात्मिक कर संकलनात वाढ झाली आहे, तर उपकर संकलनात किंचित घट झाली आहे. तज्ज्ञांच्या मतानुसार हीच पद्धत कायम राहिल्यास येत्या काही महिन्यांमध्ये सरकारी महसूल आणखी मजबूत होऊ शकतो.

अन्य दखलपात्र आर्थिक घडामोडींमध्ये सणासुदीच्या काळात ऑटोमोबाईल क्षेत्राने वेग घेतल्याचे पहायला मिळाले. ग्राहकांची वाढती मागणी आणि सकारात्मक बाजारभावामुळे महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम), टाटा मोटर्स आणि मारुती सुझुकी यासारख्या आघाडीच्या कंपन्यांच्या विक्रीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या मागणीत वाढ झाल्याने उद्योगात नवी ऊर्जा निर्माण झाली आहे. त्यामुळे येत्या काही महिन्यांमध्ये ऑटो क्षेत्राच्या कामगिरी बाबतच्या अपेक्षा वाढल्या आहेत. महिंद्रा अँड महिंद्राची एकूण वाहन विक्री २६ टक्क्यांनी वाढून एक लाख वीस हजार १४२ युनिट्सवर पोहोचली आहे. महिंद्रा अँड महिंद्रा (एम अँड एम) ने दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबरमध्ये कंपनीच्या देशांतर्गत प्रवासी वाहनांची विक्री ३१ टक्क्यांनी वाढून ७१,६२४ युनिट्सवर पोहोचली आहे.

देशांतर्गत बाजारात व्यावसायिक वाहनांची विक्री १४ टक्क्यांनी वाढून ३१,७४१ युनिट्सवर पोहोचली आहे. दुसरीकडे, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम)ने ऑक्टोबरमध्ये एकूण विक्रीमध्ये ३९ टक्के वाढ नोंदवली. ती ४२,८९२ युनिट्सवर पोहोचली आहे.

कृषी आणि बांधकाम उपकरणे बनवणाऱ्या एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेडने ऑक्टोबर २०२५ मध्ये गेल्या वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत एकूण ट्रॅक्टर विक्रीमध्ये ३.८ टक्के वाढ नोंदवली असून ती १८ हजार ७९८ युनिट्सवर पोहोचली आहे. 'स्कोडा ऑटो इंडिया'ने ऑक्टोबर २०२५ मध्ये ८,२५२ युनिट्सची विक्री नोंदवली. ती आतापर्यंतची सर्वाधिक मासिक विक्री आहे. 'ह्युंदाई मोटर इंडिया'ची विक्री ६९ हजार ८९४ युनिट्सवर पोहोचली आहे. मारुती सुझुकी इंडिया लिमिटेडची एकूण विक्री सात टक्क्यांनी वाढून २२०,८९४ युनिट्सवर पोहोचली आहे. व्यावसायिक वाहनांसह त्यांची एकूण देशांतर्गत विक्री एक लाख ८० हजार ६७५ युनिट्सच्या सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे. 'टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स लिमिटेड'ची एकूण विक्री २६.६ टक्क्यांनी वाढून ६१ हजार २९५ युनिट्सवर पोहोचली आहे. 'टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेइकल्स'ने दिलेल्या माहितीनुसार ऑक्टोबरमध्ये सलग दुसऱ्या महिन्यात विक्रमी ६१ हजार २९५ वाहने विकली गेली. यामध्ये 'एसयूव्ही'चा सर्वाधिक वाटा होता. ४७ हजारपेक्षा जास्त युनिट्स विकली गेली. ऑक्टोबरमध्ये किया इंडियाची विक्री ३० टक्क्यांनी वाढून २९ हजार ५५६ युनिट्सवर पोहोचली. 'किआ इंडिया'ची विक्री ३० टक्क्यांनी वाढून २९,५५६ युनिट्सवर पोहोचली.

ही भारतीय बाजारात प्रवेश केल्यापासून कंपनीची सर्वोत्तम मासिक विक्री आहे. 'किआ इंडिया'ने सांगितले, की वाहनांच्या विक्रीमध्ये सोनेटचा सर्वाधिक वाटा होता. या गाडीच्या १२ हजार ७४५ युनिट्सची विक्री झाली. 'टीव्हीएस मोटर कंपनी'नुसार त्यांची विक्री ११ टक्क्यांनी वाढून पाच लाख ४३ हजार ५५७ युनिट्सवर पोहोचली आहे. गेल्या महिन्यात टीव्हीएसची एकूण दुचाकी विक्री दहा टक्क्यांनी वाढून पाच लाख २५ हजार १५० युनिट्सवर पोहोचली. कंपनीने पुढे म्हटले आहे की देशांतर्गत दुचाकी विक्री आठ टक्क्यांनी वाढून चार लाख २१ हजार ६३१ युनिट्सवर पोहोचली आहे. गेल्या वर्षीच्या याच महिन्यातील २,३०,८२२ युनिट्सवरून सोळा टक्क्यांनी वाढून ती २,६६,७१५ युनिट्स झाली. गेल्या महिन्यात स्कूटर्सची विक्री सात टक्क्यांनी वाढून २०५,९१९ युनिट्स झाली.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## बालदिनाचे महत्त्व – १४ नोव्हेंबरचा आनंदोत्सव



**दिन-विशेष**
- प्रविण गजानन जमधाडे
सहाय्यक शिक्षक
श्री.अ.खि.नं.हायस्कुल,खामगाव



१४ नोव्हेंबर हा दिवस भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या दिवशी संपूर्ण देशभर बालदिन मोठ्या उत्साहाने आणि आनंदाने साजरा केला जातो. या दिवसाचे विशेष महत्त्व हे आहे की, तो भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन आहे. नेहरूंना मुलं फार प्रिय होती. त्यांनी नेहमीच मुलांवर अपार प्रेम व्यक्त केले आणि त्यांना देशाचे भविष्य मानले. त्यामुळे त्यांच्या जन्मदिवशीच भारतात बालदिन साजरा करण्याची प्रथा सुरू झाली.पंडित नेहरूंचा जन्म १४ नोव्हेंबर १८८९ रोजी अलाहाबाद (उत्तर प्रदेश) येथे झाला. त्यांचे वडील मोतीलाल नेहरू हे प्रसिद्ध वकील होते, तर आई स्वारूपराणी नेहरू या प्रेमळ गृहिणी होत्या. नेहरूंनी आपले शिक्षण इंग्लंडमध्ये घेतले आणि नंतर वकील म्हणून भारतात परतले. परंतु स्वातंत्र्य लढ्यातील त्यांचा सहभाग पाहता, त्यांनी देशसेवेला आपले जीवन अर्पण केले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९४७ साली ते देशाचे पहिले पंतप्रधान बनले. त्यांनी देशात औद्योगिक, शैक्षणिक आणि वैज्ञानिक प्रगतीसाठी अनेक योजना राबवल्या.

नेहरूंना मुलांबद्दल अपार प्रेम होते. त्यांच्या मते, आजची मुले उद्याचा भारत घडवतील. त्यांना विश्वास होता की, मुलांचे संगोपन योग्य प्रकारे झाले तर देशाचे भविष्य उज्ज्वल बनेल. त्यामुळे ते नेहमी मुलांशी संवाद साधत, त्यांच्यासोबत वेळ घालवत, आणि त्यांच्या आनंदात सहभागी होत. मुले त्यांना प्रेमाने चाचा नेहरू म्हणत. त्यांच्या या आपुलकीच्या स्वभावामुळेच त्यांच्या जन्मदिवशी देशभर बालदिन साजरा केला जातो.

बालदिन हा फक्त नेहरूंना आदर देण्याचा दिवस नसून, तो मुलांच्या हक्कांची आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाची आठवण करून देणारा दिवस आहे. या दिवशी मुलांचे शिक्षण, आरोग्य, सुरक्षा आणि आनंदी बालपण याबद्दल समाजात जनजागृती केली जाते. मुलांना योग्य शिक्षण, खेळ, पोषण आणि प्रेम मिळाले तरच ते देशाच्या प्रगतीसाठी मजबूत पाया ठरू शकतात, हा संदेश या दिवसाद्वारे दिला जातो.

या दिवशी देशभरातील शाळांमध्ये आणि महाविद्यालयांमध्ये विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. शिक्षक आणि विद्यार्थी मिळून गाणी, नाटके, कविता, चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, क्रीडा स्पर्धा इत्यादींचा आनंद घेतात. काही शाळांमध्ये शिक्षक विद्यार्थ्यांच्या भूमिकेत वावरतात आणि विद्यार्थ्यांना विश्रांती देतात. या वातावरणात मुलांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि उत्साह निर्माण होतो.

बालदिन साजरा करण्यामागील प्रमुख उद्देश म्हणजे मुलांबद्दल समाजात संवेदनशीलता निर्माण करणे. अनेक मुलांना आजही शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता यांचा अभाव आहे. अशा वेळी हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, प्रत्येक मुलाला जगण्याचा आणि शिकण्याचा समान अधिकार आहे. सरकार, पालक आणि शिक्षक यांनी मिळून प्रत्येक मुलाला संधी दिली पाहिजे, जेणेकरून ते आपले स्वप्न साकार करू शकतील.

पंडित नेहरूंचे विचार आजही तितकेच प्रेरणादायी आहेत. त्यांनी देशात विज्ञान, तंत्रज्ञान आणि शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी अनेक संस्था स्थापन केल्या. भारतीय तंत्रज्ञान संस्था भारतीय व्यवस्थापन संस्था आणि अंतराळ संशोधन संस्था यांच्या उभारणीसाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मते, शिक्षण हेच समाज बदलण्याचे सर्वात प्रभावी शस्त्र आहे. त्यांनी नेहमी मुलांना विचार करण्याची, शोध घेण्याची आणि नवीन गोष्टी शिकण्याची प्रेरणा दिली. १४ नोव्हेंबर या दिवशी पंडित नेहरूंच्या योगदानाची आणि त्यांच्या विचारांची आठवण केली जाते. हा दिवस मुलांमधील निरागसतेचा, आनंदाचा आणि भविष्याच्या आशेचा प्रतीक आहे.

बालदिनाच्या निमित्ताने विविध समाजसेवी संस्था आणि स्वयंसेवी संघटना गरीब आणि अनाथ मुलांसाठी विशेष कार्यक्रम आयोजित करतात. त्यांना अन्न, कपडे, पुस्तके आणि खेळणी दिली जातात, जेणेकरून त्यांनाही बालदिनाचा आनंद घेता येईल.

बालदिन म्हणजे फक्त साजरा करण्याचा दिवस नाही, तर तो मुलांच्या हक्कांबद्दल जागरूक होण्याचा दिवस आहे. प्रत्येक बालकाला सुरक्षित, आनंदी आणि शिक्षणाने संपन्न वातावरण मिळाले पाहिजे. नेहरूंच्या आदर्शांनुसार, देशाचे भविष्य घडवायचे असेल तर मुलांमध्ये ज्ञान, संस्कार आणि देशप्रेमाची भावना रुजवली पाहिजे. अशा प्रकारे, १४ नोव्हेंबर हा दिवस भारतासाठी केवळ एका महान नेत्याच्या स्मृतीचा दिवस नसून, मुलांच्या आनंदाचा आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठीच्या आशेचा उत्सव आहे. या दिवसातून आपल्याला हे शिकायला मिळते की, मुलांचे बालपण हेच देशाचा सर्वात मौल्यवान ठेवा आहे. त्यांचे संगोपन, शिक्षण आणि विकास याकडे लक्ष दिले, तर भारताचा उद्या अधिक समृद्ध, सशक्त आणि उज्ज्वल होईल.

म्हणूनच १४ नोव्हेंबर हा दिवस महत्त्वाचा आहे - कारण तो चाचा नेहरूंच्या प्रेमळ स्मृतीतून प्रत्येक मुलाच्या हास्यात फुलतो.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## संस्कारक्षम आदर्श पिता – रामजी आंबेडकर

**प्रासंगिक**
- उज्वलकुमार म्हस्के
(सिंदखेड राजा) संभाजीनगर
मो.-९२८४५३०४९२



जीवनात काही व्यक्ती स्वतःच्या महानतेने नव्हे, तर दुसऱ्याला महान बनविण्याच्या त्यागाने अमर होतात. अशाच तेजस्वी, पण विनम्र व्यक्तिमत्त्वाचे नाव म्हणजे रामजी मालोजी सकपाळ - आंबेडकर म्हणजेच भारतीय संविधानाचे निर्माते, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वडील.

१४ नोव्हेंबर १८४८ साली रामजी मालोजी सकपाळ यांचा जन्म झाला. ते ब्रिटिश सैन्यात सुभेदार पदावर कार्यरत होते. सैनिकी सेवेमुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात शिस्त, वक्तशीरपणा आणि जबाबदारीची खोल जाण निर्माण झाली. समाजात अस्पृश्यतेचा अंधकार असताना देखील त्यांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले. त्यांना ठाम विश्वास होता - ज्ञान हेच खरे सामर्थ्य आहे. या विचारातूनच त्यांनी आपल्या मुलांमध्ये शिक्षणाची ओढ निर्माण करण्याचे ध्येय आयुष्यभर जोपासले.

घरातील दारिद्र्य, जातीभेदाचा विळखा, सामाजिक बहिष्कार या सर्व प्रतिकूल परिस्थितीतही रामजी आंबेडकरांनी कधी हार मानली नाही. त्यांना माहित होते की शिक्षण हेच आपल्या समाजाच्या उद्धाराचे एकमेव शस्त्र आहे. लहान भीमरावाच्या बालपणीच त्यांच्या आई भीमाबाई यांचे निधन झाले. त्या नंतर वडिलांनीच आईची माया, शिक्षकाची शिस्त आणि मित्राचा सल्ला या तिन्ही भूमिका निभावल्या. त्यांनी लहान भीमरावाला अभ्यास, प्रार्थना आणि आत्मसंयम यांचे संस्कार दिले. एकदा शाळेत अस्पृश्यतेमुळे भीमरावला वर्गात बसण्याची आणि पाणी पिण्याची मुभा नव्हती. रडत- रडत तो घरी आला. तेव्हा रामजींनी त्याला आपल्या मांडीवर घेत शांतपणे सांगितले - "बाळा, तू शिकत राहा. तुझे शिक्षणच या जगाला बदलून टाकेल. "त्या एका वाक्यातून भीमरावांच्या मनात शिक्षणा विषयीची जिद्द आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा निर्माण झाली.

सैन्यातील नोकरी संपल्यानंतर रामजी आंबेडकर सातारा येथे स्थायिक झाले. तिथे त्यांनी आपल्या घराचे वातावरण शिक्षणकेंद्र बनवले. दररोज प्रार्थना, नियमित अभ्यास आणि आत्मनियंत्रण यांना ते प्राधान्य देत. मुलांच्या वर्तणुकीत शिस्त आणि सन्मान हे दोन गुण त्यांनी जोपासले. त्यानंतर त्यांचे कुटुंब मुंबई येथे स्थायिक झाले. छोट्या भीमरावाची वाचनाची जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी त्यागमूर्ती रामजींनी जीवापाड प्रयत्न केले. आपल्या पेन्शन मधील जास्तीत-जास्त रुपये ते भीमरावाच्या विद्यार्जनावर खर्च करीत. प्रसंगी आपल्या विवाहित मुलीचे दागिने गहाण ठेवून ते भीमरावांनी मागितलेली पुस्तके आणून देत. जगाच्या पाठीवर पुस्तक वाचण्याचा आपल्या मुलाचा बालहट्ट पुरविण्यासाठी अहोरात्र मेहनत घेणारा रामजी आंबेडकर सारखा आदर्श पिता, हे दुर्मिळ उदाहरण आहे. भीमराव शिक्षणासाठी मुंबई, बडोदा नंतर अमेरिकेपर्यंत पोहोचले ते केवळ आपल्या पित्याच्या प्रेरणेमुळे. प्रत्येक टप्प्यावर वडिलांचा आशीर्वाद आणि त्याग सोबत होता. त्यांच्या प्रोत्साहनामुळेच भीमराव जगातील सर्वश्रेष्ठ विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेऊ शकले.

रामजी आंबेडकरांनी आपल्या मुलाला केवळ शिक्षित केले नाही, तर त्याच्या अंतःकरणात आत्मसन्मान, शिस्त आणि समाज सेवेची जिद्द रुजवली. त्यांनी त्याला शिकवले की - तू स्वतःला कमी समजू नकोस; ज्ञान तुझा सर्वात मोठा मित्र आहे. याच संस्कारांतून भीमराव मोठे होत गेले आणि जगातील महान विचारवंत, समाजक्रांतिकारक, आणि भारतीय संविधानाचे निर्माता म्हणून उदयास आले. आज जेव्हा आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जीवनप्रवास पाहतो - कोलंबिया विद्यापीठापासून लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सपर्यंत आणि भारताच्या संविधान निर्मितीपर्यंत- त्या प्रत्येक टप्प्यामागे वडिलांचा निःशब्द त्याग आणि प्रेरणा दिसते.

रामजी मालोजी सकपाळ हे त्या काळातील असंख्य वंचित पितांचे प्रतीक आहेत, ज्यांनी स्वतःच्या दुःखावर मात करून आपल्या अपत्याला उज्ज्वल भविष्य दिले. त्यांनी जगाला दाखवून दिले की संस्कार, शिस्त आणि शिक्षण या तिन्ही गोष्टींचा संगमच व्यक्तिमत्त्व घडवतो. त्यांचा जीवनमार्ग आजच्या पालकांसाठीही प्रेरणादायी आहे. प्रत्येक पित्याने आपल्या मुलात स्वावलंबन, प्रामाणिकपणा आणि समाजभावना रुजवावी, हाच रामजींच्या आयुष्याचा खरा संदेश आहे.

वडिलांचा त्याग, आईचे समर्पण, घडविते भविष्य, उजळविते जीवन. "आणि " रामजींच्या संस्कारातून जन्मला तो भीमराया, ज्याने प्रजासत्ताक भारताचा घडविला पाया. रामजी मालोजी सकपाळ-आंबेडकर म्हणजे एका महान पुत्राचे महान पिता. त्यांचे जीवन हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या यशाचे पायाभूत शिल्प होते. अशा या संस्कारक्षम रामजी आंबेडकर या आदर्श पित्यास जयंती निमित्त विनम्र अभिवादन!

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

## नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५: काय करावे व काय करु नये ?

**(क्रमश:)**

आवश्यक असल्यास त्याबाबत सवलत मिळण्याविषयी अर्ज केले पाहिजेत व वेळीच अशी सवलत मिळविली पाहिजे. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिक्षेपक किंवा कोणत्याही इतर अशा सवलतीचा वापर करण्यासाठी योग्य परवानगी मिळविली पाहिजे. सभेमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तींना प्रतिबंध करण्यासाठी पोलिसांचे सहाय्य मिळविण्यात यावे. कोणत्याही मिरवणुकीची प्रारंभीची वेळ व जागा, मिरवणूक ज्या मार्गाने जाईल तो मार्ग व मिरवणुकीची अखेर होईल अशी वेळ व स्थान ही बाब आगाऊ स्वरुपात निश्‍चितपणे ठरविण्यात यावी व पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक ज्या वस्तीमधून जात असेल त्या वस्त्यांबाबत कोणतेही निर्बंधात्मक आदेश जारी केलेले असल्यास त्या विषयी खात्री करुन त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे सर्व वाहतूक नियमांचे व अन्य निर्बंधांचे अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीत कोणताही अडथळा निर्माण होऊ देऊ नये. ज्यांचा क्षेपके किंवा हत्यारे म्हणून गैरवापर होऊ शकेल अशा कोणत्याही वस्तू मिरवणुकीत सहभागी असलेल्या व्यक्तींनी बाळगू नयेत. मतदानाचे काम शांतता व सुव्यवस्थेने पार पडावे यासाठी सर्वतोपरी सर्व निवडणूक अधिकाऱ्यांना सहकार्य देण्यात यावे. मतदानाच्या दिवशी वाहनांच्या वापरावरील निर्बंधांचे पूर्णपणे पालन करण्यात यावे.

- मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक- **सुरेश बाबुराव देवकर** कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची) आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ पोस्टल नं.बीएलडी /२३९/२०२५-२७ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)

दैनिक महाभूमि

This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148 POSTAL NO.BLD/239/2025-27

दैनिक महाभूमि

# छत्रपती संभाजीनगर भूमि

शुक्रवार, १४ नोव्हेंबर २०२५

mahabhoomimarathwada@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### संविधान गौरव दिनानिमित्त वाहन रॅलीचे आयोजन




छत्रपती संभाजीनगर : संविधान गौरव दिनाच्या निमित्ताने २६ नोव्हेंबर रोजी सकाळी साडेदहा वाजता क्रांती चौकातून रॅली निघून डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधि महाविद्यालयात समारोप होणार आहे. रॅलीचे आयोजन महार रेजिमेंटचे माजी सैनिक व समता सैनिक दलाच्या वतीने होईल. प्राचार्य डॉ. प्रमोद हेरोडे, जालना जि.प.चे उपमुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, सर्वोच्च न्यायालयातील प्रसिध्द विधिज्ञ प्रा. डॉ. सत्यपाल यांची प्रमुख उपस्थिती राहील. यावेळी डॉ. कातकर भारतीय संविधानाचे एकमेव शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संसदीय लोकशाही या विषयावर मार्गदर्शन करतील.

### तळ्यात बुडून महिलेचा मृत्यू



छत्रपती संभाजीनगर : कापूस वेचण्यासाठी शेतात गेलेल्या मुलांना शेततळ्याच्या काठावर उभे राहून आवाज देताना तोल जाऊन मंदा सूर्यभान किरण (५६ वर्ष), रा. पळशी या शेतकरी महिलेचा मृत्यू झाला. ७ नोव्हेंबर रोजी घडलेल्या घटनेत ११ नोव्हेंबर रोजी त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. मंदा यांचे कुटुंब पळशी शेतातच राहण्यास असून घराजवळ शेततळे आहे. त्यांची मुले शेतात कापूस वेचत होती. त्यांना आवाज देण्यासाठी मंदा शेततळ्यावर उंचवट्यावर उभ्या राहिल्या. मात्र, याच दरम्यान त्यांचा तोल गेला व त्या थेट शेततळ्यात जाऊन पडल्या. याप्रकरणी चिकलठाणा पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

### निधनवार्ता

#### राहीबाई तुपे



वैजापूर : राहीबाई सर्जेराव तुपे (८६ वर्ष), रा. बाभुळगाव खुर्द यांचे बुधवार, १२ नोव्हेंबर रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## ‘इन्स्पायर ॲवार्ड’ प्रदर्शन सोहळ्याचे उद्‌घाटन...

# शालेय जीवनापासून विज्ञान निष्ठा जपावी : जिल्हाधिकारी स्वामी

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासून विज्ञान निष्ठा जपावी. वैज्ञानिक दृष्टीकोन विकसीत करुन जीवन सुखकर करावे, असा हितोपदेश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी इन्स्पायर ॲवार्ड प्रदर्शन सोहळ्यास सहभागी विद्यार्थ्यांना गुरुवार, १३ नोव्हेंबर रोजी केला.

भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभाग, नवी दिल्ली, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मुंबई, तसेच राज्य विज्ञान शिक्षण संस्था, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली व माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर आणि डॉ. सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महाविद्यालय, समर्थ नगर, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड प्रदर्शनाचे उद्घाटन सोहळा गुरुवारी तापडिया नाट्यमंदिर येथे उत्साहात पार पडला. प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर या होत्या. यावेळी उपशिक्षणाधिकारी सीमा मेहेत्रे, प्राचार्य, डॉ.



सौ. इंदिराबाई भास्करराव पाठक महिला कला महाविद्यालयाच्या डॉ. सुनीता बाजपाई, जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक दिलीप सिरसाट, समन्वयक डॉ. प्रभाकर गायकवाड आणि पर्यवेक्षिका प्रा. माधुरी भावसार उपस्थित होते. जिल्हाधिकारी स्वामी पुढे म्हणाले की, ‘अनेक महान वैज्ञानिकांच्या चरित्रामधून आपल्या लक्षात येते की, हे वैज्ञानिक विद्यार्थी दशेपासूनच प्रयोग करीत होते. सुरुवातीला त्यांचे प्रयोग उलटे-सुलटेही झाले, पण अथक प्रयत्नानंतर त्यांनी यश मिळविले. त्यांच्या या संशोधनामुळे आज आपले जीवन सुखकर झाले आहे.

अशा प्रदर्शनातून सहभागी होणारे विद्यार्थी विविध संशोधन संस्थांमध्ये मोठ्या पदावर कार्यरत आहेत. या प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनाही वैज्ञानिक होण्याची खूप मोठी संधी या निमित्ताने मिळत आहे. आजही विविध सामाजिक माध्यमातून मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा पसरवली जात आहे. आपल्याला यावर मात करून विज्ञाननिष्ठ होणे अतिशय महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय समारोप माध्यमिकच्या शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी केले. यावेळी प्रा. शंकर विधाते, दिलीप शिरसाट, प्राचार्य डॉ. सुनीता बाजपाई, डॉ. शिला जिरे, डॉ. प्रभाकर गायकवाड, शिक्षण विस्तार अधिकारी कल्पना पातकोंडे आदींची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी हळद व मिठाच्या रासायनिक अभिक्रियेतून सुवर्ण अक्षराने स्वतःचे नाव लिहून प्रत्यक्ष विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन केले.

### प्रदर्शनात ११८ विज्ञान प्रकल्प सादर

छत्रपती संभाजीनगर व जालना या दोन्ही जिल्ह्यांतील विविध शाळांमधून निवड झालेल्या ११८ विज्ञान प्रकल्पांनी या जिल्हास्तरीय प्रदर्शनात सहभाग घेतला आहे. १३ व १४ नोव्हेंबर रोजी हे प्रदर्शन जिल्ह्यातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि विज्ञानप्रेमींना खुले असणार आहे. या प्रकल्पातून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय स्पर्धेत भाग घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

## पालकमंत्री शिरसाठ यांच्याकडून मतदार यादीत घोटाळा : अंबादास दानवे

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी



जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांच्याकडून मतदार यादीत घोटाळा करण्यात आला असल्याचा आरोप शिवसेना नेते तथा विधान परिषदेचे माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी गुरुवार, १३ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत केला आहे. पालकमंत्री शिरसाट यांनी मतदार नोंदणी करणाऱ्या बीएलओवर दबाव आणून स्वत:च्या मुलीचे नाव मतदार यादीत टाकण्याचा प्रताप केला असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात सर्वत्र मतचोरी आणि बोगस मतदारांचा मुद्दा गाजत असतांनाच शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी पालकमंत्री शिरसाठ यांच्यावर केलेल्या आरोपामुळे जिल्ह्याचे राजकारण ढवळून निघाले आहे. यावेळी दानवे यांनी पुण्यातील कोरेगाव पार्क जमीन घोटाळ्यात मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडून उपमुख्यमंत्री अजित पवार आणि पार्थ पवार यांना वाचविले जात असल्याचे सांगितले. तसेच जमीन खरेदी व्यवहार रद्द झाला तरीही शासनाला मुद्रांक शुल्क भरावे लागते असे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे महसूलमंत्री बावनकुळे यांनी घेतलेली भूमिका अयोग्य असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

या जमीन घोटाळ्याची व्याप्ती मोठी असून याप्रकरणात पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना अटक करावी, तसेच पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणीही शिवसेना नेते अंबादास दानवे यांनी यावेळी केली. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी केलेल्या आरोपाला धनंजय मुंडे यांनी सामोरे गेले पाहीजे असेही दानवे यांनी यावेळी सांगितले.

## नगराध्यक्षपदासाठी संजय बोरनारे यांचा अर्ज दाखल

### वैजापुरात चौथ्या दिवशी अठरा उमेदवारी अर्ज दाखल

वैजापूर / प्रतिनिधी

नगर परिषदेच्या दोन डिसेंबरला होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी चौथ्या दिवशी नगराध्यक्ष पदासाठी एक व नगरसेवक पदासाठी सतरा असे अठरा उमेदवारी अर्ज दाखल झाले. त्यामुळे चौथ्या दिवस अखेर नगरसेवक पदासाठी दाखल अर्जाची संख्या वीस झाली आहे.



उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी शिवसेनेचे इच्छुक उमेदवार व बाजार समितीचे संचालक प्रशांत त्रिभुवन यांनी प्रभाग क्रमांक सातमधून उमेदवारी अर्ज दाखल केला होता तर तिसऱ्या दिवशी दोघांनी उमेदवारी अर्ज भरले. नगराध्यक्ष पदासाठी विद्यमान आमदार रमेश पाटील बोरनारे यांचे भाऊ संजय नानासाहेब बोरनारे यांनी शिवसेनेतर्फे आपला उमेदवारी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी डॉ अरुण जऱ्हाड यांच्याकडे दाखल केला. त्यांच्यासोबत आमदार रमेश पाटील बोरनारे, माजी आमदार भाऊसाहेब पाटील चिकटगांवकर, माजी नगराध्यक्ष साबेर खान, खुशालसिंह राजपूत उपस्थित होते.

## पाचोरा ते छत्रपती संभाजीनगर बससेवा सुरू

वरठाण / प्रतिनिधी

पाचोरा आगाराने पाचोरा ते छत्रपती संभाजीनगर मुक्कामी बस फेरी बुधवार, १२ नोव्हेंबर रोजी सुरु केली आहे. या बस सेवेमुळे तिडका आणि बोरमाळ तांडा येथील शालेय विद्यार्थ्यांची गैरसोय दूर झाली आहे. ही बस सकाळी साडेनऊ वाजता तिडका येथून पाचोरा येथे जाणार आहे. तर पुन्हा दुपारी तीन वाजता पाचोरा येथून सातगाव डोंगरी मार्गे तिडका, बोरमाळ तांडा येथे सायंकाळी चार वाजेपर्यन्त परत येणार आहे.

पाचोरा ते छत्रपती संभाजीनगर मार्गावर पाचोरा आगाराने मुक्कामी बससेवा सुरु केल्याने विद्यार्थ्यांसह शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. पाचोरा येथून एसटी बस घेवून आलेल्या चालक, वाहकाचा बोरमाळ तांडा येथे शाल, श्रीफळ, पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला. यावेळी शेतकरी संघटनेचे



मराठवाडा उपाध्यक्ष पुंडलिक कदम, माजी सरपंच विठ्ठल आप्पा, स्वामी दयानंद विद्यालय माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक राजपूत, रामदास गवळी, शेख फईम, ईश्वर सपकाळ, राजाराम शेळके, जोरसिंग चव्हाण, कैलास चव्हाण, सरपंच सदाशिव राठोड, हिरालाल चव्हाण, रामेश्वर राठोड, अजिनाथ साबळे, अशोक कोलते, बळीराम जाधव, मलखान चव्हाण आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

## महार वतन जमिनीच्या मुद्यावर राज्यव्यापी आंदोलन करणार

### बसपाचे प्रदेशाध्यक्ष सुनील डोंगरे यांची माहिती

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

कोणताही पक्ष विचारधारेवर निवडणूक लढवत असतो. जातीपाती मिटवून सर्वांना समान संधी देण्याच्या मुद्द्यावर बहुजन समाज पार्टी राज्यात २८८ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतीच्या निवडणुका स्वबळावर लढणार आहे. शेतकरी कर्जमाफी, महार वतनाच्या जमिनीच्या मुद्यावर पक्ष लवकर राज्यव्यापी आंदोलन करणार आहे, अशी माहिती बहुजन समाज पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुनील डोंगरे यांनी गुरुवार, १३ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत दिली.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राजकीय पक्षांची तयारी सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बसपाने निवडणूक लढवण्याची घोषणा केली. राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या एकूण सहा हजार ८५९ जागा आहेत. कुणाशीही युती, आघाडी न करता पक्ष स्वबळावर लढणार आहे. या निवडणुकीत पक्ष चांगली कामगिरी करील. राज्यात शेतकरी आत्महत्या आणि शेतीच्या समस्या वाढल्या आहेत. सरकारला कर्जमाफी करण्यास भाग पाडू आणि महार वतनाच्या जमिनीच्या मुद्द्यावर कायदेशीर लढा देणार आहे, असे डोंगरे यांनी सांगितले. देशभरात मतदारयाद्यात घोळ असून निवडणूक आयोगाने कामकाजात पारदर्शकता जपताना कुणाच्या दबावाखाली काम करू नये. ईव्हीएमद्वारे निवडणूक म्हणजे लोकशाहीचा खून आहे, अशी भूमिका पहिल्यांदा बसपा नेत्या मायावती यांनी घेतली होती, असे डोंगरे म्हणाले. यावेळी जिल्हाध्यक्ष मुकुंद सोनवणे, नानासाहेब म्हस्के उपस्थित होते.

## सातारा परिसरात घरफोडी; सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

बीड बायपास परिसरातील सुधाकर नगरात घरफोडी करीत चोरट्यांनी सोन्याच्या दागिन्यांसह २ लाख २२ हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला. या प्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अब्दुल रहमान अब्दुल रशीद रा. सुधाकर रोड बीड बायपास यांनी फिर्याद दिली. फिर्यादीनुसार मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी रात्री दोन अज्ञात चोरट्यांनी फिर्यादींच्या घराचा कडी कोंडा तोडून आत प्रवेश केला.कपाटात ठेवले ४० हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन, ४० हजार रुपये किंमतीचे नेकलेस, २० हजार रुपये किंमतीच्या तीन अंगठ्या, १० हजार रुपये किंमतीचे कानातले रिंग, २० हजार रुपये किंमतीचे चांदीचे पैंजण, ८२ हजार रुपये रोख असा २ लाख २२ हजार रुपये किंमतीचा ऐवज लंपास केला.

## ‘त्या’ तलावातून जलपर्णी काढण्याचे काम सुरू

छत्रपती संभाजीनगर : येथील सलीम अली सरोवरातील जलपर्णी काढण्याचे काम महापालिकेने बुधवारी सुरू केले. सहा वर्षापूर्वी लाखो रुपये खर्च करून जलपर्णी काढण्यात आली होती. सध्या सरोवरामध्ये ड्रेनेजचे पाणी सोडण्यात येत आहे. शुद्ध पाण्यात जलपर्णी कधीच येत नाही. हर्सूल तलावात आजपर्यंत जलपर्णीने जन्म घेतला नाही. सलीम अली सरोवरातील पाण्यात फिनाइल व क्लोरिनचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे जलपर्णी झपाट्याने वाढते, असे पर्यावरणतज्ज्ञ किशोर पाठक यांनी सांगितले. जलपर्णी नैसर्गिकरीत्या जलशुद्धी करणारी वनस्पती असून ती कायम ठेवली पाहिजे. तलावात येणारे ड्रेनेजचे पाणी बंद केल्यास पक्ष्यांचा वावर वाढेल असेही त्यांनी स्पष्ट केले.

दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.
डॉ.ए.एच.शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बस स्टॅंडसमोर,हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)
9021111549 / 7020614645
www.drshaikhah.com

## मदतीच्या नावाने फसवणूक; पैसे घेणाऱ्या तरुणावर गुन्हा

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

युध्दग्रस्त पॅलेस्टाईन व गाझापट्टीतील नागरिकांना मदत करण्याचे आवाहन करीत स्वतःचा क्यूआर कोड देत संस्थेच्या नावाने निधी गोळा केल्याप्रकरणी आरोपीवर सिटी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सय्यद बाबर सय्यद अली मेहमूद अली उर्फ सय्यद बाबर अली रजवी कादरी रा.बदामगल्ली किराडपुरा असे आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणी पोलिस अंमलदार योगेश एकनाथ सावंत यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार ७ जुलै ते ६ ऑक्टोबर दरम्यान आरोपीने इमाम अहमद रजा फाउंडेशन औरंगाबाद व रजा एम्पॉवरमेंट फाउंडेशन औरंगाबाद ही संस्था कुठेही नोंदणीकृत नसताना संस्थेला बाहेर देशात आर्थिक निधी पाठवण्याबाबत समाज माध्यमात पोस्ट प्रसारित केली. पॅलेस्टाईन व गाझा मधील मदत कार्यासाठी पाठिंबा देण्याचे आवाहन केले.

लोकांचा विश्वास संपादन करून देणगी गोळा केली. देणगी गोळा करताना आर्थिक फायद्यासाठी स्वतःच्या बँक खात्याच्या क्यूआर कोड वापरला. लोकांची फसवणूक करून निधी जमा केल्याप्रकरणी सिटी चौक पोलिसांनी आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक मनोज शिंदे करीत आहेत.

## बालानगरात शिक्षण परिषद उत्साहात

पैठण : येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत बुधवार, १२ नोव्हेंबर रोजी शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी मनोज चव्हाण, शिक्षण विस्तार अधिकारी रंगनाथ आढाव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी मुख्याध्यापक विष्णू भंडारे, मुख्याध्यापक रमेश मुळे, राजेंद्र गायकवाड, राजीव सातव, ललिता राऊत, निळकंठ देशमुख सुरेखा सातपुते, मुकुंद कुळकर्णी, मिट्ट आगाशे, रेखा तोंडे, सुनिता मगर, अनिता बालोद, सुनिता बनसोडे, सुरेखा सातपुते जयंदा चव्हाण आदी उपस्थित होते.

### जाहीर प्रगटन

२ रे सह दिवाणी न्यायालय क-स्तर, वैजापूर याचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज नं.३६७/२०२५
प्रदिप रावसाहेब देवकर वि. निरंक

अर्जदार : प्रदिप रावसाहेब देवकरवय -३१ वर्ष, धंदा -शेती रा. लाख खंडाळा, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

विषय :- : मुंबई रेग्युलेशन कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी वरिल अर्जदार यांनी मा. न्यायालयात ॲड. एम. के. जाधव यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे वडिल नामे रावसाहेब बाबुराव देवकर यांचे दिनांक ०६/०५/२००६ रोजी मौजे लाख खंडाळा, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे व अर्जदार यांची आई नामे सुमनबाई रावसाहेब देवकर यांचे दिन. २९/०८/२०२५ रोजी निधन झालेले आहेत. अर्जदार हे मयत रावसाहेब बाबुराव देवकर व सुमनबाई रावसाहेब देवकर यांचे कायदेशीर वारस आहेत व इतर दुसरे कोणते वारस नाही. असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

मयत रावसाहेब बाबुराव देवकर व सुमनबाई रावसाहेब देवकर यांच्या मृत्युनंतर अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी मयत रावसाहेब बाबुराव देवकर व सुमनबाई रावसाहेब देवकर यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणपत्राची मागणी होत असल्यामुळे अर्जदार यांनी सदरील अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार हेच मयत रावसाहेब बाबुराव देवकर व सुमनबाई रावसाहेब देवकर यांचे कायदेशीर वारस आहेत असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार यांच्या नावाने वारसहक्क प्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कोणास उजर, आक्षेप, हरकत असेल अशांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीस आल्यापासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप नोंदवावा.

दिनांक : ७/११/२०२५

आदेशावरुन

क.लिपीक शिक्का अधिक्षक
दिवाणी न्यायालय क-स्तर वैजापूर

### जाहीर प्रगटन

२ रे सह दिवाणी न्यायालय क-स्तर, वैजापूर याचे न्यायालयात
दिवाणी किरकोळ अर्ज नं.३७६/२०२५
जनार्धन अंकुश तागड वि. निरंक

अर्जदार : १) जनार्धन अंकुश तागड वय -४३ वर्ष, धंदा -शेती रा. नागमठाण, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर. २) संभाजी अंकुश तागड, वय -३८ वर्ष, धंदा- शेती रा. नागमठाण, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर. ३) मंदा अंकुश तागड, वय-६५ वर्षे, धंदा-शेती, रा. नागमठाण, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

विषय :- : मुंबई रेग्युलेशन कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्या अर्थी वरिल अर्जदार यांनी मा. न्यायालयात ॲड. एम. के. जाधव यांचे मार्फत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क्रं. १ ते२ यांचे वडिल व अर्जदार क्रं ३ यांचे पती नामे अंकुश मुरलीधर तागड यांचे दिनांक २९/०९/२०२१ रोजी मौजे रा. नागमठाण, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर. येथे निधन झालेले आहेत. अर्जदार हे मयत अंकुश मुरलीधर तागड यांचे कायदेशीर वारस आहेत व इतर दुसरे कोणते वारस नाही. असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

मयत अंकुश मुरलीधर तागड यांच्या मृत्युनंतर अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी मयत अंकुश मुरलीधर तागड यांचे अर्जदार हेच कायदेशीर वारस आहेत असे प्रमाणपत्राची मागणी होत असल्यामुळे अर्जदार यांनी सदरील अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार हेच मयत अंकुश मुरलीधर तागड यांचे कायदेशीर वारस आहेत असे अर्जदार यांचे म्हणणे आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदार यांच्या नावाने वारसहक्क प्रमाणपत्र देण्याबाबत ज्या कोणास उजर, आक्षेप, हरकत असेल अशांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्दीस आल्यापासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर आक्षेप नोंदवावा.

दिनांक : ११/११/२०२५

आदेशावरुन

क.लिपीक शिक्का अधिक्षक
दिवाणी न्यायालय क-स्तर वैजापूर

### जाहीर प्रगटन

उपविभागीय अधिकारी, (महसुल) वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात

अर्जदार :- दादासाहेब बाळनाथ पवार रा. हनुमंतगाव ता. गंगापूर जि छत्रपती संभाजीनगर

गैरअर्जदार :- ग्रामपंचायत कार्यालय माळीसागज ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर

**विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदी बाबत**

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून अर्जदार यांनी त्यांचे चुलते नामे राधु गंगाराम पवार यांनी त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे यांचे चुलते नामे राधु गंगाराम पवार यांची मृत्यू नोंद दिनांक ०१/०१/१९७८ रोजी मौजे माळीसागज ता. वैजापूर येथे झालेला आहे.

अर्जदार यांचे आई मृत्यू नोंद दिनांक ०१/०१/१९७८ रोजी मौजे माळीसागज ता. वैजापूर असा असून वैक्तिक कामासाठी मृत्यू प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार मागणी केल्यानुसार मृत्यू नोंद दिनांक ०१/०१/१९७८ रोजी मौजे माळीसागज ता. वैजापूर येथे झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक ०३/१२/२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदार यांचा मृत्यू नोंद दिनांक ०१/०१/१९७८ रोजी मौजे माळीसागज ता. वैजापूर येथे मृत्यू झाल्याचे मृत्यू प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला आक्षेप/उजर ग्राहय धरला जाणार नाही. करीता दिनांक १३/११/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे

शिक्का स्वाक्षरीत/-
**उपविभागीय अधिकारी**
**वैजापूर**

### जाहीर प्रगटन

उपविभागीय अधिकारी, (महसुल) वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात

अर्जदार :- शेख ईस्माईल शेख दादा रा. वैजापूर ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर

**विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदी बाबत**

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून अर्जदार यांनी त्यांचे स्वत नामे शेख उस्मान शेख दादा यांनी त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे यांचे स्वत नामे शेख उस्मान शेख दादा यांची जन्म नोंद दिनांक १३/०६/१९६८ रोजी मौजे वैजापूर ता. वैजापूर येथे झालेला आहे.

अर्जदार यांचे जन्म नोंद दिनांक १३/०६/१९६८ रोजी मौजे रा. वैजापूर ता. वैजापूर असा असून शालेय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार मागणी केल्यानुसार जन्म नोंद दिनांक १३/०६/१९६८ रोजी मौजे रा. वैजापूर ता. वैजापूर येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २५/११/२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदार यांचा जन्म नोंद दिनांक १३/०६/१९६८ रोजी मौजे रा. वैजापूर ता. वैजापूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला आक्षेप/उजर ग्राहय धरला जाणार नाही. करीता दिनांक ११/११/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे

शिक्का स्वाक्षरीत/-
**उपविभागीय अधिकारी**
**वैजापूर**

### जाहीर प्रगटन

उपविभागीय अधिकारी, (महसुल) वैजापूर जिल्हा छत्रपती संभाजीनगर यांचे न्यायालयात

अर्जदार :- शेख उस्मान शेख दादा रा. वैजापूर ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी नगर परिषद वैजापूर ता. वैजापूर जि छत्रपती संभाजीनगर

**विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदी बाबत**

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी या कार्यालयास अर्ज सादर करून अर्जदार यांनी त्यांचे स्वत नामे शेख उस्मान शेख दादा यांनी त्यांचे जन्म प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे यांचे स्वत नामे शेख उस्मान शेख दादा यांची जन्म नोंद दिनांक ०५/०५/१९६७ रोजी मौजे वैजापूर ता. वैजापूर येथे झालेला आहे.

अर्जदार यांचे जन्म नोंद दिनांक ०५/०५/१९६७ रोजी मौजे रा. वैजापूर ता. वैजापूर असा असून शालेय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार मागणी केल्यानुसार जन्म नोंद दिनांक ०५/०५/१९६७ रोजी मौजे रा. वैजापूर ता. वैजापूर येथे झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसाच्या आत म्हणजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २५/११/२०२५ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरुपात आपला आक्षेप नोंदवावा, मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदार यांचा जन्म नोंद दिनांक ०५/०५/१९६७ रोजी मौजे रा. वैजापूर ता. वैजापूर येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदती नंतर आलेला आक्षेप/उजर ग्राहय धरला जाणार नाही. करीता दिनांक ११/११/२०२५ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले आहे

शिक्का स्वाक्षरीत/-
**उपविभागीय अधिकारी**
**वैजापूर**

### जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, श्रीमती स्नेहल एस. जाधव मॅडम, व. स्तर औरंगाबाद यांच्या न्यायालयात.

सिव्हिल एम.ए.नं. २३९३/२०२५
नि.क्र.

अर्जदार : १) संकेत पिता संजय कोल्हे, रा. ह.मु.पिंपळगांव पांढरी, ता जि.छत्रपती संभाजीनगर २) राणी संजय कोल्हे, रा. सदर. ३) यमुना संजय कोल्हे, रा. सदर ४) बाबुराव गणपत कोल्हे रा. सदर.५) कौशल्याबाई बाबुराव कोल्हे रा. सदर.

विरुध्द

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन

**प्रकरण : हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेबाबत.**

या जाहीर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, वरील अर्जदार यांनी ॲड. **कपिल डी. गायकवाड** यांच्या मार्फत मा. दिवाणी न्यायालय, व.स्तर औरंगाबद येथे वारस (हेअरशिप) प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, मयत संजय बाबुराव कोल्हे हे मौजे पिंपळगांव पांढरी, ता. जि.छ. संभाजीनगर येथील रहिवासी होते व ते दिनांक ११/०६/२०२१ रोजी मौजे पिंपळगांव पांढरी, ता. जि.छ. संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. अर्जदार नं.१ हा मयत संजय बाबुराव कोल्हे यांचा मुलगा असून, अर्जदार नं.२ ही मयताची मुलगी आहे व अर्जदार नं ३ ही मयताची पत्नी आहे अर्जदार नं. ४ व मयताचे आई वडिल आहेत. मयत संजय बाबुराव कोल्हे यांना अर्जदारा शिवाय इत्तर कोणतीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार नं. १ ते ५ हे मयत संजय बाबुराव कोल्हे यांचे कायदेशीर वारस असुन अर्जदारास त्याचे शासकीय व निमशासकीय कामे करण्याकामी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता अर्जदाराने प्रस्तुतचा हा अर्ज.मे. न्यायालयात दिलेला आहे. वरील अर्जदारांनी या अर्जा व्यतिरीक्त अन्य कोणत्याही न्यायालयात इतर कोणत्याही कायद्याखाली हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला नाही. अशा परिस्थितीत अर्जदारांच्या नावे हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्याचा हुकूम व्हावा, याकामी सदरील अर्जदारांचा अर्ज हा मंजुर होणे न्याय्य व योग्य आहे.

ज्या कोणाचा हेअरशिप प्रमाणपत्र देण्याबाबत आक्षेप व उजर असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत दिवाणी न्यायालयात व. स्तर औरंगाबाद येथे स्वतः किंवा वकीला मार्फत आक्षेप/उजर नोंदवावा मुदतीत न आलेला आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही आणि अर्जदारांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रकरणात पुढील तारीख २३/१२/२०२५ ठेवण्यात आलेली आहे. करीता हे जाहीर प्रगटन

दिनांक: १३/११/२०२५

आदेशावरुन

क.लिपीक शिक्का सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर औरंगाबाद

## न्यूज ब्रीफ

### पाचोरा ते बोरमाळ तांडा बससेवा सुरू

**सोयगाव :** शालेय विद्यार्थ्यांसाठी पाचोरा ते बोरमाळ तांडा बससेवा सुरू करण्यात आली असून, यामुळे विद्यार्थ्यांची सुविधा होणार आहे. बस सुरू करण्यासाठी बोरमाळ तांडा ग्रामपंचायतमार्फत सरपंच सदाशिव राठोड, तिडका येथील शाळेनेही पाठपुरावा केला होता. गावकऱ्यांतर्फे जोरसिंग चव्हाण व कैलास चव्हाण यांच्या हस्ते चालक व वाहक यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी हिरालाल चव्हाण, रामेश्वर राठोड, अजिनाथ साबळे, अशोक कोलते, बळीराम जाधव, मलखान चव्हाण, पुंडलिक कदम आदी उपस्थित होते.

### मजुरांअभावी कपाशीचे नुकसान

**जालना :** जाफ्राबाद तालुक्यातील देळेगव्हाण, गाडेगव्हाण, पोखरी, सातेफळ, शिराळा आदी परिसरात अतिवृष्टीमुळे कापसाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यातच आता मजुरांअभावी शेतकऱ्यांचा कापूस शेतातच पडल्याचे दिसून येत आहे. एका वेचणीतच कापसाच्या पऱ्हाट्या होणार असल्याचे शेतकरी सांगत आहेत. मजुरांची टंचाई निर्माण झाल्याने शेतात पांढरे सोने म्हणून ओळखला जाणारा कापूस वाया जात आहे. शिवाय, अवकाळी पावसाची शक्यता असल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे.

### विनातिकीट रेल्वे प्रवाशांवर कारवाई

**परभणी :** नांदेड दक्षिण मध्य रेल्वे विभागाच्या पथकाने सिंगणापूर हॉल्ट रेल्वेस्थानक येथे मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी सकाळपासून विशेष तिकिट तपासणी मोहीम राबविली. यामध्ये विनातिकीट प्रवाशांवर दंडात्मक कारवाई केली. परभणी, गंगाखेड आणि मानवत रोड आदी स्थानकावर अचानक तपासणी करण्यात आली. यामध्ये राज्यराणी, बेंगलोर एक्स्प्रेस, हैदराबाद-पूर्णा, गुंटूर एक्स्प्रेस, रायचूर एक्स्प्रेस, परळी-अकोला, मनमाड-नांदेड पॅसेंजर, संपर्क क्रांती, नगरसोल-काचीगुडा, पुणे एक्स्प्रेस यासह विविध रेल्वे गाड्यांमध्ये विनातिकीट प्रवाशांवर कारवाई करून ६४ हजार ७०० रुपयांची दंड आकारणी केली.

### किमान तापमान १०.८ अंशांवर



**परभणी :** शहर परिसरात थंडीचा कडाका कायम असून तेते तीन दिवसांपासून किमान तापमान हे १० ते ११ अंश सेल्सिअस दरम्यान राहत आहे. या वाढलेल्या थंडीच्या कडाक्यामुळे सकाळच्या वेळी नागरिक ऊबदार कपडे परिधान करून तसेच शेकोटी करून बचाव करीत आहेत. रविवार, सोमवार, मंगळवार सकाळपासूनच कडाक्याची थंडी जाणवत आहे.

---

### नियम वाऱ्यावर; ग्राहकांसाठी असलेल्या सुविधा कागदावरच

# पेट्रोल पंपावर मोफत हवा, पाणी, स्वच्छतागृह सेवेला हरताळ

**परभणी /प्रतिनिधी**

पेट्रोल पंप म्हणजे केवळ इंधन घेण्याचे ठिकाण नसून ग्राहकांसाठी काही मूलभूत सुविधा देणे बंधनकारक आहे. शासनाने मोफत हवा, स्वच्छ पिण्याचे पाणी, महिलांसाठी व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, तसेच प्राथमिक उपचार पेटी व इंधन गुणवत्तेची तपासणी उपलब्ध ठेवणे अनिवार्य केले आहे. मात्र, वास्तव चित्र पूर्णपणे वेगळे आहे. परभणी जिल्ह्यातील अनेक पेट्रोल पंपांवर या सुविधा केवळ फलकावर आहेत, प्रत्यक्षात मात्र काहीच नाही.

परभणी जिल्ह्यातील बहुतांश पेट्रोल पंपांवर हवा भरण्याचे यंत्र कार्यरत नाही. तांत्रिक बिघाडामुळे सेवा बंद असे फलक कायमस्वरूपी लावलेले दिसतात. काही ठिकाणी ग्राहकांना वाहनाची हवा तपासून घ्यायची असली तरी कर्मचारी टाळाटाळ करतात. हवा भरण्यासाठी स्वतंत्र स्टाफ ठेवणे कंपन्यांना खर्चिक वाटत असल्याने ही सुविधा कायम बंद ठेवली जाते. पिण्याच्या पाण्याबाबतही अशीच अवस्था आहे. काही ठिकाणी गंजलेले नळ, फुटलेली पाइपलाइन आणि कोरडी पाण्याची टाकी दिसते. पाणी उपलब्ध नाही, असे उत्तर कर्मचारी सहज देतात. पण प्रत्यक्षात पाणी महिना महिना येतच नाही.

प्रत्येक पेट्रोल पंपावर महिलांसाठी आणि पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह असावे, असा नियम आहे. मात्र, वास्तवात या शौचालयांची स्थिती अतिशय वाईट आहे. नळांमधून पाणी नाही, मजले चिखलाने माखलेले, छतावर कोळीचे जाळे आणि दुर्गंधीमुळे



आत जाणेही कठीण. काही पंपांवर शौचालयांचे दरवाजे कायम बंद ठेवलेले आहेत किंवा त्यावर कुलूप लावलेले असते. ग्रामीण भागातील महिलांना त्यामुळे मोठी गैरसोय सहन करावी लागते. अनेकदा त्या प्रवासात शौचालय न वापरता पुढचा पंप येईपर्यंत थांबतात, पण पुढेही तीच परिस्थिती असल्याचे ॲड. शिरीन बारे यांनी सांगितले.

#### पंपावरील प्रथमोपचार पेट्या नावालाच

■ पेट्रोल पंप चालविण्यासाठी शासन आणि तेल कंपन्यांकडून ठराविक अटी पूर्ण करणे आवश्यक असते. त्यासाठी परवाना घेताना सर्व सुविधा उपलब्ध असल्याचे कागदोपत्री दाखविले जाते. मात्र, प्रत्यक्षात त्या सुविधा नसतात. तपासणीसाठी अधिकारी आल्यावर काही दिवस दाखविण्यापुरत्या सेवा सुरू केल्या जातात आणि नंतर पुन्हा सगळे बंद ठेवण्यात येते. तसेच पेट्रोल पंपावर प्रथमोपचार पेटी ही नावालाच असते. काही ठिकाणी प्रथमोपचार पेटी असते, पण त्यात पट्टी, ॲंटिसेप्टिक क्रीम किंवा औषधी नसल्याचे चित्र दिसून येते.

#### जिल्ह्यात एकूण ११० पेट्रोल पंप

■ परभणी जिल्ह्यात सुमारे ११० पेट्रोल पंप कार्यरत आहेत. शहरामध्ये काही प्रमाणात सुविधा राखल्या जात असल्या तरी तालुका व ग्रामीण भागातील पंपांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. जिंतूर, पाथरी, गंगाखेड, सेलू, सोनपेठ परिसरातील अनेक पंपांवर सुविधा नाहीत. काही पेट्रोल पंपांवरच महिला शौचालय दिसते, परंतु ते वापरण्यायोग्य नसते. दरम्यान, पुरवठा विभागाकडूनही नियमित तपासणी होत नसल्याने पंपचालक निर्धास्त झाले आहेत.

---

# खंडाळा येथील मतदारांची दुबार नावे निवडणुकीआधी कट करा

### सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जानराव यांची मागणी

**वैजापूर/प्रतिनिधी**



तालुक्यातील खंडाळा येथील मतदार यादीतील मतदारांची दुबार असलेली नावे काही स्थलांतरित व मयत नावे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीपुर्वीच कट करण्यात यावी अशी मागणी खंडाळा येथील सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र जानराव यांनी उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड, व तहसीलदार सुनील सावंत, यांच्याकडे बुधवार, १२ नोव्हेंबर रोजी निवेदनाद्वारे केली आहे.

उपविभागीय अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वैजापूर तालुक्यातील खंडाळा येथील मतदार याद्यांमध्ये मोठा घोळ असुन अनेक मतदारांची मतदार यादीत दुबार नावे आहेत. अनेक नावे वेगवेगळ्या वार्डाच्या यादीत आहेत. त्याचबरोबर पंधरा ते वीस वर्षांपासून जी लोक गाव सोडून दुसरीकडे स्थलांतरित झालेली आहेत ज्यांचा परत गावाशी कुठलाही संबंध नाही असेही मतदार मोठ्या प्रमाणात यादीत आहेत. तसेच मयत झालेली नावे सुद्धा अनेक वर्षापासून तशीच यादीत आहेत. निवडणूक आयोगाने विशेष लक्ष देऊन जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकी आधीच ही नावे मतदार यादीतून कट करावीत, आदी मागण्या या निवेदनात राजेंद्र जानराव यांनी केली आहे. तसेच मतदार यादीत दुबार नावे आढळल्यास संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करावी अशी मागणीही या निवेदनात करण्यात आली आहे.

---

# शहरावर प्रेम करणाऱ्यांना मनपा निवडणुकीत संधी देणार

### मनसे जिल्हाध्यक्ष सुमीत खांबेकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

निष्ठावान, चारित्र्यवान आणि शहरावर निस्सीम प्रेम असणाऱ्या तरुणांना महापालिका निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून संधी देण्यात येणार आहे, अशी माहिती मनसेचे जिल्हाध्यक्ष सुमीत खांबेकर यांनी मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत दिली.

खांबेकर म्हणाले की, रोजगार उपलब्ध होत नसल्याने शहरातील लाखो तरुणांना नोकरीच्या शोधात पुणे, मुंबईला जावे लागले आहे. याला जबाबदार सत्ताधारी आहेत. वंदे मातरम् गीत जरूर प्रत्येकाने गावे, पण कोट्यवधी रुपये खर्चुन बांधलेले वंदे मातरम् सभागृह केवळ वीज बिल न भरल्याने धूळ खात पडून आहे, याला जबाबदार कोण असा सवाल आमचा असल्याचे त्यांनी सांगितले.

नवीन पाणीपुरवठा योजनेचे पाणी मिळण्याची प्रत्येक नेते सतत तारीख सांगत असतात. मात्र, प्रत्यक्षात २७०० कोटी रुपये खर्चुनही आजही शहरवासीयांचे पाण्यासाठी हाल होत आहेत. जालना रोडवर सलग उड्डाणपूल बांधत नसल्याने शहरवासीयांना रोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. असे अनेक प्रश्न घेऊन मनसे महापालिका निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे खांबेकर यांनी सांगितले. सध्या आम्ही संपूर्ण प्रभागात उमेदवार देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, शिवसेना (उबाठा) पक्षासोबत युतीविषयी पक्षप्रमुख राज ठाकरे यांचे आदेश आले तर युतीमध्ये निवडणूक लढविली जाईल. या पत्रकार परिषदेत मनसेचे पदाधिकारी आशिष सुरडकर, गजन गौडा पाटील, बिपीन नाईक, मनीष जोगदंडे, अभय देशपांडे, प्रशांत अटोले आदींची उपस्थिती होती.

---

### डॉ.ढाकणे महाविद्यालयात राष्ट्रीय शिक्षण दिन उत्साहात



**जालना :** रोहणवाडी येथील डॉ. सुभाषराव ढाकणे कॉलेज ऑफ बी एस्सी नर्सिंग मध्ये मौलाना आझाद जयंती राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरी करण्यात आली. यावेळी शरद कवानकर, प्राचार्य डॉ.श्रीनाथ कुलकर्णी, प्रा.पुरुषोत्तम गायकवाड, प्रा.कोमल इंगोले, प्रा.आराधना वानखेडे, प्रा.अतुल थोरात, सचिन निसर्गन, सौरभ बनछोड, आकाश मेहेर, सुमन कणिसे, गंगाधर माळी उपस्थित होते.

---

# दहा रुपये किलोचा भाव देऊनही कापूस वेचणीला मजूर मिळेना

**परभणी/प्रतिनिधी**

शेतकऱ्यांसमोरील अडचणींची मालिका काही कमी होताना दिसत नाही. अतिवृष्टी, शेतमालाला मिळत नसलेला अपेक्षित भाव अशा अस्मानी, सुलतानी संकटासमोर बळीराजा हवालदिल झाला आहे. शेतात अतिवृष्टीतून वाचलेली पिके पदरात पाडून घेण्यासाठी कसरत करीत आहे. त्यात वेचणीला आलेला कापूस मजुरांअभावी भिजून गेला. आता दहा रुपये प्रति किलो वेचणी देऊनही मजूर मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

एकीकडे कापूस वेचण्याची घाई, दुसरीकडे मजुरांचे वाढते दर आणि त्यातच मजुरांची टंचाई, अशा अनेक कोंडीत शेतकरी सापडत असून शेतकरी हवालदिल झाला आहे. देवगाव फाटा परिसरात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांनी मेहनतीने व कष्टाने उभे केलेला कापूस पीक आता



शेवटच्या टप्प्यात आला आहे. मात्र, मजूर मिळत नसल्याने कापूस मातीत मिसळत असल्याची स्थिती असून शेती करावी तर कशी, असा सवाल कापूस उत्पादक शेतकरी बाबुराव मोरे, राजेंद्र कांबळे आदी शेतकऱ्यांमधून उपस्थित केला जात आहे.

---

# सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवणे हाच आमचा अजेंडा : उपमुख्यमंत्री

### शिवसेनेचा कार्यकर्ता मेळावा उत्साहात

**परभणी/प्रतिनिधी**

सर्वसामान्य जनतेने आम्हाला खुर्चीवर बसवले असून त्यांचे प्रश्न सोडवणे हाच आमचा प्रमुख अजेंडा असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. परभणी येथील महात्मा फुले महाविद्यालयाच्या मैदानावर आयोजित शिवसेनेच्या संवाद मेळाव्यात मार्गदर्शन करताना ते बुधवार, १२ नोव्हेंबर रोजी बोलत होते.

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख विशाल कदम, महानगराध्यक्ष आनंद भरोसे, माजी मंत्री जयप्रकाश मुंदडा आदींसह पक्ष्याचे विविध आघाडीचे प्रमुख, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान परभणी जिल्ह्यातील उजळंबा येथे एमआयडीसी, नागोबा मंदिर देवस्थान विकास, माळीगल्ली येथील महादेव मंदिर जिर्णोद्धार, परभणी शहरासाठी समांतर पाणीपुरवठा योजना आणि अंडरग्राउंड ड्रेनेज आदी कामे येत्या काळात पूर्ण करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिले.

---

# ७० वर्षांनंतर पहिल्या जागतिक धम्म परिषदेचे भीमटेकडीवर आयोजन

### २६ फेब्रुवारी ते २ मार्चदरम्यान होणार धम्म परिषद

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

तब्बल ७० वर्षांनंतर भारतात पहिली जागतिक धम्म परिषद छत्रपती संभाजीनगरच्या भीमटेकडीवर आयोजित करण्यात येत असून या परिषदेच्या स्वागताध्यक्षपदी विजय मगरे व प्राचार्य सुनील वाकेकर या दोघांची निवड करण्यात आली आहे. परिषदेच्या संयोजिका पू. प्रा. भिक्खुनी धम्मदर्शना महाथेरी यांनी शुक्रवार, ७ नोव्हेंबर रोजी पत्रकार परिषदेत दिली.

२६ फेब्रुवारी ते २ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत ही परिषद भीमटेकडीवरील २५ एकरांवर उभारण्यात येणाऱ्या भव्य मंडपात होईल. २५ देशांतून बौद्ध अनुयायी येणार असून उपासक-उपासिकांची संख्या २ लाखांच्यावर राहील, असे पू. माताजींनी सांगितले. माताजी म्हणाल्या, मागील वर्षभरापासून या परिषदेची तयारी सुरू आहे. पालकमंत्री संजय शिरसाट यांचेही सहकार्य मिळत आहे. धम्म, शांती आणि करुणेचा जागतिक संदेश पुन्हा एकदा मिळणार आहे. याचा एक भाग म्हणून धम्मदीक्षेचा सोहळाही आयोजित करण्यात येणार आहे. एकूण ५० एकर परिसरात ही धम्मपरिषद होईल. शेकडो स्वयंसेवक, उपासक-उपासिका आणि सामाजिक कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. पत्रकार परिषदेला आर्याजी संघशीला, अनिलकुमार बस्ते, डॉ. धनराज गोंडाने, विजय मगरे, ॲड. रामेश्वर तायडे, रतनकुमार साळवे, अनिता हिवाळे, सोनाली जोहरे, दीपक लव्हाळे, सुनील दांडगे, भानुदास डोके, अमोल दांडगे, प्रा. सुनील वाकेकर, जोगेंद्र तायडे, अनिकेत ओव्हाळ, डॉ. प्रकाश इंगळे, मीना काकडे, सुधाकर उमाळे आदी उपस्थित होते.

---

# दिल्ली बॉम्बस्फोटाची चौकशी करून दोषींवर कारवाई करा

### विविध मागण्यांसाठी काँग्रेसचे धरणे आंदोलन

**परभणी/प्रतिनिधी**

दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाची सखोल चौकशी करून आरोपींवर कठोर कारवाई करावी, तसेच विविध प्रलंबित प्रश्नांबाबत तातडीने कार्यवाही करावी, या मागण्यांसाठी शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येस कारणीभूत असलेल्या पोलिस अधिकारी व राजकीय नेत्यांवर तातडीने चौकशी करून कठोर कारवाई करावी, तसेच महार वतनाची ४० एकर जागा अनाधिकृतपणे हडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या पार्थ पवार यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी केली. पीक नुकसानग्रस्तांना तातडीने नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी मागणी शहर जिल्हाध्यक्ष नदीम अहेमद इनामदार, भगवान वाघमारे, ॲड. मुजाहिद खान, गुलमीर खान, विनोद कदम, अशिष वाकोडे, दिगंबर खरवडे, अंगद सोगे, सुहास पंडित आदींनी निवेदनाद्वारे केली.

---

### रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचा गळीप हंगाम सुरु

# शेतकऱ्यांनी ऊस तोडण्याची घाई करु नये : रावसाहेब पाटील दानवे

**जाफ्राबाद/प्रतिनिधी**



उसात साखर निर्माण झाल्याशिवाय ऊस तोडण्याची घाई शेतकऱ्यांनी करू नये असे आवाहन माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी केले. भोकरदन तालुक्यातील सिपोरा बाजार येथील रामेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या गळीप हंगामाच्या शुभारंभप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

भोकरदन तालुक्यातील सिपोरा बाजार येथील रामेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या आवारात झालेल्या या कार्यक्रमास आमदार संतोष पाटील दानवे, कन्नडच्या आमदार संजना जाधव, साखर कारखान्याचे संचालक उध्दव पाटील दुनगहू, बुऱ्हाणपूर येथील प्रजापिता ईश्वरी केंद्राच्या मंगला दीदी, कारखान्याचे चेअरमन विजय परिहार, भास्कर दानवे, बाबुराव बोत्रे पाटील, गोविंद पंडित, शालिकराम म्हस्के, सुरेश दिवटे, राजेश चव्हाण, मधुकर गाढे यांच्यासह रामेश्वर सहकारी साखर कारखान्याचे संचालक मंडळ व तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकरी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना आमदार संतोष पाटील दानवे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना ऊस लावा कारखाना



जगवा असे आवाहन केले. तसेच रावसाहेब पाटील दानवे यांच्या माध्यमातून ऊस उत्पादक सहकार्य करत असून ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी आपला ऊस रामेश्वर सहकारी साखर कारखान्याला द्यावा असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलतांना आमदार संजना जाधव म्हणाल्या की, माझ्या मतदारसंघात ६ लाख टन ऊसाचे उत्पादन असून बारामतीपेक्षा जास्त ऊसाला भाव दिल्यास माझ्या मतदारसंघातील ऊस रामेश्वर सहकारी साखर कारखान्याला पाठवेल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

#### केटीवेअर बंधाऱ्यामुळे ७५ किलोमिटर पाणी साचते

■ पूर्णा नदीवर जागोजागी १२ केटीवेअर बंधारे बांधले आहेत. प्रत्येक केटीवेअर बंधाऱ्यामध्ये पाच किलोमीटर पाणी साचते. एका केटीवेअर बंधाऱ्यामध्ये पाच किलोमीटरपर्यंत पाणी साचते. अशाप्रकारे १२ केटीवेअर बंधाऱ्यामध्ये ७५ किलोमीटरपर्यंत पाणी साचते असे माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी यावेळी सांगितले.

---

# वैजापूर तालुक्यातील टेंभी येथे शेतीशाळा उत्साहात

**वैजापूर/प्रतिनिधी**

तालुक्यातील टेंभी येथे तालुका कृषी विभागाच्या वतीने पोकरा योजनेतील रब्बी कांदा पिकावरील शेतीशाळा घेण्यात आली. शेतीशाळेत उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार यांनी रब्बी हंगामातील कांदा लागवडीविषयी मार्गदर्शन केले.

हवामान बदल अनुकूल तंत्रज्ञानाचा वापर कांदा नर्सरी तयार करताना कांदा बियाण्यास ट्रायकोडर्मा ,बायोमिक्स या जैविक औषधींची बीज प्रक्रिया करून नंतर बीबीएफ यंत्राच्या साह्याने बेडवर पेरणी करावी तसेच पुनर्लागवड करताना बेडवरती लागवड करावी व त्यापूर्वी रोपांना बीज प्रक्रिया करावी त्यामुळे कांद्यावर येणारे पिळ्या, मर,व करपा हे रोग नियंत्रणात राहतील याविषयी मार्गदर्शन केले. एनआरपीचे शास्त्रज्ञ डॉ. सूर्यकांत पवार यांनी व तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के यांनी बेडवरील लागवडीने केलेला कांदा उत्पादनातील वाढ व साठवणूक करताना काही समस्या येतात का



याविषयी शेतकऱ्यांशी संवाद साधला.

या शेतीशाळेस कृषी मित्र भाऊसाहेब पवार, राजू पवार, देवदत्त पवार, कृषी विभागाचे कैलास गावडे ,सोनाली महाले, मोनाली डोईफोडे, दिनेश पवार, सिताराम पवार, नानासाहेब पवार, अनिल पवार, गौरव पवार, संदीप पवार, गजानन पवार, केशव पवार, विनोद पवार, निलेश पवार, बाजीराव पवार, तुषार चांगले, भाऊसाहेब दुशिंग, दिनकर दुशिंग, जितू मोरे, समीर पठाण, रवींद्र जाधव, आप्पासाहेब सवाई, संदीप ढवळे, गोरख गायकवाड, अमोल शेळके, फिरोज शेख, संभाजी हेलुडे, दादासाहेब काळे, द्वारकादास गायकवाड, सोमनाथ आव्हाड आदी उपस्थित होते.

शेती शाळेत कांदा रोपवाटिका पेरणी करण्यापूर्वी बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक सहाय्यक कृषी अधिकारी विद्या पालवे यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना करून दाखविले तसेच कांदा बियाणे रोपवाटिकेत बीबीएफ यंत्राच्या साह्याने पेरणी प्रत्यक्ष शेतावर प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंडळ कृषी अधिकारी मंगेश घोडके यांनी केले. तर आभार प्रदर्शन उपकृषी अधिकारी माधव गांगुर्डे यांनी केले.

## न्यूज ब्रीफ

### शरद पवारांच्या निर्णयाचे जरांगे यांनी केले स्वागत



**वडिगोद्री** : स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत मूळ ओबीसींना उमेदवारी देण्याच्या शरद पवार यांच्या निर्णयाचे मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी स्वागत केले आहे. ते म्हणाले, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मूळ ओबीसींना उमेदवारी दिली पाहिजे, हा शरद पवार यांचा निर्णय चांगला असून आम्हाला दुःख होण्याचं काही कारण नाही. अंतरवाली सराटी येथे पत्रकारांशी बोलताना जरांगे यांनी हे मत व्यक्त केले. यावेळी संतोष देशमुख खून प्रकरणावर बोलताना ते म्हणाले, दादा गरुडचा व्हिडिओ व्हायरल झाला असून या व्हिडिओत मस्साजोगचे मयत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांना २० कोटींची धनंजय मुंडेंची ऑफर होती, असा दावा आरोपीन गरुडने केला आहे. त्यामुळे या प्रकरणाचा पोलिसांनी सखोल तपास केला पाहिजे. दादा गरुडने व्हिडीओत ज्यांची नावं घेतली त्यांना चौकशीला आणलं पाहिजे, अशी मागणी जरांगे यांनी केली आहे.

## निधनवार्ता

### लिलाबाई बोडखे



**धावडा** : लिलाबाई पुंडलिक बोडखे (६४ वर्ष), रा. वालसावंगी, ता.भोकरदन यांचे गुरुवार, १३ नोव्हेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. धावडा येथील शिक्षक मनिष बोडखे यांच्या त्या आई होत.

---

जालना जिल्हा परिषदेतील प्रकार ; आ. बबनराव लोणीकर मांडणार मुद्दा

# ११८ कोटींचा निधी गेला परत !

**जालना/प्रतिनिधी**

गेल्या चार साडेचार वर्षांपासून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नसल्यामुळे या संस्थांवर प्रशासकराज आहे. मात्र, याकाळात विकासकामांसाठी आलेला कोट्यवधींचा निधी वेळेत खर्च करण्यात आला नसल्याने तो परत गेला आहे. जालना जिल्हा परिषदेचा मागील चार वर्षात तब्बल ११८ कोटींचा निधी शासनाकडे परत गेल्याची बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी समोर आणली आली आहे. याविषयी त्यांनी प्रशासकीय कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला असून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांची भेट घेऊन याबाबत जाब विचारला आहे.

जालना जिल्हा परिषदेवर गेल्या चार साडेचार वर्षांपासून प्रशासकराज आहे. राज्यातील सर्वच जिल्हा परिषदांवर प्रशासक आहेत. दरम्यान, याकाळात शासनाकडून दरवर्षी देण्यात येणारा निधी जिल्ह्यातील विविध विकास कामांवर खर्च करणे आवश्यक असते. जालना जिल्हा परिषदेलाही दरवर्षी अर्थसंकल्पातील तरतुदींनुसार शासनाकडून निधी उपलब्ध करून जातो. मात्र, या निधीतील बहुतांश निधी हा खर्च न केल्यामुळे शासनाकडे परत गेल्याची गंभीर बाब आमदार बबनराव लोणीकर यांनी समोर आणली आहे. दरम्यान, याविषयी त्यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांची नुकतीच भेट घेऊन तब्बल ११८ कोटींचा निधी खर्च करण्यात आला नसल्याबाबत तीव्र संताप व्यक्त केला. निधी वेळेत खर्च न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी देखील त्यांनी केली.

याबाबत आमदार लोणीकर म्हणाले, शासनाचा हा निधी गावातील शाळांचा, रस्त्यांचा, पाण्याचा, आरोग्याचा, महिलांच्या सक्षमीकरणाचा होता. परतूर-मंठा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये आजही शाळांना डेस्क नाहीत, रुग्णालयात औषध नाही, रस्ते खराब आहेत, पिण्याच्या पाण्याच्या योजना रखडलेल्या आहेत. यासाठी जिल्हा परिषदेकडे पैसा होता. पण तो वापरला गेला नाही, ही अत्यंत शरमेची बाब आहे. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी एम यांनी देखील गंभीर दखल घेतली असून निधी वेळेत खर्च करण्यासाठी त्या कठोर पावले उचलणार असल्याचे आमदार लोणीकर यांनी सांगितले.

**वर्षनिहाय परत गेलेला निधी**

| | |
|---|---|
| २०२१-२२ : | २४ कोटी ३९ लाख रुपये |
| २०२२ - २३ : | १७ कोटी ९७ लाख रुपये |
| २०२३ - २४ : | १९ कोटी ५३ लाख रुपये |
| २०२४-२५ : | ५६ कोटी ०५ लाख रुपये |
| एकूण : ४.५ वर्षात : | ११८ कोटी ५४ लाख रुपये |

**हे खपवून घेणार नाही**



■ हा पैसा जनतेचा आहे. तो परत जाणं म्हणजे जनतेशी विश्वासघात आहे. मी हे खपवून घेणार नाही. याबाबत मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले आहे. या प्रकरणाची गांभीर दखल घेऊन चौकशी करावी, ज्यांच्यामुळे हा निधी परत गेला, त्यांच्यावर योग्य ती कारवाई करावी. याशिवाय हा मुद्दा येणाऱ्या हिवाळी अधिवेशनात देखील मांडणार आहे.

**-आमदार बबनराव लोणीकर**

**विशेष मोहीम राबवणार**



■ जिल्हा परिषदेच्या अखर्चित निधीसाठी डिसेंबरअखेर उर्वरित निधी खर्च करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जाईल.

**-मिन्नू पी. एम.**
मुख्य कार्यकारी अधिकारी, जालना.

---

## २३ ग्रामपंचायतींना आता मिळणार नवी इमारत

शासनाकडून ४८५ लाखांचा निधी मंजूर

**जालना / प्रतिनिधी**

जिल्ह्यातील २३ ग्रामपंचायतीला स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी शासनाकडून मंजुरी मिळाली आहे. दरम्यान, ४८५ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला असून जालना तालुक्यातील सर्वाधिक ९ ग्रामपंचायतींचा यामध्ये समावेश आहे.

जिल्ह्यातील ज्या ग्रामपंचायतींना स्वतःच्या कार्यालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ग्रामपंचायतींना स्वतंत्र कार्यालयाची इमारत बांधण्यासाठी बाळासाहेब ठाकरे स्मृती मातोश्री ग्रामपंचायत बांधणी योजने अंतर्गत निधी मंजूर करण्यात आला आहे. त्या संबंधित पत्र ग्रामविकास विभागाने काढले आहे. दरम्यान, इमारत बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अंमलात आणून, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुवीजन, आण्याच्या व ऊर्जेच्या वापरात काटकसर, पर्जन्य जलपुनःर्भरण आणि जास्तीत जास्त पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य व साधन वापरून बांधकामे करावी, असे आदेशित करण्यात आले आहे. बांधकाम जास्तीत जास्त एक वर्षात पूर्ण करण्याचे नियोजन आणि इमारत बांधकामाचा त्रैमासिक अहवाल शासनाला वेळीच पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**या आहेत ग्रामपंचायती**

- मंठा : देवठाना (मंठा), कीर्तापूर,
- परतूर : कोकाटे हादगाव,
- बदनापूर : चिखली, तुपेवाडी, राजेवाडी (शे),
- अंबड : बनटाकळी, चिकनगाव,
- भोकरदन : वाढोणा, रजाळा,
- माळेगाव, विझोरा, भिवपूर,
- जालना : निधोना, पानशेंद्रा, श्रीकृष्णनगर, साळेगाव, तांदुळवाडी, शेवगा/सारवाडी, वानडगाव, ममदाबाद आणि टाकरवन.
- घनसावंगी : देवी दहेगाव

---

## कॉर्डिओ, रेडिओ टेक्नॉलॉजीस्टची आयव्हस कार्यशाळा

एनजीओप्लास्टी, हृदयाच्या अत्याधुनिक शस्त्रक्रियांबाबत मार्गदर्शन



**जालना / प्रतिनिधी**

आशीर्वाद बहुउद्देशीय संस्था संचलित कॉर्डिओ, रेडिओ मेडिकल ट्रेनिंग च्या वतीने कॉर्डिओ, रेडिओ टेक्नॉलॉजीस्ट साठी रविवारी जालना येथे इमेजिंग इंटरप्रिटेशन आयव्हस वर कार्यशाळा घेण्यात आली. यात एनजीओग्राफी, एनजीओप्लास्टी, हृदयाशी संबंधित अत्याधुनिक शस्त्रक्रिया, उपचार पद्धतीबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी डॉ.अर्जुन सातपुते, डॉ.शिल्पा देशमुख यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी डॉ.विष्णू भुते, वैभव कुलकर्णी,सुरेश बांगर, रमेश कांबळे, रामेश्वर वाघमारे, उमेश धावणे, विनोद दाबुगडे , विवेक पहाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ.अर्जुन सातपुते यांनी प्लाक मॉडिफिकेशन टुल्स या विषयावर मार्गदर्शन करताना एनजीओ प्लास्टी शस्त्रक्रियेदरम्यान रोटा वायर, कटिंग बलून, लिथोट्रेप्सी, कॅल्शियम, तसेच भविष्यातील आयव्हस स्टडी या बाबत चलचित्रफितीद्वारे सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ.शिल्पा देशमुख यांनी आयव्हस वन, टू, थ्री इसेन्शिअल या विषयावर माहिती दिली. डॉ. विष्णू भुते यांनी अत्याधुनिक शस्त्रक्रियांबाबत माहिती मिळण्यासाठी कार्यशाळांची गरज असल्याचे नमूद केले. रमेश कांबळे यांनी एसीआरएमटीद्वारे राबवल्या जाणाऱ्या शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशीष रसाळ यांनी केले. रामेश्वर वाघमारे यांनी आभार मानले.

---

## उसाच्या ट्रॅक्टरला धडकून एकाचा मृत्यू

**अंबड** : तालुक्यातील अंबड ते तीर्थपुरी रस्त्यावर बेलगाव शिवारातील भोला सिंग फाटा परिसरात उसाने भरलेल्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीला धडक बसून एका तरुणाचा जागीच मृत्यू झाल्याची घटना सोमवार, १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी घडली. गणेश सुर्यभान नरवडे (४४ वर्ष), रा. भारडी असे मृत व्यक्तीचे नाव आहे. गणेश नरवडे हे दुचाकी क्रमांक (एमएच-२१-सीडी-३८१८) वरून अंबडहून भारडीकडे जात होते. बेलगाव शिवारातील मनोहर मोताळे यांच्या शेताजवळील रस्त्यावर उसाने भरलेली ट्रॉली (एमएच-१६-एच-३३९७) रस्त्याच्या मधोमध उभी असल्याने अंदाज न आलेल्याने गणेश नरवडे यांना ती दिसली नाही. त्यामुळे मोटारसायकल ट्रॉलीला जोरदार धडक बसून ते गंभीर जखमी झाले आणि जागीच मृत्यू झाला.

---

## शेतकऱ्यांच्या थेट खात्यात पैसे जमा : विजय चव्हाण

अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याची प्रक्रिया सुरू

**अंबड / प्रतिनिधी**

सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीनंतर गावपातळीवर तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या त्रिस्तरीय समितीमार्फत पंचनामे करण्यात आले. त्यानुसार प्राप्त झालेल्या बाधीत शेतकरी व क्षेत्राच्या याद्या अपलोड करण्यात आल्या असून अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होत असल्याची माहिती तहसिलदार विजय चव्हाण यांनी दिली.

महाराष्ट्र शासनाने ४ नोव्हेंबर रोजीच्या शासन निर्णयातून रब्बी करिता व इतर बाबींसाठी विशेष मदत जाहीर केली आहे. याअंतर्गत, बाधीत क्षेत्रांना प्रति हेक्टरी १० हजार रुपये प्रमाणे देय रक्कम देण्याचे आदेशित आहे. या लाभासाठी देखील याद्या अपलोड होत असून लवकरच हे अनुदानही शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होईल. एनडीआरएफ अनुदानासाठी एकूण पात्र खातेदार २८ हजार ६५१ असून या सर्व खातेदारांच्या खात्यात पैसे जमा करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

दरम्यान, २५ हजार ४१६ खातेदारांची ई - केवायसी प्रलंबित आहे. त्यामुळे ई-केवायसी पूर्ण झाल्याशिवाय त्यांच्या खात्यात पैसे जमा होणार नाहीत. त्याचप्रमाणे १८८ खातेदारांचे पेमेंट विविध कारणांमुळे म्हणजे आधार - बँक लिंक नसणे, आधार तपशील न जुळणे आदीमुळे रिजेक्ट झाले आहे. रब्बी हंगाम विशेष मदतीसाठी २९ हजार ६५५ खातेदार अपलोड करण्यात आले असून उर्वरित पात्र खातेदारांच्या याद्याही तत्काळ अपलोड करण्याचे काम सुरू आहे.

**तलाठ्यांना माहिती द्यावी**

■ एसडीआरएफ अनुदान जमा झालेले १७९३ शेतकरी असून १८९२ शेतकऱ्यांची ई - केवायसी प्रलंबित आहे. ज्या शेतकऱ्यांनी अद्याप आपली माहिती पंचनाम्यासाठी किंवा मदतीसाठी दिलेली नाही, त्यांनी तत्काळ आपल्या तलाठी यांच्याशी संपर्क साधून माहिती जमा करावी, असे आवाहन तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे.

---

## शेतकरी हतबल ! पांढऱ्या सोन्यावर अवकळा; मजूर मिळेनात

४ किलो कापसाला मोजावे लागतात ४५ रुपये

**भोकरदन / प्रतिनिधी**

तालुक्यात मागील काही दिवसांपासून अवकाळी पावसाने उघडीप दिल्याने शेतातील फुटलेल्या कापूस वेचणीची लगबग शेतकऱ्यांकडून सुरू आहे. मात्र, सोयाबीन आणि मका काढणीच्या कामांमुळे शेतमजूर व्यस्त झाल्याने, कापूस वेचणीसाठी मजूर मिळणे दुरापास्त झाले आहे. यामुळे पांढरे सोने शेतातच पडून राहण्याची वेळ हवालदिल शेतकऱ्यांवर आली आहे.



मागील काही दिवसांपूर्वी अवकाळी पावसाने थैमान घातल्यामुळे कपाशी आणि मका, सोयाबीन पिकांचे मोठे नुकसान झाले होते. शेतात पाणी साचून चिखल झाल्याने कपाशीचे बोंड ओले झाले होते. आता पावसाने उघडीप दिल्यावर तापत्या उन्हात कपाशीचे बोंड फुटले असून, शेतात पांढराशालू पांघरल्याचे सुंदर दृश्य दिसत आहे. मात्र, हे पांढरे सोने वेचण्यासाठी शेतकरी धडपडत आहेत. सध्या तालुक्यात सोयाबीन काढणीला वेग आला आहे. सोयाबीन काढणीसाठी जास्त मजुरी मिळत असल्याने सर्वाधिक शेतमजूर तिकडे वळले आहेत. परिणामी, कापूस वेचणीसाठी मजूर मिळत नाहीत.

ज्या ठिकाणी मोजकेच मजूर उपलब्ध होत आहेत, तेथे २० किलो कापूस वेचणीकरिता तब्बल ३०० ते ३५० रुपये मजुरी मोजावी लागत आहे. म्हणजेच, ४ किलो कापसासाठी शेतकऱ्याला ४० ते ४५ रुपये द्यावे लागत आहेत. मजूर शोधण्यासाठी शेतकऱ्यांना आता सकाळी लवकर वाहन घेऊन त्यांच्या दारात जावे लागत आहे. इतकेच नव्हे, तर मजुरांना घरून शेतात ये-जा करण्यासाठी रिक्षा भाडे सुद्धा शेतकऱ्यांच्या खिशातून द्यावे लागत आहे. असे असतानाही वेळेवर मजूर मिळत नसल्याने बाहेर गावावरून जादा मजुरी देऊन मजुरांना आणावे लागत असल्याने शेतकऱ्यांचा कापूस वेचणीचा खर्च वाढला आहे.

**दुहेरी संकटात शेतकरी**

■ अगोदरच पावसाने त्रस्त झालेल्या शेतकऱ्याला आता जादा दराने सोयाबीन काढणी आणि कापूस वेचणी करावी लागत असल्याने शेतकरी पूर्णपणे हवालदिल झाला आहे. एका बाजूला मक्याचे पीक खराब झाले, तर दुसऱ्या बाजूला कापूस वेचणीसाठी मजूर मिळत नाहीत. यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला असल्याचे फत्तेपूर येथील शेतकऱ्याने सांगितले.

---

## वाहतुकीस अडथळा ठरणारा पोल आरटीओंनी केला बाजूला

**जालना / प्रतिनिधी**

घनसावंगी-जालना मार्गावरील गाडे सावरगाव जवळ एक विद्युत पोल धोकादायक स्थितीत रस्त्यावर आडवा झाला होता. याच मार्गावरून मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांना ही बाब लक्षात येताच नागरिकांच्या मदतीने तो विद्युत पोल बाजूला केला.

या रस्त्यावरून प्रामुख्याने दुचाकी वाहनांची वाहतूक होत असते. एखादा दुचाकीस्वार अथवा वाहनधारकाचा पोलला धडकून अपघात घडू नये म्हणून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल आणि वाहनचालक संतोष थोरात यांनी स्वतः स्थानिकांची मदत घेऊन तो पोल उचलून सुरक्षितपणे उचलून बाजूला केला.

वाहतुकीच्या रस्त्यावर लोखंडी पोल अथवा फलक वाहतुकीस अडथळा किंवा धोका निर्माण करू शकतील, अशा स्थितीत दिसून आल्यास तत्काळ उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालय, पोलिस किंवा सार्वजनिक बांधकाम विभागास त्वरित संपर्क साधून कळवावे किंवा स्वतः ते रस्त्यावरून हटवून मदत करावी, असे आवाहनही चिंतल यांनी केले आहे.

---

## भास्कर अंबेकर यांचा सत्कार

**सिंधीकाळेगाव** : शिवसेना उबाठा पक्षाचे जालना जिल्हाप्रमुख भास्कर अंबेकर यांनी आपल्या समर्थकांसह उपमुखमंत्री एकनाथ शिवसेनेत प्रवेश केला. यानिमित्त शिवसेना तालुका प्रमुख भगवान अंभोरे, कृष्णा जाधव यांनी त्यांचा सत्कार केला.

## श्री. कालभैरव महाराज जयंती उत्सव

**धावडा** : भोकरदन तालुक्यातील धावडा येथील श्री.स्वामी समर्थ केंद्र व गावकऱ्यांच्या सहकार्याने येथील श्री. कालभैरव महाराजांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. येथील कालभैरव जयंती उत्सवात जालना, छत्रपती संभाजीनगर, जळगाव जिल्ह्यातील शेंदुर्णी, सावळदबारा, जळगाव सपकाळ, शिवना, अजिंठा, धावडा, वालसावंगी, विझोरा, भोकरदन येथील सेवेकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमासाठी किशोर देशमुख, गजानन आखाडे, शुभम डोईफोडे, किसन दुतोंडे, आशिष देशमुख, उमेश पधाडे, सुभाष वेल्हाळ, कुणाल मोकासरे, गजानन वेंडोले यांच्यासह भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यावेळी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

## वंचितच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन

**जालना** : मराठवाड्यातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा विभागीय जनसंपर्क कार्यालय जालना शहरातील अंबड चौफुली येथे सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयाचे उद्घाटन वंचितचे राष्ट्रीय अध्यक्ष अँड. बाळासाहेब आंबेडकर यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी नवनाथ वाघमारे, मराठवाडा उपाध्यक्ष अँड. अशोक खरात, दिपक डोके, शंकर लिंगे, व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## पादुका दर्शन सोहळ्याने बदनापूर नगरी दुमदुमली

शिलाई मशीन वाटप, सामुहिक गुरुपूजन सोहळा




**बदनापूर / प्रतिनिधी**

स्वामी नरेंद्राचार्य महाराज यांच्या पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन मंगळवार, ११ नोव्हेंबर रोजी बदनापूर शहरात करण्यात आले. यावेळी शहरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

शहरातील सिद्धिविनायक गणपती मंदिराजवळील भव्य मैदानावर हा सोहळा मोठ्या श्रद्धा भक्तिभावाने पार पडला. सकाळी नगरातील प्रमुख रस्त्यांवरून ढोल-ताशांचा गजर, कलशधारी महिला, ध्वजधारी मंडळी, लेझीम व बँड पथक, वारकरी संप्रदाय यांच्या सहभागातून मिरवणूक काढण्यात आली. यावेळी संस्थानच्या सामाजिक उपक्रमांतर्गत ४३ गरीब व गरजू महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले. यानंतर सामुहिक गुरुपूजन सोहळा पार पडला. नानिजधाम येथून आगमन झालेल्या प्रवचनकार विद्या परब यांनी उपस्थित भाविकांना प्रबोधनपर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास आ. नारायण कुचे, माजी आ. कैलास गोरंट्याल, नगराध्यक्ष विलास जऱ्हाड, उपनगराध्यक्ष सय्यद मुजमील, भाजपा तालुकाध्यक्ष भगवान मात्रे, नगरसेवक गोरख खैरे, देवेश पाथ्रीकर, सुभाष जोजारे आदींची उपस्थिती होती.

---

मराठा महासंघाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे

# धुळखात पडून असलेली एमआरआय मशीन सुरू करा

**जालना / प्रतिनिधी**

जिल्हा सामान्य रुग्णालयासाठी शासनाच्या निधीतून अत्याधुनिक एमआरआय मशीन प्राप्त होऊन वर्ष उलटले असतानाही ते अद्याप कार्यान्वित झालेले नाही. या गंभीर निष्क्रियतेविरोधात मराठा महासंघाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे निवेदन सादर करत तत्काळ मशीन कार्यान्वित करण्याबाबत साकडे घातले.

उपमुख्यमंत्री शिंदे हे बुधवार, १२ नोव्हेंबर रोजी जालना दौऱ्यावर असताना मराठा महासंघाचे राष्ट्रीय विभागीय चिटणीस अरविंद देशमुख, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष रोहित देशमुख, सुदर्शन देशमुख त्यांची भेट घेऊन निवेदन दिले. जालना जिल्हा रुग्णालयात लाखो रुपयांची अत्याधुनिक एमआरआय यंत्रसामग्री आजही धुळखात पडली आहे. शासनाने सर्वसामान्य जनतेला मोफत सुविधा मिळावी या हेतूने हे मशीन पुरवण्यात आले. मात्र वर्षभर झाले तरी ते सुरू न झाल्याने गरीब रुग्णांना खाजगी रुग्णालयांत ६ ते ८ हजार रुपये देऊन तपासणी करावी लागत आहे. हे शासनाच्या उद्दिष्टांना हरताळ फासणारे आहे.




मशीनच्या उद्घाटनात राजकीय कारणे वा खाजगी केंद्रांचा दबाव अडथळा ठरत असल्याची माहिती स्थानिक पातळीवर मिळत आहे. जर हे सत्य असेल, तर हा प्रकार गोरगरिबांच्या आरोग्याशी अन्याय करणारा आहे. लवकरात लवकर एमआरआय मशीन कार्यान्वित झाले नाही, तर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलनाचा पर्याय स्वीकारावा लागेल, असा इशारा या निवेदनात देण्यात आला आहे.

**महामंडळाची वेबसाईट बंद**

■ स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची वेबसाईट गेल्या दोन महिन्यापासून बंद असल्याने कर्ज प्रकरणे दाखल करता येत नसल्याने महाराष्ट्रातील हजारो युवकांची मोठी अडचण होत आहे. कर्ज प्रकरण प्रक्रिया पूर्णपणे ठप्प झाल्याने यात लक्ष घालून वेबसाईट सुरू करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी यावेळी अरविंद देशमुख यांनी केली.

## नितीश रेड्डी कसोटी मालिकेला मुकण्याची शक्यता

# कोलकाता कसोटीत ध्रुव जुरेलला संधी



**नवी दिल्ली :** भारतीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक रायन टेन डोइशेट यांनी बुधवारी सांगितले की, यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेल दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात खेळेल. अष्टपैलू नितीश रेड्डी कसोटी मालिकेला मुकण्याची शक्यता आहे. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना कोलकाता येथे खेळला जाईल.

''आमच्याकडे संघ संयोजनाबाबत आता बरीच स्पष्टता आहे. गेल्या सहा महिन्यांत ध्रुवने ज्या प्रकारची कामगिरी दाखवली आहे, विशेषतः गेल्या आठवड्यात बंगळुरूमध्ये दक्षिण आफ्रिका अ संघाविरुद्ध दोन शतके झळकावली आहेत, त्यामुळे तो या आठवड्यात नक्कीच खेळेल,'' असे रायन यांनी म्हटले आहे.

### नितीशच्या खेळण्याची शक्यता कमी

■ ''आमची प्राथमिकता सामना जिंकण्यासाठी रणनीती विकसित करणे आहे. नितीशबद्दलची आमची भूमिका बदललेली नाही. त्याला ऑस्ट्रेलियामध्ये खेळण्याची फारशी संधी मिळाली नाही. परंतु या मालिकेचे महत्त्व आणि परिस्थिती पाहता, तो या आठवड्यात पहिल्या कसोटीत खेळू शकणार नाही अशी शक्यता आहे.'' असे रायन यांनी सांगितले.

### ७ कसोटी सामन्यात ४३० धावा

■ जुरेलने २०२४ मध्ये इंग्लंडविरुद्धच्या घरच्या मालिकेत कसोटी पदार्पण केले. तिसऱ्या कसोटीत (राजकोट) आठव्या क्रमांकावर फलंदाजी करताना त्याने ४६ धावा केल्या, जे संघासाठी महत्त्वाचे ठरले. त्याने आता भारतासाठी सात कसोटी सामन्यांमध्ये ४३० धावा केल्या आहेत.

### जुरेल सर्वाधिक धावा करणारा फलंदाज

■ भारतीय संघासाठी विकेटकीपर-फलंदाज ध्रुव जुरेल चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्याने दक्षिण आफ्रिका अ संघाविरुद्ध २५९ धावा केल्या, ज्यात दोन शतकांचा समावेश आहे. तो मालिकेतील सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. यापूर्वी त्याने ऑक्टोबरमध्ये वेस्ट इंडिजविरुद्धच्या घरच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात शतक झळकावले होते.

## जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत प्रदर्शित होणार चॅम्पियन मुलींच्या कथांवरील लघुपट

**दिल्ली :** भारतीय क्रीडा क्षेत्रातील महिला खेळाडूंसाठी एक मजबूत आवाज बनलेल्या अवंतिका मित्तलने 'चॅम्पियन स्टोरीज' नावाचा एक डिजिटल उपक्रम सुरू केला आहे. या चॅम्पियन स्टोरीजची सुरुवात भारतीय संघातील चॅम्पियन मुलींच्या मालिकेने होणार आहे. आठ खेळाडूंवर ७ ते ८ मिनिटांचे लघुपट तयार केले आहेत, जे १४ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपच्या निमित्ताने प्रदर्शित होतील.

जागतिक स्तरावर पदके जिंकलेल्या, परंतु देशात अजूनही ओळख आणि आदरापासून दूर असलेल्या भारतीय खेळाडूंच्या कथा समोर आणणे हा यामागील उद्देश आहे. अवंतिका अनेक वर्षांपासून बॉक्सिंगच्या जगात आहे. त्यांनी भारतीय संघासोबत अनेक दौऱ्यांवर, खेळाडूंना भेटी देऊन आणि कोणत्याही शुल्काशिवाय त्यांच्यासोबत काम करून हे चित्रपट बनवले आहेत.






## प्रियंकाच्या 'ग्लोबट्रोटर' चित्रपटाचे पहिले पोस्टर आले समोर

बॉलिवूड अभिनेत्री प्रियंका चोप्रा सध्या आपल्या आगामी 'ग्लोबट्रोटर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाचे फर्स्ट पोस्टर समोर आले आहे. एस.एस. राजामौली यांच्या बहुप्रतीक्षित पॅन-इंडिया 'ग्लोबट्रॉटर' या चित्रपटात प्रियंका महेश बाबू सोबत धमाकेदार पुनरागमन करण्यास सज्ज आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर दिग्दर्शकांनी या ॲक्शन-ॲडव्हेंचर चित्रपटाचा जबरदस्त फर्स्ट लूक शेअर केला आहे.

त्यांनी आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर प्रियंका चोप्राचा 'ग्लोबट्रॉटर' फर्स्ट लूक पोस्टर शेअर करत तिचे दमदार स्वागत केले. त्यांनी आपल्या कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, ''ही महिला जिने भारतीय सिनेमाला जागतिक स्तरावर नवा आयाम दिला. देसी गर्ल, वेलकम बॅक! जगाला तुझ्या मंदाकिनीचे असंख्य रंग पाहायची आतुरता आहे.''

प्रियंका चोप्रानेही आपला 'ग्लोबट्रॉटर' चित्रपटातील फर्स्ट लूक सोशल मीडियावर शेअर केला आहे. फर्स्ट लूक शेअर करत तिने भन्नाट कॅप्शन लिहिले आहे,''ती दिसते त्यापेक्षा कितीतरी अधिक आहे... मंदाकिनीला हॅलो म्हणा.'' पोस्टरमध्ये 'देसी गर्ल' प्रियंका पिवळ्या रंगाची




साडी, पायात कोल्हापुरी आणि हातात बंदूक घेतलेली दिसत आहे.

पण या लूकचे खास वैशिष्ट्य म्हणजे तिचा ॲक्शन मोड. हातात बंदूक घेऊन प्रियंका उभी आहे.

## बॉम्बस्फोटामुळे राम चरणच्या चित्रपटाचे लाल किल्ल्याजवळील शूटिंग रद्द

राम चरणचा आगामी चित्रपट पेड्डी दिल्लीत झालेल्या स्फोटाच्या ठिकाणापासून थोड्या अंतरावर चित्रित होणार होता. त्याने पूर्वी लाल किल्ल्यावर चित्रीकरण करण्याची परवानगी घेतली होती, परंतु आता स्फोटानंतर सर्व बुकिंग रद्द करण्यात आल्या आहेत. राम चरणच्या आगामी 'पेड्डी' चित्रपटासाठी काही पॅचवर्क शिल्लक होते, ज्यासाठी टीमला लाल किल्ल्याच्या आत आणि आसपास चित्रीकरण करण्याची परवानगी मिळाली होती.



राम चरणची टीम १५ आणि १६ नोव्हेंबर रोजी लाल किल्ला आणि त्याच्या आसपासच्या ठिकाणी शूटिंग करणार होती. तथापि, आता हे वेळापत्रक बदलण्यात आले आहे. राम चरणचा 'पेड्डी' हा चित्रपट २७ मार्च २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. चित्रीकरण जवळजवळ पूर्ण झाले आहे. चित्रपटाचे काही भाग लाल किल्ल्याजवळ चित्रित करण्यात येणार आहेत. जान्हवी कपूर राम चरणसोबत मुख्य भूमिकेत आहे. अभिनेते शिवा राजकुमार, जगपती बाबू आणि दिव्येंदु हे देखील महत्त्वाच्या भूमिकेत आहेत. दिल्ली व्यतिरिक्त, चित्रपटाचे चित्रीकरण हैदराबाद, श्रीलंका आणि पुणे येथे झाले आहे.

रश्मिका मंदान्ना देखील लाल किल्ल्याजवळ तिच्या आगामी चित्रपटाचे शूटिंग करणार होती, आतापर्यंत तिचे शूटिंग रद्द झाल्याचे सांगण्यात आले नाही.




### बुलढाणा

**एआरडी सिनेमॉल**

**जटाधारा :** दुपारी २.१५, रात्री ९.१५ वा
**अभंग तुकाराम :** सायंकाळी ५.४५
**एक दिवाने की दिवानीयत :** दुपारी २

### खामगाव

**श्री गजानन टॉकीज**

**जटाधरा :** शो टाईम- दुपारी १२, दु.३, सायं. ६, रात्री ९

**सनी पॅलेस टॉकीज**

**द ताज स्टोरी :** शो टाईम- दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९

### छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

**कंतारा ए लिजंड चॅप्टर १ :** सकाळी ११:१५, दुपारी १२:१५, २:३०, ४:३०, सायंकाळी ५:३०, ६:३०, रात्री १०:००
**अंभग तुकाराम :** दुपारी १२:३०, सायंकाळी ५:३०
**द ताज स्टोरी :** दुपारी ४: ३५, दुपारी १२:३०, २:३०, सायंकाळी ७:२५
**हक :** सायंकाळी ६:००, ७:००, रात्री ९:३०
**एक दिवाने की दिवानियत :** दुपारी १२:३०, २:३०, रात्री १०:२५

**मुक्ता - नुपूर सिनेमागृह**

**द ताज स्टोरी :** सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००
**एक दिवाने की दिवानियत :** दुपारी १:२०, दुपारी ३:४५
**हक :** सायंकाळी ६:००, ७:००, रात्री ९:३०
**जस्सी वेड्स जस्सी :** दुपारी १२ : १५, रात्री ९ : १५
**तीन पायांचा घोडा :** दुपारी १: २०

**खिंवसरा सिनेफ्लेक्स**

**कंतारा ए लिजंड चॅप्टर १ :** सकाळी ११ : ३०, सायंकाळी ६:३०, रात्री १०:००
**जस्सी वेड्स जस्सी :** सकाळी १०:००, दुपारी १२:००, ३:००, ४:०० सायंकाळी ६:००
**तीन पायांचा घोडा :** दुपारी ३ : ००
**पुन्हा शिवाजी राजे भोसले :** दुपारी १२ : ००

### वाशिम

**एच २एम मूवी फ्लेक्स वाशिम**

**हक :** स. ०९:१५, दु. ०३:३०, रा.०९:२०
**थम्मा :** स.०९:३०
**अभंग तुकाराम :** दु. १२:१५, सां. ०६:१५
**जटाधारा :** दु. १२:३०, सायं ०६:२०
**प्रेडटर :** दु.०३:१५, रा. ०९:३०

### अकोला

**मिराज सिनेमा**

**प्रेडॅटोरः बॅडलॅन्ड्स (हिंदी) :** स. ९.२० , सायं. ६.००, रात्री १०.४५ **थम्मा :** स. ९.३० , दु. १.४५, रा. १०.३० **तीन पायांचा घोडा :** स. ११.२५
**एक दिवाने की दिवानियत :** दु. २.४०, रा. ८.१५
**कडीपत्ता :** दु. ३.१५ **द ताज स्टोरी :** दु. ४.१० , रा. ११.१५ **हक :** दु. ५.३० , रा. ८.१५ , रा. ११



## दैनिक महाभूमि शब्दसंगम 799

—: आडवे संकेत :—

1) बाल गुन्हेगारांना संस्कारक्षम शिक्षण देणारी शाळा, रेफ्रिमेन्टरी स्कूल
3) एका मागून एक असे तीन वेळा घडल्यास हे म्हणतात
6) वाट बघणे
8) हल्ला, छापा, प्रहार
9) मार्ग, वाट, रस्ता
10) ओढा किंवा नाल्यावरील तकलादू पूल
13) जमलेले लोक, समुदाय
15) देवाचे एकसारखे केलेले नामस्मरण
17) मन मोहून घेणाऱ्या श्रीकृष्णाचे आणखी एक नाव
18) बाजू, पक्ष
19) हस्त
20) दिवस, वासर
21) क्रीडा, खेळ, मौज
22) द्विचक्रपादयान
24) जमीन
25) दंश, चावणे
26) उंची (हिं.)
27) गुप्त बातमी देणारा अज्ञात माणूस
29) शेळ्या, मेंढ्या पाळणारा
32) बायकांच्या हातात बांगड्या भरणारा
34) एक रंग
35) उचलण्यास वजनी
36) चुपचाप, गप्प
37) हाताच्या बाह्या वर करून ६ धैर्याने पुढे होणे
39) लक्ष, चित्त
40) नेहमी, निरंतर
41) नाना प्रकारचे
42) पंधरवाड्यातील सहावी तिथी
43) कामात नेहमी आळस करणारा, सुस्त
46) चालविणारा, मुख्य सुत्रधार
48) बांगला देशाचे एक चलन
51) परस्त्रीशी प्रेम करणारा
52) निरूपयोगी, अनावश्यक
54) रामायणात एक श्रीरामपुत्र
56) पैसा, आशय
57) संपत्ती, पैसाअडका
58) समुदाय, टोळी
59) वातावरणाची स्थिती
60) मुसलमानांचा सण
62) अरण्य, जंगल
64) आयुध, हत्यार
65) अतिशय वाईट माणूस
67) तन, देह
68) कर, सारा वगैरेचे उत्पन्न
70) पति, स्वामी
71) शहरात आयात होणाऱ्या मालावरील कर
72) किमती सामान
73) घोड्याला काबूत ठेवणारी चामड्याची पट्टी
77) लक्ष्मीपतिचे दहा अवतार
78) नदी किंवा समुद्राचा तट
79) कोंबड्याचे पहाटेस ओरडणे

—: उभे संकेत :—

1) समाजात सुधारणा घडवू पाहणारा
2) भाजीपाला
3) उपाय, उपचार
4) दुसऱ्यांदा लग्न करणारा
5) मृत व्यक्तिस अर्पण करावयाचे तीळमिश्रीत उदक
6) अपघात घडल्यावर सर्वात प्रथम करावयाचे उपचार
7) धुणे
11) प्रतिध्वनी
12) कृपावंत होऊन देणे
14) खवा
16) पळून जाणे
23) नकळत आलेली दुर्मिळ संधी
26) देऊळाचे शिखर
28) थंडीत अंगावर पांघरण्याचे एक उंची वस्त्र
29) धट्टाकट्टा, तरणाबांड
30) पोलिस शिपायांनी दिलेला रात्रीचा पहारा
31) पैश्याच्या वसूलीकरीता एकसारखे मागे लागणे
32) जीव व्याकूळ होणे
33) दक्ष, जागृत, हुशार
35) एक धान्य प्रकार, सातू
36) स्वर्गलोकीची एक अप्सरा
38) सूर्य
39) आश्चर्यचकित होणे
40) धातूची शलाका
44) छत्रपती शिवाजी महाराजांच्या मातोश्री
45) सरकारकडून मिळणारे संस्थेस किंवा व्यक्तिस मिळणारे आर्थिक सहाय्य
47) स्वार्थ हेतू एखाद्याशी जवळीक साधणे
49) काळाचे परिमाण
50) पृथा पुत्र अर्जुन
52) हानी, दुखापत
53) एकाच देवतेच्या हजार नावांचा जप करणे
55) जंगलाचा राजा सिंह
56) पसंती, संमती, विचार
61) दहाही दिशा, चहूकडे
63) आश्चर्य, चकित होणे
66) ढकलणे, धक्का देणे, कसेतरी निभावून नेणे
69) सुंदर स्त्री
72) चोप, ताडन
74) चिखल
75) वृक्षाच्या भोवती बांधलेला ओटा
76) महाभारतात नकूल - सहदेवाची आई (उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर



uday munde - 8446302691

## 'लग्नाचीही एक्सपायरी डेट असावी'





'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' या अलिकडच्याच भागात विकी कौशल आणि कृती सॅनन पाहुणे म्हणून आले होते. शो दरम्यान एक मनोरंजक चर्चा झाली, या चर्चेत लग्नाची एक मुदत संपण्याची तारीख असायला हवी. शिवाय, त्यानंतर लग्न नूतनीकरण करण्याचा पर्यायही असावा, असे काजोलने सांगितले.

एका भागात, ट्विंकल खन्नाने विचारले की लग्नाची मुदत संपण्याची तारीख आणि नूतनीकरणाचा पर्याय असावा का?, कृती सॅनन, विकी कौशल आणि ट्विंकल खन्ना यांनी असहमती दर्शवली आणि रेड झोनमध्ये उभे राहिले, तर काजोलने या कल्पनेला पाठिंबा दिला आणि ग्रीन झोनकडे वाटचाल केली.

यावर ट्विंकल गमतीने म्हणाली, ''नाही, हे लग्न आहे, वॉशिंग मशीन नाही.'' काजोल म्हणाली, ''मला नक्कीच वाटते की ते असेच असावे. योग्य वेळी योग्य व्यक्तीशी लग्न कराल याची हमी कोण देऊ शकेल? जर मुदत संपण्याची तारीख निश्चित असेल आणि नूतनीकरणाचा पर्याय असेल तर कोणालाही जास्त काळ त्रास सहन करावा लागणार नाही.''

दैनिक महाभूमि

# अकोला भूमि

शुक्रवार । १४ नोव्हेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

**न्यूज ब्रीफ**

### वन्य प्राण्यांचा हैदोस ; जीवाला धोका

**अकोला :** जिल्ह्यात रब्बी हंगामातील पेरणी सुरू असून, वन्य प्राण्यांचा हैदोस वाढल्याच्या पार्श्वभूमीवर पेरलेले बियाणे आणि उगवलेली पिके वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना जीव धोक्यात टाकून शेतीची राखणी करावी लागत असल्याचे वास्तव आहे.

यंदाच्या रब्बी हंगामातील पिकांच्या सार्वत्रिक पेरणीला गेल्या नोव्हेंबरपासून जिल्ह्यात सुरुवात झाली असून, त्यामध्ये रब्बी हंगामातील प्रमुख पीक असलेल्या हरभरा पिकाची पेरणी सद्य:स्थितीत शेतकऱ्यांकडून केली जात आहे. पेरणीनंतर रानडुक्कर आणि हरीण शेतात पेरलेले बियाणे आणि पेरणीनंतर उगवलेले पीक फस्त करतात. रब्बीची पेरणी सुरू असलेल्याच्या परिस्थितीत रानडुक्कर आणि हरीण या वन्य प्राण्यांचे कळप रात्रीच्या वेळी शेतांमध्ये हैदोस घालून पेरलेले बियाणे तसेच उगवलेली पिके फस्त करून नुकसान करीत आहेत.

### पथकाकडून रोख रक्कम जप्त

**मूर्तिजापूर:** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता आदर्श आचार संहितेचे प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने स्थाई पथक (एसएसटी पथक) गठीत करण्यात आले. बुधवारी सकाळी स्थिर सर्वेक्षण पथक क्रमांक ४ आसरा फाटा नॅशनल हायवे मुर्तिजापूर यांनी वाहन क्र. एमएच. ३१ सीआर ८६१९ वाहन चालक योगेश अनिल कनोजे यांच्या कडून रु. २,३०,३००/- रोख रक्कम जप्त केली. ही कार्यवाही ही मूर्तिजापूर: जप्त करण्यात आलेली रोकड पथक प्रमुख चंदू महादेव तायडे व त्यांचे पथकातील इतर सर्व कर्मचारी यांनी केली.
ही रक्कम कशाबाबत व कुठून आणली याबाबत वाहन चालकाने पुरावे सादर न केल्यामुळे सदर रक्कम स्थिर सर्वेक्षण पथकाने पंचनामा अहवाल करून जप्त केली.

## ९०. ३४ दलघमी पाणी आरक्षणावर जिल्हास्तरीय समितीचा शिक्कामोर्तब

# काटेपूर्णाचे ३५.९७, वाणचे ३०.८४ दलघमी पाणी आरक्षित

**अकोला / प्रतिनिधी**



यंदा जिल्ह्यातील धरणांमध्ये मुबलक प्रमाणात पाणीसाठा आहे. धरणात जमा झालेल्या पाण्याचे आरक्षण जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चित समितीच्या सभेत करण्यात आले. समितीची बैठक जिल्हाधिकारी वर्षा मीणा यांच्या दालनात पार पडली.

या बैठकीत ९०.३४ दलघमी पाणी आरक्षणावर शिक्कामोर्तब करण्यात आले. त्यामध्ये काटेपूर्णा प्रकल्पाचे ३५.९७ दलघमी तर वाण प्रकल्पाचे ३०.८४ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे. जिल्ह्यातील धरणांमध्ये संग्रहित पाण्याचे प्रत्येक वर्षी आरक्षण करण्यात येते. या आरक्षण जिल्हास्तरीय आकस्मिक पिण्याचे पाणी निश्चिती समितीच्या बैठकीत मोर्णा, निर्गुणा, उमा, मन लघु प्रकल्पांचे पाणी आरक्षित करण्यात येते. आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी समितीच्या बैठकीत जिल्हयातील पिण्याच्या पाण्याचे आरक्षण करण्यात आले. त्यामध्ये अकोला शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी काटेपूर्णा प्रकल्पाचे २४.०३ दलघमी, महान मत्स्यबिज केंद्र पाणीपुरवठा योजनेसाठी ०.८६, ६४ खेडी पाणीपुरवठा योजनेसाठी ६.९९, मूर्तिजापूर शहर पाणीपुरवठा योजनेसाठी विद्युत महामंडळासाठी ०.७४ ३.३५ व महाराष्ट्र औष्णिक दलघमी पाण्याचे आरक्षण करण्यात आले.

यावर्षी जिल्ह्यात मॉन्सून वीस दिवस उशिराने दाखल झाल्याने पावसाने सुरुवातीला दमदार हजेरी लावली नव्हती. त्यामुळे धरणात जेमतेम पाणी साठा शिल्लक होता. परंतु ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यात पावसाने सर्वदूर जोरदार हजेरी लावल्याने जिल्ह्यातील धरणांच्या पाणीसाठ्यात मोठ्या प्रमाणात चांगलीच वाढ झाली. परिणामी काटेपूर्णा धरणाचे पिण्यासाठी पाणी आरक्षित करण्यात आले.

### मोर्णा, निर्गुणा, लघु प्रकल्पांचे पाणी आरक्षित

- मोर्णा प्रकल्पाचे २.२० दलघमी पाणी पातूर शहरासाठी व १.९१ दलघमी पाणी देऊळगाव पास्टुल १६ गावे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेसाठी आरक्षित करण्यात आले आहे. या व्यतिरिक्त निर्गुणा प्रकल्पाचे १.९७ दलघमी पाणी आलेगाव- नवेगाव १४ गावे पाणीपुरवठा योजनेसाठी आरक्षित करण्यात आले आहे. उमा प्रकल्पाचे ०.७० दलघमी पाणी लंघापूर ५९ खेडी पाणी पुरवठा योजना, मन नदीचे १६.५० दलघमी पाणी पारस औष्णिक केंद्र पारस व मन नदीचे १ दलघमी पाणी संत गजानन महाराज संस्थान शेगाव संस्थानसाठी आरक्षित करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त कसूरा बंधाऱ्याचे ०.७५ दलघमी पाणी सुद्धा शेगाव संस्थानसाठी राखीव ठेवण्यात आले आहे.

### जळगाव जामोद, शेगाव शहरालाही पाणी

- जिल्ह्यातील वाण धरणात सध्याच्या स्थितीत मुबलक पाणीसाठा जमा आहे. त्यामुळे या धरणाचे पाणी सुद्धा पिण्यासाठी आरक्षित करण्यात आले. वाण धरणातील ५.२७ दलघमी पाणी शेगाव शहर पाणीपुरवठा योजनेसाठी, ७.४९ दलघमी पाणी जळगाव जामोद १४० खेडी पाणीपुरवठा योजनेसाठी आरक्षित करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त अकोट शहर पाणीपुरवठा योजनेसाठी ५.४० व तेल्हारा शहर पाणीपुरवठा योजनेसाठी १.८० दलघमी तर ८४ खेडी पाणीपुरवठा योजनेसाठी १०.७५ दलघमी पाणी आरक्षित करण्यात आले आहे.



# अवैध दारू विक्री विरोधात पोलिसांची धडक मोहीम

## ऑपरेशन प्रहार अंतर्गत कारवाई

**अकोला / प्रतिनिधी**

जिल्ह्यात अवैध गावठी दारू निर्मिती आणि विक्री करणाऱ्यांविरोधात पोलिसांनी ऑपरेशन प्रहार अंतर्गत मोठी कारवाई केली. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली १० व ११ नोव्हेंबर रोजी सकाळी १२ ते रात्री १२ वाजेपर्यंत सलग दोन दिवस ही विशेष मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांनी ७५ ठिकाणी छापे टाकून मोठ्या प्रमाणात अवैध दारू निर्मिती केंद्रांवर धडक कारवाई केली.

या कारवाईत सुमारे ७ लाख ३६ हजार ४२५ रुपयांचा मुद्देमाल नष्ट करण्यात आला असून, अवैध धंद्यात सामील असलेल्यांविरुद्ध आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. तसेच, स्थानिक गुन्हे शाखेने स्वतंत्रपणे सुमारे १६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. अशा प्रकारे संपूर्ण मोहिमेत एकूण ७ लाख ५४ हजार २२५ रुपयांच्या अवैध दारू साहित्यावर कारवाई करण्यात आली आहे.

### 'अवैध दारू अड्ड्यांची माहिती द्या'

- अकोला पोलिस दलाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या परिसरात अवैध दारू निर्मिती किंवा विक्री होत असल्याची माहिती मिळाल्यास ती तातडीने जवळच्या पोलिस ठाण्यात द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल.

### महत्त्वाचे मुद्दे:

- दोन दिवसांत ७५ ठिकाणी छापे
- ७.५४ लाखांचा अवैध मुद्देमाल
- १६ हजारांचे साहित्य जप्त

# 'पेरणी करा हरभऱ्याची आणि बीजप्रक्रिया जैविक खताची'

**अकोला / प्रतिनिधी**



थंडी सुरु झाली तसेच रब्बीचा हंगाम सुरु होऊन बरेच दिवस झाले. अलीकडच्या पावसामुळे बऱ्याच शेतकरी बांधवांचे हरभरा पेरण्याचे राहिलेले आहे.

जमिनीत ओलावा असल्यामुळे आता हरभरा पेरणी करतांना जैविक खताची आवर्जून बीजप्रक्रिया करावी जेणेकरून जैविक सूक्ष्मजीवांची वाढ होऊन उत्पादनात आणखी भर पडेल असे आवाहन, कडधान्य संशोधन विभागाच्या डॉ. गीतांजली कांबळे यांनी केले आहे.

शेतकरी बांधवाना हरबरा पीक लागवडी विषयी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. आपण अधिकाधिक उत्पादन वाढीसाठी सेंद्रिय शेतीकडून पूर्णतः रासायनिक शेतीकडे वळत चाललेलो आहे. व त्यामुळेच जमिनीच्या आरोग्याबाबत नैसर्गिक समतोल राखला जात नाही. शेतीतील पिकाकरीता एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन करण्यासाठी रासायनिक, सेंद्रीय व जैविक खतांच्या वापरात समतोल राखण्याचे त्यांनी सांगितले.

### जीवाणू खते वापरण्याचे फायदे

- जीवाणू खते वापरण्याचे फायदे बियाण्याची उगवण लवकर व जास्त प्रमाणात होते.जीवाणू खतांच्या वापरामुळे पिकास नत्राचा सतत पुरवठा होत असल्याने रोपांची जोरदार वाढ होते.जीवाणूनी जमिनीत सोडलेल्या बुरशीरोधक द्रव्यामूळे पिकांची रोगप्रतिकारक शक्ती वाढते.

# ख्रिश्चन कॉलनी प्रकाशात न्हावून निघाली

**अकोला / प्रतिनिधी**

ख्रिश्चन धर्मियांच्या गृहसणास उत्साहात सुरुवात करण्यात आली असून, मंगळवार ११ नोव्हेंबर रोजी विदर्भातील एकमेव अशा ख्रिश्चन कॉलनीमध्ये सायंकाळी प्रकाशफेरी काढण्यात आली. यामुळे संपूर्ण ख्रिश्चन कॉलनी प्रकाशात न्हावून निघाली होती.

ख्रिसमस अर्थात नाताळ सणापूर्वी एक महिना अगोदर ख्रिश्चन धर्मियांच्या गृहसणास सुरुवात होते. या काळात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

अकोला शहरात कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट या ख्रिश्चन धर्मियांच्या दोन पंथांची एकूण आठ प्रार्थनास्थळे अर्थात चर्च आहेत. या सर्व चर्चेसमधून नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात गृहसणास सुरुवात होते. या गृहसणाच्या कालावधीत चर्चच्या प्रत्येक सदस्याच्या घरी भेट देवून त्या कुटुंबासाठी प्रार्थना केली जाते. त्यांची आपुलकीने विचारपूस केली जाते. मंगळवारी ख्रिश्चन कॉलनी येथील बेथेल सेव्हिअर्स अलायन्स चर्चचे रेव्हरंड निलेश अघमकर, सचिव सरला मेश्रामकर, खजिनदार अरविंद बिरपॉल, पंचमंडळ सदस्य राजेश ठाकूर, अमित ठाकूर, अजय वर्मा, चंद्रकांत ढिलपे आणि चर्चचे वडील जस्टीन मेश्रामकर यांच्या नेतृत्वात चर्चच्या परिसरातून संपूर्ण ख्रिश्चन कॉलनीमध्ये सायंकाळी साडेसात वाजता प्रकाशफेरीचे आयोजन करण्यात आले. यावेळी चर्चचे रेव्हरंड निलेश अघमकर यांनी ख्रिश्चन धर्मियांचा पवित्र धर्मग्रंथ बायबलमधील विविध वचनांच्या आधारे संदेश दिला.

# अमृत दुर्गोत्सवाची विश्वविक्रमाला गवसणी ; गिनीज बुक मध्ये नोंद

**अकोला / प्रतिनिधी**

महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनीतर्फे (अमृत) दिवाळीत अमृत दुर्गोत्सव २०२५ हा एक आगळावेगळा उपक्रम राबविण्यात आला. त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाल्याने या उपक्रमाची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, संस्कृती रक्षण, स्वभाषा, स्वधर्म यासारख्या अनेक गुणांना उजाळा देऊन अनेकांच्या मनावर सुसंस्कार करणे, या दृष्टीने समाजमन घडविणे आणि शिवाजी महाराजांना विश्वविक्रमी मानवंदना देणे हे उद्दिष्ट होते. महाराजांच्या पराक्रमाची साक्ष असलेले आणि युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केलेल्या बारा गडांपैकी कोणत्याही एकाची प्रतिकृती अंगणात, सोसायटी, शाळेत, मैदानात तयार करून त्यासोबत फोटो घेऊन तो संकेतस्थळावर करणे असे स्वरूप होते.

सहभागींना मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र मिळणार होते. अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी। यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम व्यापक झाला. महाराष्ट्र भूमिबरोबरच अमेरिका, इंग्लंड, आखाती देशातून प्रतिसाद मिळाला. या प्रचंड प्रतिसादाची नोंद गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड या विश्वविक्रमांची नोंदणी करणाऱ्या संस्थेने घेतली.

# सैनिक कल्याण विभागात लिपिकांची भरती

**अकोला / प्रतिनिधी**

सैनिक कल्याण विभाग व विभागात जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांसाठी सरळसेवेने लिपिक टंकलेखक पदांची भरती होत आहे. त्यासाठी केवळ माजी सैनिकांकडून २६ नोव्हेंबरपर्यंत ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत.

यापूर्वी प्रसारित भरतीच्या सूचनेमध्ये ५ नोव्हेंबर ही अर्ज करण्याची शेवटची तारीख होती. तथापि, जास्तीत जास्त उमेदवारांना अर्ज भरण्याची संधी मिळण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून, २६ नोव्हेंबर रोजी रा. २३.५९ वाजेपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येईल. तरी जिल्ह्यातील माजी सैनिकांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा.

# आपले सरकार सेवा केंद्र संचालकांचा कडकडीत बंद

**अकोला / प्रतिनिधी**

विविध प्रलंबित मागण्या आणि केंद्र संचालकांच्या हक्कासाठी महा-ई-सेवा व आधार केंद्र संघटनेकडून राज्यभर १२ ते १४ नोव्हेंबर दरम्यान काम बंद आंदोलनाचे पाऊल उचलले असून, अकोल्यातही आपले सरकार सेवा केंद्र संचालकांनी कडकडीत बंद पाळला. या बंदमुळे नागरिकांना मात्र त्रास सहन करावा लागल्याचे दिसून आले.

तीन दिवशीय बंदबाबत संघटनेने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील डिजीटल ई सेवा द्वारे नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांमुळे त्यांचा वेळ, श्रम व पैसा वाचत असून, यामध्ये महा-ई-सेवा व आधारसेवा धारकांचा १०० टक्के वाटा आहे. त्यामुळे शासनास वर्षाला तीन ते चार हजार कोटी रुपये बचतीचे काम करीत आहे. डिजीटल माध्यमातून लाखो युवकांना रोजगार मिळून त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह होत आहे. परंतु, आजपर्यंत महा-ई-सेवा केंद्र व आधार सेवा केंद्र धारकांना शासनाकडून नेहमी सापत भावाची वागणूक मिळत आहे. त्यामुळे महा-ई-सेवा केंद्रे व आधार केंद्रे यांच्या डोक्यावरती सतत टांगती तलवार ठेवून शासन साप-मुंगसाचा खेळ खेळीत आहे.

यासाठी संघटनेने मुंबई हायकोर्टच्या नागपूर खंडपीठात रिटपिटीशनही दाखल केले आहे, असे असतानाही शासन आपली कृती बदलण्यास तयार नाही असे दिसून येते. त्यामुळे संघटनेच्या मागण्या मान्य नाही झाल्यामुळे संघटनेकडून १२ ते १४ नोव्हेंबर दरम्यान राज्यव्यापी काम बंदचे पाऊल उचलेले आहे. या बंदमुळे गावखेड्यातून आलेल्या नागरिकांना मात्र चांगलाच त्रास सहन करावा लागला. संघटनेने दिलेल्या निवेदनाची गंभीर दखल घेत विरोधी पक्षातील आमदार तसेच शिवसेनेचे उपनेते नितीन देशमुख यांनी संघटनेच्या मागण्यांबाबत राज्य सरकारचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांना तत्काळ पत्र देऊन बैठकीद्वारे तोडगा काढण्याची विनंती केली आहे.

### शासनाकडे संघटनेच्या मागण्या

- शासन निर्णय परिपत्रक २ जून २०२५ तसेच मंडल अधिकारी कार्यालयातील नवीन आपले सरकार सेवा केंद्रबाबत १० ऑक्टोबर २०२५ नुसार काढलेल्या परिपत्रकाबाबत पूर्ण तपासणी करून त्यात फेरबदल करण्यात यावेत, शिवाय नवीन आपले सरकार सेवा केंद्रे देण्यात येवू नयेत. आधार सेवा केंद्राचे असणारे कमिशन हे त्वरीत मिळावेत. आधार ऑपरेटर ब्लॅकलिस्ट करु नयेत. त्यांना प्रशिक्षणाची सोय करावी. आधार मशिनरी बदलुन नविन देण्यात यावेत. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी सीडीपीओ महाआयटीचे व्यवस्थापक, तांत्रिक व्यवस्थापक (डीएम) व (डीपीएम) यांच्या नेमणुका होवून दर तीन वर्षानंतर बदल्या करण्यात यावेत. त्यामुळे आर्थिक देवाण घेवाण होणार नाही.

राज्य शासनाच्या कल्याणकारी योजनांचा सामान्यांपर्यंत लाभ पोहोचवण्यासाठी महा-ई-सेवा केंद्रांची भूमिका महत्त्वपूर्ण असून, ही शासन महा-ई-केंद्रांच्या विरोधात घेत असलेल्या भूमिकेमूळे आंदोलनाचा निर्णय घेतला असून, राज्यभर संप सुरू केला आहे.

**- मनीष तिवारी,**
जिल्हाध्यक्ष, अखिल स्तरीय महा-ई-सेवा केंद्र

## दर्जेदार कार्यक्रमांचे नियोजन करा : जिल्हाधिकारी

# नरनाळा महोत्सवात उलगडणार वनवैभव!

**अकोला / प्रतिनिधी**

सातपुड्याच्या कुशीत वसलेल्या मेळघाटचे वनवैभव आणि आदिम संस्कृतीचे दर्शन घडविणारा नरनाळा महोत्सव येत्या ३० जानेवारी ते १ फेब्रुवारीदरम्यान आयोजित करण्यात येणार आहे. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने कार्यवाही करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले.

महोत्सवाच्या पूर्वतयारीसंदर्भात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाइन बैठकीत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, निवासी उपजिल्हाधिकारी विजय पाटील, अकोटचे उपविभागीय अधिकारी मनोज लोणारकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. १३ वर्षांनंतर पुन्हा आयोजित होणाऱ्या या पर्यटन महोत्सवात नौकाविहार, वनसफारी, आदिवासी नृत्यकला, पक्षिनिरीक्षण, गडभटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन यांसह विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. महोत्सवातून ऐतिहासिक नरनाळा किल्ला, मेळघाटचे समृद्ध नैसर्गिक सौंदर्य आणि स्थानिक आदिवासी परंपरांचा ठेवा पर्यटकांना अनुभवता येणार आहे. महोत्सवाच्या नियोजनात जागा निश्चिती, परिपूर्ण कार्यक्रम आराखडा व प्रस्ताव तत्काळ पाठविण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या. तसेच दर्जेदार सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश करून स्थानिक कलावंतांना प्रोत्साहन द्यावे, असेही त्यांनी सांगितले.




### वन, पाटबंधारे विभागाला दिले निर्देश

- महसूल, वन, पाटबंधारे विभागासह सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वय साधावा आणि स्वयंसेवी संघटनांचा सहभाग मिळवावा, असे निर्देश देण्यात आले. महोत्सवाची माहिती सर्वदूर पोहोचावी यासाठी व्हिडिओ, माहितीपट, फलक व माध्यमांद्वारे प्रभावी प्रसिद्धी करावी, असेही जिल्हाधिकारी मीना यांनी यावेळी स्पष्ट केले.

# मालवाहू वाहन चोरी ; घटनाक्रम सीसीटीव्हीत कैद

**अकोला / प्रतिनिधी**

कौलखेड रोड, हिंगणा फाटा परिसरात उभे असलेले एमएच ३० एव्ही ०१५४ क्रमांकाचे मालवाहू वाहन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना मंगळवारी उघडकीस आली. या प्रकरणी खदान पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी सागर रामस्वरूप बुब (४२, रा. मलकापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नेहमीप्रमाणे त्यांच्या दुकानासमोर मालवाहू वाहन उभे केलेले होते. ९ नोव्हेंबर रोजी रविवार असल्याने दुकान दुपारी दोन वाजता बंद करून ते घरी गेले. चालक सुनील बाबूराव कामळे यांनी वाहन तेथेच पार्क करून चावी फिर्यादीकडे सुपुर्द केली.

# ११ तहसीलदार झाले उपजिल्हाधिकारी

**अकोला / प्रतिनिधी**

तहसीलदारांना पदोन्नतीने उपजिल्हाधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. त्यामध्ये अमरावती विभागातील ११ जणांचा समावेश आहे. मंगरूळपीरचे उपविभागीय अधिकारी राजेंद्र जाधव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे अकोला प्रादेशिक अधिकारी म्हणून रूजू होणार आहेत.

पदोन्नती झालेल्यांमध्ये अकोल्याचे तहसीलदार सुरेश कव्हळे यांना बुलढाणा निवासी उपजिल्हाधिकारी, बार्शिटाकळीचे राजेश वझिरे मुद्रांक सहनिबंधक वाशिम. मलकापूरचे तहसीलदार राहुल तायडे - यवतमाळ जिल्हाधिकारी कार्यालय, शेगावचे दीपक बाजड- वाशिम जिल्हाधिकारी कार्यालय, चिखलीचे तहसीलदार संतोष काकडे- अमरावती निवासी उपजिल्हाधिकारी, वाशिम जिल्ह्यातील मानोऱ्याचे तहसीलदार डॉ. संतोष येवलीकर- बाळापूर. उपविभागीय अधिकारी, अमरावतीतील गजेंद्र मालठाणे निवासी उपजिल्हाधिकारी अकोला, अचलपूर तहसीलदार डॉ. संजय गरकल महाबीजचे महाव्यवस्थापक प्रशासन, धामणगावचे रूपेश खंडारे भूसंपादन-भातकुली अधिकारी, अकोला, तहसीलदार अजित येडे भूसंपादन अधिकारी यवतमाळ, दारव्हा तहसीलदार रवी काळे यांना मंगरूळपीर उपविभागीय अधिकारी पदावर नियुक्ती देण्यात आली.

## न्यूज ब्रीफ

### विवाहितेचा छळ; सासरच्या मंडळीविरुध्द गुन्हा दाखल

**खामगाव :** माहेरहून १० लाख रुपये आणण्याचा तगादा लावत सासरच्या मंडळींनी छळ केल्याप्रकरणी विवाहितेच्या तक्रारीवरून ११ नोव्हेंबर रोजी सासरच्या सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक शेगाव नाका भागातील स्वाती संदीप पवार (३७) या विवाहितेने खामगाव शहर पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, सासरच्या मंडळींनी पैशांची मागणी करीत तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला. या तक्रारीवरून, पती संदीप वसंतसिंग पवार (५०), सासू कोकिला वसंतसिंग पवार (७०), जेठ महेंद्र वसंतसिंग पवार (५२), जेठाणी मोसमी महेंद्र पवार (५१), नंदोई जयरामसिंग तुबसिरामसिंग परदेशी (५५) आणि सरिता जयराम परदेशी (५४) सर्व रा. संतोषी अपार्टमेंट, फ्लॅट नं. २०४, फास्ट रेल्वे ट्रॅक समोर, मुंद्रा, ठाणे यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### खामगावात चौथ्या दिवशी एक अर्ज दाखल

**खामगाव :** स्थानिक नगर पालिका निवडणुकीत खामगाव शहरामध्ये नामांकन अर्ज दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी पहिला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने घोषित केलेल्या न.प. निवडणुक कार्यक्रमानुसार २ डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यासाठी १० नोव्हेंबर पासून ऑनलाईन उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज भरण्यात येत असले तरी आज अर्ज भरण्याच्या चौथ्या दिवशी म्हणजेच १३ नोव्हेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत न.प. निवडणूक कार्यालयात फक्त एका महिला उमेदवाराचा अर्ज दाखल झाला आहे.

### दोघांना मारहाण; गुन्हा दाखल

**शेगाव :** लग्न ठिकाणी क्षुल्लक कारणावरून वाद होवून दोन चुलत भावांना एकाने हातातील कड्याने मारहाण केल्याची घटना ११ नोव्हेंबर रोजी दुपारी ४ वाजता अकोट रोडवरील लालबाबा देवी मंदिरा समोर घडली. याप्रकरणी अकोला जिल्ह्यातील म्हैसांग येथील युवकावर शेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. याबाबत संतोष आगलावे (२१) रा. मासा (सिसा) ता. जि. अकोला यांनी पोलिसात फिर्याद दिली की, ते नातेवाईकांच्या लग्नामध्ये हजर असतांना आनंद चव्हाण रा. म्हैसांग ता. जि. कोला याने मला धक्का मारला. त्यावेळी मी त्याला धक्का का मारतो असे म्हटले असता त्याने मला शिवीगाळ करुन त्याचे हातात असलेले स्टीलचे कडे माझे उजव्या डोळ्याचे बाजूला व नाकावर तसेच गालावर मारल्याने जखमी केले. तेव्हा तेथे माझा चुलत भाऊ महादेव आगलावे हा भांडण सोडविण्यास आला असता त्यालाही कड्याने मारहाण केली.

# शहरातील प्रभाग सुरक्षित मात्र तिकिटे असुरक्षित!

अनुप गवळी



**खामगाव :** नगरपालिका निवडणुकीकरिता आता फक्त मोजकेच दिवस शिल्लक राहिलेले आहेत. मात्र अद्याप पर्यंत कोणत्याही पक्षाने नगराध्यक्ष पदाचा उमेदवार अथवा प्रभागातील एकाही नगरसेवकांचे नाव जाहीर केलेले नाही. त्यामुळे शहरातील प्रभाग सुरक्षित असल्याचे दिसून येते मात्र त्या प्रभागातील तिकिटे हे असुरक्षित असल्याचे दिसत आहे. कारण सत्ताधारी पक्षाकडे प्रत्येक प्रभागांमध्ये तिकीट मागणाऱ्यांची संख्या मोठी असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पक्षश्रेष्ठींकडे सुद्धा तिकीट वाटपाबाबत गोंधळ निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

१० नोव्हेंबर पासून नगरपालिका निवडणुकीकरिता इच्छुक उमेदवारांचे नामांकन अर्ज भरण्यासाठी सुरुवात झाली आहे. पहिले तीन दिवस सत्ताधारी पक्षासह इतर पक्षातील एकाही उमेदवाराने नामांकन अर्ज भरले नाही. तसेच अपक्ष लढणारे सुद्धा 'वेट अँण्ड वॉच'ची भूमिका बजावताना दिसून येत आहेत. खामगाव नगरपालिकेच्या नगराध्यक्ष आणि ३५ नगरसेवकांच्या जागेसाठी निवडणूक पार पडणार आहे. खामगाव विधानसभा मतदारसंघाच्या राजकारणामध्ये मोठ्या प्रमाणात उलथापालथ होताना दिसून येत असून सत्ताधारी भाजपाला सत्तेतून बाहेर खेचण्यासाठी विरोधी पक्षांकडून नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारासह प्रत्येक प्रभागांमध्ये प्रभावी उमेदवार देण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. तर दुसरीकडे मात्र सत्ताधारी भाजप पक्षाकडून सुद्धा वेट अँण्ड वॉच ची भूमिका बजावल्या जात असून विरोधकांच्या उमेदवारांच्या लिस्टकडे त्यांचे लक्ष लागलेले असल्याचे दिसून येत आहे. खामगाव नगरपालिकेमध्ये भाजप, महाविकास आघाडी आणि महायुतीतील घटक पक्ष राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट अशी तिरंगी लढत होण्याची चिन्हे दिसून येत आहे.

त्यातच वंचित बहुजन आघाडीची सुद्धा या ठिकाणी महत्त्वाची भूमिका असून अद्याप पर्यंत नगरपालिकेच्या निवडणुकी संदर्भात वंचित बहुजन आघाडी कडून कुठलीही भूमिका स्पष्ट झाल्याचे दिसून येत नाही.

## उमेदवारी मिळवण्यासाठी इच्छुकांचा साम-दाम-दंड-भेद चा वापर!

### नामांकन अर्ज भरण्यासाठी उरले फक्त तीन दिवस

■ १० नोव्हेंबर पासून नगरपालिका निवडणुकीमध्ये उमेदवारी अर्ज भरण्याकरिता सुरुवात झालेली आहे. परंतु सर्वच पक्षांकडून एकमेकांच्या उमेदवारांच्या नावांची घोषणा होण्याची वाट पाहली जात असल्याने पहिले तीन दिवस कोणीही नामांकन अर्ज सादर केले नाही. आता नामांकन अर्ज भरण्याकरिता केवळ तीन दिवस शिल्लक राहिले असल्याने अर्ज सादर करण्यासाठी वेळेवर इच्छुकांची भाऊ गर्दी होणार असल्याचे दिसून येत आहे.

### प्रभागात स्वच्छ प्रतिमेचा उमेदवार देण्याची नागरिकांची अपेक्षा!

■ शहरातील जनतेकडून सर्वच पक्षांकडून उमेदवाराची नावे जाहीर होण्याची वाट बघितली जात आहे. परंतु जनतेकडून प्रभागांमध्ये स्वच्छ प्रतिमेचा आणि प्रभावी उमेदवार देण्याची अपेक्षा पक्षांकडून व्यक्त केली जात आहे. निवडणुकीमध्ये उच्चशिक्षित आणि प्रभावी व्यक्तिमत्व देणाऱ्या पक्षाच्या उमेदवाराकडेच शहरवासीयांचा कल असणार असल्याचे बोलल्या जात आहे.

# तरुणीवर चाकूने हल्ला करून युवकाचा आत्महत्येचा प्रयत्न

## गोकुलधाम परिसरातील धक्कादायक घटना

मलकापूर/प्रतिनिधी



शहरातील गोकुलधाम परिसरात ११ नोव्हेंबर रोजी सकाळी चाकू हल्ल्याची थरारक घटना घडली. संतापाच्या भरात २९ वर्षीय युवकाने एका २५ वर्षीय तरुणीवर प्राणघातक हल्ला करत तिच्या मानेवर चाकूने वार केले आणि त्यानंतर स्वतःच्या मानेवरही वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली असून, दोघेही सध्या खाजगी रुग्णालयात उपचार घेत आहेत. दोघांचीही प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांनी दिली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, जान्हवी रवींद्र साळी (२५) ही गोकुलधाम परिसरातील घरासमोर उभी असताना शुभम विलास झनके (२९) रा. यशोधाम परिसर याच्याशी काही कारणावरून वाद झाला. शाब्दिक चकमक तीव्र होत गेली आणि संतापाच्या भरात शुभमने जवळ असलेल्या धारदार चाकूने जान्हवीच्या मानेवर वार केला. तिच्या आरडाओरडीनंतर धाकटी बहीण रोशनी बाहेर आली, तसेच शेजाऱ्यांनी धाव घेत तत्काळ जखमीला रुग्णालयात हलविले. दरम्यान, हल्ल्यानंतर शुभमनेही स्वतःच्या मानेवर वार करून आत्महत्येचा प्रयत्न केला. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी पोहोचून दोघांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

या घटनेची माहिती मिळताच प्रभारी पो.नि सतीश महल्ले व स.पो.नि गजानन कौळसे यांनी रुग्णालयाला भेट देऊन जखमींच्या नातेवाईकांशी संवाद साधला. दोघांची प्रकृती सध्या स्थिर असून, धोक्याबाहेर असल्याचे त्यांनी सांगितले. नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. रोशनी रवींद्र साळी यांच्या फिर्यादीवरून शहर पोलिसांनी आरोपी शुभम विलास झनके याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# लेवा समाज बांधवांचा सामाजिक मेळावा उत्साहात

मलकापूर/प्रतिनिधी



नव्याने साकारत असलेल्या भ्रातृ मंडळाच्या वास्तूत लेवा समाजाच्या बांधवांचा सामाजिक मेळावा उत्साहात संपन्न झाला. केवळ एका वास्तूची नाही, तर सामुदायिक एकोप्याची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या या कार्यक्रमाला समाज बांधवांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या मेळाव्याचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य लेवा पाटीदार महासंघाचे सचिव, तसेच भ्रातृ मंडळ, मोताळाचे अध्यक्ष दिलीप नाफडे यांनी भूषविले. कार्यक्रमाचा प्रारंभ दीपप्रज्वलन करून, तसेच भारताचे लोहपुरुष भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल यांच्या प्रतिमेस विनम्र हारार्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमाला भ्रातृमंडळ मोताळाचे सर्व संचालक मंडळ, बुलढाणा, मलकापूर, यवतमाळ आणि नांदुरा भ्रातृमंडळाचे पदाधिकारी, तसेच अनेक राजकीय, शैक्षणिक आणि उद्योग क्षेत्रातील दिग्गज समाजबांधव उपस्थित होते. प्रमुख मान्यवरांमध्ये मलकापूर येथील प्रसिद्ध उद्योजक निवृत्ती तुकाराम पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य विश्वासराव नारखेडे, पुरुषोत्तम नारखेडे, माजी पंचायत समिती सभापती संजय किनगे, अरविंद पाटील, रमाकांत कोलते, प्राचार्य अनिल खर्चे, बंडू चौधरी, आणि इतर अनेक मान्यवर सहभागी झाले होते. या मैत्रीपूर्ण सोहळ्याने लेवा समाजाच्या संघटनात्मक बळाचे दर्शन घडवले. कार्याची यशोगाथा आणि विचारांचे मार्गदर्शन मेळाव्यात भ्रातृमंडळ, मोताळाच्या स्थापनेपासून ते आजवरच्या प्रगतीपथाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भ्रातृ मंडळाचे सचिव गजानन टेकाडे यांनी प्रास्ताविकात समाज मंडळाच्या कार्याची यशोगाथा कथन केली आणि भविष्यातील गरुडझेप कशी असेल, याची रूपरेषा स्पष्ट केली. तसेच उपस्थित मान्यवरांनी आपले मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजयकुमार खर्चे यांनी केले तर अनंत टेकाडे यांनी आभार प्रदर्शन केले. मेळाव्यात ५०० हून अधिक समाज बांधवांनी उपस्थिती दर्शविली.

## ग्रामीण भागात कापसाला ६ हजार ५०० रुपये दर!

**खामगाव :** जिल्ह्यात सीसीआयचे कापूस खरेदी केंद्र ठिकठिकाणी सुरु झाले आहेत. परंतु या सीसीआयच्या कापूस खरेदी केंद्राच्या हमीभावाचा उपयोग शेतकऱ्यांना घेता येणे शक्य होत नाही. त्यामुळेच आजही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कापसाला खाजगी व्यापाऱ्यांकडून मातीमोल भाव दिल्या जात आहे.

शासनाने कापसाला हमीभाव ७ हजार ७८० रुपये जाहीर केला आहे. त्या अनुषंगाने या भावाचा लाभ घेता यावा यासाठी जिल्ह्यात सीसीआयने कापूस खरेदी केंद्र सुरु केले आहेत. या केंद्रावर शुभारंभ प्रसंगी कापसाला हमीभावापेक्षा अधिकचा भाव दिल्या गेला आहे. परंतु हा भाव असाच मिळेल. याची कुठलीही शाश्वती नाही. तर दुसरीकडे मात्र ग्रामीण भागातील अनेक शेतकरी आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी खासगी व्यापाऱ्याला गावातच कापूस विकणे पसंत करु लागले आहेत.

# गो.से.महाविद्यालयात 'आयजी डिजिटल फ्युचर्स : इन्क्लुसिव्ह पाथवेज' विशेष उपक्रम उत्साहात

खामगाव/प्रतिनिधी




स्थानिक विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ संचालित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगाव यांच्या वतीने नॅसकॉम आणि हेड हेल्ड हाय फाउंडेशन यांच्या सहकार्याने "आयजी डिजिटल फ्युचर्स: इन्क्लुसिव्ह पाथवेज" हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या उपक्रमाचा प्रमुख उद्देश विद्यार्थ्यांना बँकिंग, फायनान्स आणि बिझनेस ऑपरेशन्स क्षेत्रातील करिअरसाठी तयार करणे हा आहे. या कार्यक्रमांतर्गत २२० तासांचे सर्वसमावेशक प्रशिक्षण दिले जाणार असून त्यात डोमेन स्किल्स, प्रोफेशनल रेडिनेस ट्रेनिंग, प्रोजेक्ट बेस्ड ॲक्टिव्हिटीज तसेच प्लेसमेंट सपोर्टचा समावेश आहे. या प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना बिझनेस प्रोसेस मॅनेजमेंट क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान, व्यक्तिमत्व विकास, उद्योग तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि प्रतिष्ठित संस्थांमध्ये इंटर्नशिपची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. हा कार्यक्रम B.com, BCA आणि BSC च्या अंतिम वर्षातील तसेच अलीकडेच पदवी प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी खुला आहे. या कार्यक्रमाची माहिती हेड हेल्ड हाय फाउंडेशनच्या जनरल मॅनेजर रिचा त्रिपाठी यांनी विद्यार्थ्यांना दिली. प्रशिक्षणाचे सत्र प्रिया वैद्य यांनी घेतले. हेड हेल्ड हाय फाउंडेशन समन्वय अभिजित ठाकूर व आम्रपाली शेगोकार उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. डी. एन. व्यास, प्रमुख, वाणिज्य व व्यवस्थापन विभाग यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी मुक्ता भोजने व प्रणाली कोंडील यांनी केले, तर आभार प्रदर्शन विद्यार्थी अश्विन मांजा यांनी केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते. संपूर्ण उपक्रम डॉ. डी. एन. व्यास सर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. अशी माहिती प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रा. डॉ. मोहम्मद रागीब देशमुख यांनी दिली आहे.

# सपकाळ यांच्याकडून महादेवसिंह रावळ यांच्या प्रकृतीची विचारपूस

मलकापूर/प्रतिनिधी

शहरातील ज्येष्ठ समाजसेवक, बार असोसिएशनचे सचिव, धुपेश्वर संस्थानचे अध्यक्ष तसेच माजी नगराध्यक्ष हरीश रावळ यांचे वडील ॲड. महादेवसिंह रावळ यांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मलकापूर येथील खाजगी रूग्णालयाला भेट देऊन चौकशी केली. गेल्या काही दिवसांपासून अस्वस्थ असलेल्या ॲड. महादेवसिंह रावळ यांच्यावर येथील तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार सुरू आहेत. त्यांच्या प्रकृतीची माहिती मिळताच प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी वैयक्तिकरीत्या रुग्णालयात भेट देऊन महादेवसिंह रावळ यांची विचारपूस केली.



यावेळी माजी आ. राजेश एकडे, जेष्ठ नेते डॉ. कोलते, जिल्हा काँग्रेस अध्यक्ष राहुल बोन्द्रे तसेच माजी नगराध्यक्ष ॲड. हरीश रावळ हेही उपस्थित होते. प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांनी डॉक्टरांकडून उपचाराची सविस्तर माहिती घेतली व रावळ कुटुंबियांची आस्थेने चौकशी केली.

# स्वराज्य संस्थेत वंचित बहुजन आघाडीच्या विजयाचा निर्धार करा : सुजात आंबेडकर

संग्रामपूर/प्रतिनिधी

मागास असलेल्या संग्रामपूर तालुक्यात शिक्षण, आरोग्य, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आदींसह अनेक प्रश्न बिकट झाले आहे. आपण निवडून दिलेले आमदार, खासदार हे जनतेच्या मूलभूत गरजा आणि प्रश्नाकडे दुर्लक्ष करत आहेत. त्यामुळे आमदार, खासदार यांना जावू द्या, आता आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेवर वंचित आघाडीची सत्ता येऊ द्या, असा निर्धार करा, असे आवाहन उपस्थित असलेल्या जनसमुदायाला संबोधित करताना वंचित बहुजन आघाडीचे नेते सूजात आंबेडकर यांनी वरवट बकाल येथील जेतवण बुद्ध विहार परिसरात ११ नोव्हेंबर रोजी निर्धार मेळाव्यात केले.



या निर्धार मेळाव्याचे आयोजन संग्रामपूर तालुका वंचित बहुजन, आघाडीच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष तालुका अध्यक्ष किशोर भिडे हे होते. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष देवाभाऊ हिवराळे, किशोर भिडे, आशिष धुंदळे, रविंद्र भेलके, श्रीकृष्ण भालतीळक महाराज, संदीप वानखडे, सचिन राऊत, पुंडे, शेगोकार, विशाखा सावंग, दीपक पहुरकर, वाकोडे, भिलगे, वानखडे, वसुलकर काका मलकापूर तालुका अध्यक्ष अजय सावळे, जळगाव जा तालुका अध्यक्ष रमेश नाईक, नांदुरा तालुका अध्यक्ष अनिल धुंदळे, राहुल वाघोदे आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम

पोरज/प्रतिनिधी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त तालुक्यातील पोरज येथील गुरुदेव सेवा भजनी मंडळ व समस्त गावकरी मंडळी पोरज यांच्यावतीने आयोजित विविध धार्मिक कार्यक्रमांना १२ नोव्हेंबर पासून प्रारंभ झाला आहे.

यामध्ये विविध कीर्तनकारांची कीर्तने ध्यानपाठ रामधुन हरिपाठ सामुदायिक प्रार्थना व भजनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १६ नोव्हेंबर रोजी कार्यक्रमाची सांगता होणार आहे. १६ नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सहा ते आठ दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार रोजी राष्ट्रीय कीर्तनकार हभप सुनील महाराज वनवे रा. शेगाव. गुरुवार रोजी बाल कीर्तनकार प्रज्वली दीदी राहणार कवठळ- गोविंद, शुक्रवार ग्रामगीताचार्य हरिभक्त पारायण सुनील महाराज लांजुळकर रा. देवरी फाटा, शनिवार हभप गुलाब महाराज घोळसगाव चिखली, रविवार हभप आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी गुरुदेव सेवाश्रम नांदुरा व त्याचदिवशी सकाळी नऊ वाजता मनोज महाराज चौबे रा. गुरुदेव सेवाश्रम नांदुरा यांचे काला या विषयावर प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे.

**तहसिलदार खामगाव यांचे कार्यालय, प्रशासकीय इमारत खामगांव जि.बुलढाणा**

क्र. कावि/ जन्म मृत्यु शाखा / ८९२/२०२५
दि. - १२/०९/२०२५

**जाहीरनामा**

सर्वत्र लोकांना याव्दारे कळविण्यात येते की, अर्जदार शहेजाद अली खान निसार अली खान, पिंपळगांव राजा ता.खामगांव जि.बुलढाणा यांचा जन्म दिनांक २५/०७/१९८७ रोजी त्यांचे वडीलांचे राहते घरी पिंपळगांव राजा ता.खामगांव येथे झाला असून निबंधक जन्म/मृत्यु अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत पिंपळगांव राजा यांचेकडे जन्म घटनेची नोंद करण्यात आलेली नाही. त्यामुळे जन्म आणि मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे निबंधक जन्म/मृत्यु अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत पिंपळगांव राजा यांना जन्म नोंदीबाबत झालेला विलंब क्षमापित करणेचा आदेश पारित करण्याचा विनंती अर्ज दाखल केला आहे.

वरील नोंदीबाबत कोणास काही हरकत/आक्षेप घ्यावयाचे असल्यास त्यांनी जाहिरनामा प्रसिध्द झाल्याचे १५ दिवसाचे आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) या न्यायालयात हरकत/आक्षेप अर्ज लेखी स्वरूपात दाखल करावा. विहीत मुदती नंतर प्राप्त झालेल्या हरकत/आक्षेप अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही, अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जात नमुद केल्या प्रमाणे जन्म नोंदीबाबत झालेला विलंब क्षमापित करणेचा आदेश पारीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- खामगांव
पु.ता. :- १५/१०/२०२५
शिक्का
स्वाक्षरी
(सुनिल पाटील)
तहसिलदार खामगांव

# पीपल्स रिपब्लिकन पार्टीची युती फक्त शिवसेना शिंदे गटासोबतच : चरणदास इंगोले

मलकापूर/प्रतिनिधी

बुलढाणा जिल्हा पीपल्स रिपब्लिकन पार्टीची जिल्हा बैठक १० नोव्हेंबर रोजी बुलढाणा येथे संपन्न झाली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ सावळे हे होते. तर प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष चरणदास इंगोले, विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष गौतम कासारे आदी उपस्थित होते.

पीपल्स रिपब्लीकन पार्टीची जिल्हा बैठक बुलढाणा जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर पक्षाची ध्येय धोरणे व निवडणूक युतीबाबत चर्चा करण्यात आली. सदर बैठकीमध्ये पक्षाच्या जिल्हा कार्यकारिणीत निवडणुकी



विषयी व उमेदवारीविषयी चर्चा होवून आपला परंपरागत मित्र असलेले शिवसेना (शिंदे गट) यांचेशी युती करण्यात यावी. असा एकमताने ठराव मंजूर करण्यात आला. तसेच हा ठराव मंजूर झाल्यानंतर ठरावामध्ये शिवसेना (शिंदे गट) च्यावतीने पीपल्स रिपब्लीकन पार्टीच्या वतीने बुलढाणा जिल्ह्यात देऊळगाव राजा अनुसूचित जाती नगराध्यक्ष पद, बुलढाणा नगर पालिका अंतर्गत मिलींद नगर येथील राखीव जागा, मलकापूर पंत नगर प्रभाग क्र.१ व इतर जिल्ह्यातील ५ ते ७ जागा सोडण्याची मागणी करण्यात आली. तसेच तशाप्रकारचे निवेदन शिवसेना शिंदे गटाचे केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांना देण्यात आले. सदर बैठकीला जिल्हा महासचिव विलास नरवाडे, जिल्हा उपाध्यक्ष गजानन तायडे, जिल्हा उपाध्यक्ष प्रमोद वानखेडे, मधुकर शिंदे, जिल्हा युवक अध्यक्ष विकास कासारे, जिल्हा सचिव भास्कर इंगळे, जिल्हा महासचिव एकनाथ होडगरे तसेच मलकापूर तालुकाध्यक्ष शेख निसार शेख रशीद, मोताळा तालुकाध्यक्ष मनोहर दोडे, नांदुरा तालुकाध्यक्ष रोशन वाकोडे, बुलढाणा तालुकाध्यक्ष विद्यासागर अंभोरे, भाई भाटी, ॲड.सुनिल इंगळे, अमोल गवई, सिंदखेडराजा तालुकाध्यक्ष भाई खरात आदींची उपस्थिती होती.

## अनेक शाळांमध्ये सात वाजतापासून वर्ग | आरोग्यावर परिणामाची शक्यता

# सकाळच्या थंडीत विद्यार्थ्यांची कसरत!

खामगाव/प्रतिनिधी

शहरात तापमानाचा पारा सातत्याने घसरत असून, दिवसागणिक थंडीचा जोर वाढत आहे. सकाळच्या वेळेत गारठा इतका वाढला आहे की, शाळेत जाणारी लहान मुले थरथरत शाळेत पोहोचत आहेत. तरीदेखील डबल शिफ्टमध्ये चालणाऱ्या अनेक शाळांनी वेळ सकाळी ७ वाजताच कायम ठेवली असल्याचे दिसून येत आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या समस्या वाढल्या आहेत.



शासनाने लहान मुलांना थंडीपासून संरक्षणासाठी आणि त्यांच्या आरोग्यासाठी सकाळी ७ वाजताची वेळ बदलून ९ वाजेची केली आहे. मात्र काही शाळांकडून शासनाच्या या आदेशाला केराची टोपली दाखवतांना दिसून येत आहे. अद्यापही काही शाळांनी सकाळी वेळ ही ७ वाजताचीच ठेवली असून कडकडत्या थंडीत चिमुकल्या विद्यार्थ्यांना थरथरत शाळेत जावे लागत आहे. त्यामुळे पालक वर्गांकडून शाळा व्यवस्थापनाच्या या मनमानी कारभाराविरूध्द रोष व्यक्त केला जात आहे. याकडे शिक्षण विभागाने लक्ष देणे गरजेचे आहे.

### पालकांची वाढली चिंता

■ थंडीच्या पार्श्वभूमीवर शाळांची वेळ सकाळी ९ वाजता करण्याचे निर्देश दिले होते. काही शाळांनी हे आदेश तातडीने लागू केले असले तरी, डबल शिफ्टमध्ये चालणाऱ्या शाळांना वेळेत बदल करणे शक्य झाले नाही. याचे कारण म्हणजे, सकाळची शिफ्ट उशिरा घेतल्यास दुपारच्या माध्यमिक वर्गांचा वेळ पुढे ढकलला जातो, त्यामुळे शाळा जुन्या वेळेनुसारच सुरू आहेत. सकाळच्या गारठ्यात विद्यार्थी थरथरत शाळेत जाताना दिसतात. अनेक पालकांनी चिंता व्यक्त केली असून विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतांना दिसून येत आहे.

दैनिक
महाभूमि

# वाशिम भूमि

शुक्रवार । १४ नोव्हेंबर २०२५

dainikmahabhoomi@gmail.com

## न्यूज ब्रीफ

### शिवा संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी घळे

**वाशिम :** शिवा अखिल भारतीय वीरशैव लिंगायत युवक संघटनेच्या वाशिम जिल्हाध्यक्षपदी सनगावचे माजी सरपंच सुरेशआप्पा घळे यांची निवड करण्यात आली. कपिलाधार येथे झालेल्या राज्यव्यापी मेळाव्यात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, भाजपाच्या महिला प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चना चाकुरकर, शिवा संघटनेचे संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष प्रा. मनोहरराव धोंडे, राष्ट्रीय उपाध्यक्ष अभयराव कल्लावार, राष्ट्रीय सरचिटणीस उमाकांत शेट्टे यांच्या उपस्थितीत त्यांना नयुक्तीपत्र देण्यात आले. या मेळाव्यात घळे यांना 'शिवा राष्ट्रीयभूषण उत्कृष्ट कार्यकर्ता' पुरस्काराने गौरविण्यात आले. संघटनेत ३० वर्षांपासून निष्ठावंत व सक्रिय असलेल्या घळे यांचा समाजात दांडगा संपर्क असून जिल्ह्यात संघटनेची ताकद वाढविण्यासाठी आजी-माजी पदाधिकारी व नवतरुणांना सोबत घेऊन काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

### मतदारयादी आता २४ नोव्हेंबरला

**वाशिम:** जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या तयारीत मतदान केंद्रनिहाय अंतिम मतदारयादी जाहीर करण्यास पुन्हा तिसऱ्यांदा मुदतवाढ देण्यात आली आहे. आता ही यादी २४ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार असून सतत बदलणाऱ्या तारखांमुळे इच्छुक उमेदवारांची चांगलीच तारांबळ उडत आहे. जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे ५२ गट, तर पंचायत समितीचे १०४ गण आहेत. गट-गणांचे पुनर्रचनेपासून ते आरक्षण ठरविण्यापर्यंतची प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रशासनाने प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली होती. या प्रारूप यादीवर आलेल्या आक्षेपांचे समाधान केल्यानंतर २७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी जाहीर करण्याची मूळ तारीख ठरविण्यात आली होती. नंतर ही तारीख १२ नोव्हेंबर नेमण्यात आली. मात्र, आता निवडणूक आयोगाने तिसरी वेळेची वाढ दिली आहे. तारीख बदलण्याचा हा क्रम सुरूच राहिल्याने इच्छुक उमेदवारांमध्ये संभ्रम आणि रणनीती आखण्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### चार नगरपरिषदांमध्ये वाढली निवडणुकीची धडपड

# उमेदवारी अर्जांचा वेग वाढला ; चौथ्या दिवशी २१ अर्ज दाखल

**वाशिम / प्रतिनिधी**



रिसोडमध्ये उद्धवसेनेकडून उमेदवारी अर्ज दाखल

जिल्ह्यातील पाच नगरपरिषदांच्या निवडणूक रणधुमाळीला उधाण येत असतानाच महायुती आणि महाविकास आघाडीतील जागावाटपाचे पेच अजूनही सुटत नसल्याने प्रमुख पक्षांकडून अधिकृत उमेदवारांची घोषणा होत नाही. मात्र, या धीम्या गतीच्या राजकारणाला छेद देत अपक्ष आणि काही पक्षनिष्ठांनी एबी फॉर्मची पर्वा न करता थेट मैदानात उतरण्याचा निर्णय घेतल्याने नामनिर्देशन अर्जांचा आकडा चौथ्या दिवशी अचानक उसळला आहे.

१३ नोव्हेंबर रोजी चौथ्या दिवशी तब्बल २१ नामनिर्देशनपत्रे दाखल झाली. यात रिसोड व वाशिम नगराध्यक्षपदासाठी प्रत्येकी एक अर्ज, तसेच नगरसेवकपदासाठी १९ अर्ज दाखल झाल्याची माहिती प्रशासनाने दिली. नामनिर्देशनपत्रांमध्ये वाशिममध्ये एकूण ११ अर्ज दाखल झाले. यात राजू धोंगडे यांनी नगराध्यक्षपदासाठी अर्ज सादर केला, तर उर्वरित १० अर्ज नगरसेवकपदासाठी प्राप्त झाले आहेत. रिसोडमध्ये ७ अर्ज दाखल झाले. यात १ नगराध्यक्षपदासाठी, तर ६ नगरसेवकपदासाठी अर्ज आहेत. विशेष म्हणजे, भारतीय जनता पक्षाकडून ३ नगरसेवकपदाचे अर्ज दाखल झाले. जिल्ह्यातील वाशिम, रिसोड, कारंजा, मंगरुळपीर आणि मालेगाव या पाच ठिकाणी निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. १० नोव्हेंबरपासून नामनिर्देशन सुरू झाले, परंतु पहिल्या तीन दिवसांत फक्त दोनच अर्ज दाखल झाले होते. तेही रिसोडमध्ये. त्यामुळे निवडणूक रंगण्यास वेळ लागेल, अशी हवा होती. तथापि, चौथ्या दिवशीच अर्जांनी जोरदार उडी घेताच निवडणुकीचा तापमान वाढले.

वाशिम, कारंजा आणि मंगरुळपीर नगरपरिषदांमध्ये उमेदवारांनी धावपळ वाढवली असून कार्यालयात फॉर्म भरण्यासाठी व चौकशीसाठी गर्दी पाहायला मिळत आहे. अपक्षांबरोबरच काही पक्षांतर्गत असंतुष्टही स्वतंत्रपणे अर्ज भरू पाहत असल्याचे संकेत मिळत आहेत. मात्र मालेगाव नगरपंचायत हा अपवाद ठरला आहे. सलग चौथ्या दिवशीही एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. स्थानिक राजकीय वातावरणातील अनिश्चितता आणि प्रमुख पक्षांकडून कोणत्याही उमेदवाराचे संकेत न मिळाल्यामुळे इच्छुकांनी प्रतीक्षेचा मार्ग स्वीकारल्याचे सांगितले जाते. दरम्यान, महायुती आणि महाविकास आघाडी दोन्ही बाजूंनी जागावाटप, मैत्रीपूर्ण लढत की स्वबळाचा नारा या तिन्ही पर्यायांभोवती बैठकींची मालिका सुरूच आहे. काही ठिकाणी आघाडी होण्याची शक्यता तर काही ठिकाणी थेट बहुकोनी लढत अनिवार्य ठरणार असल्याचे संकेत आहेत. त्यामुळे कार्यकर्ते व उमेदवार संभ्रमात आहेत.

#### रिसोडमध्ये उद्धवसेनेकडून उमेदवारी अर्ज

■ रिसोड नगरपरिषद निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाने आपल्या उमेदवाराची अधिकृत एन्ट्री नोंदवली आहे. सुधाकर काशीराव देशमुख यांनी १३ नोव्हेंबर रोजी नगराध्यक्षपदासाठी नामांकन दाखल केले. देशमुख यांच्या अर्जामुळे रिसोडच्या नगराध्यक्षपदाच्या रिंगणात स्पर्धा रंगण्याची चिन्हे स्पष्ट झाली असून, प्रतिस्पर्धी गटांत हालचालींना वेग आला आहे.

#### १३ नोव्हेंबर रोजी दाखल अर्ज

- रिसोड -७, १- नगराध्यक्ष, ६ - सदस्य
- वाशिम- ११, नगराध्यक्ष -१, सदस्य - १०
- मालेगाव - निरंक
- मंगरूळपीर- सदस्य -१, (अर्ज २)
- कारंजा- सदस्य -१



# चिया प्रशिक्षणाला शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**वाशिम / प्रतिनिधी**

कृषी विभाग आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. बाळासाहेब ठाकरे शेतकरी प्रशिक्षण भवन, वाशिम येथे रिसोड तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी चिया पिकावरील विशेष प्रशिक्षण कार्यक्रम बुधवारी पार पडला. 'उच्च मूल्य पिकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे आर्थिक सबलीकरण हेच आमचे ध्येय आहे. चिया पिकामुळे शाश्वत उत्पन्नाची नवी दिशा उपलब्ध होऊ शकते. चिया शेती हा फक्त पर्याय नसून आरोग्यदायी व नफ्याचा मार्ग आहे,' असे प्रतिपादन आत्मा प्रकल्प संचालक अनिसा महाबळे यांनी केले.

रिसोड तालुक्यातील चिया उत्पादक शेतकऱ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. प्रशिक्षणादरम्यान शेतकऱ्यांनी चिया शेतीतील प्रत्यक्ष अनुभव, उत्पादनातील बदल आणि विपणन क्षेत्रातील नव्या संधींबाबत विचार मांडले. महाबळे यांनी चिया पिकाची लागवड पद्धत, शेती तंत्रज्ञान, सेंद्रिय पद्धती, प्रक्रिया आणि विपणनातील संधी याबाबत सविस्तर माहिती दिली. चिया पिकांपासून तयार होणाऱ्या मूल्यवर्धित उत्पादनांविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे संचालन मंडळ कृषी अधिकारी रमेश जाधव यांनी केले. प्रशिक्षणादरम्यान काही शेतकऱ्यांनी चिया शेतीवरील कविता व गीतांद्वारे भावना व्यक्त करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका कृषी अधिकारी, रिसोड तसेच त्यांच्या टीमने पुढाकार घेतला. त्यांच्या समन्वयामुळे प्रशिक्षण प्रभावीपणे पार पडले.

# रिसोड येथे मतदान जनजागृती रॅली

**रिसोड / प्रतिनिधी**

आगामी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी १२ नोव्हेंबर रोजी रिसोड शहरात मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली.

रॅलीची सुरुवात नगर परिषद, रिसोड येथून झाली. एक मत, उज्ज्वल भविष्य, मतदान हा माझा हक्क, लोकशाही बळकट करूया,मतदान जरूर करूया अशा घोषणांनी शहर दुमदुमून गेले. ही रॅली निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी सतीश शेवदा यांच्या सहकार्याने पार पडली. या रॅलीमध्ये श्री. शिवाजी हायस्कूल, भारत माध्यमिक शाळा, तसेच डॉ. आल्लामा इकबाल उर्दू शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

विद्यार्थ्यांनी हातात फलक, बॅनर आणि मतदानाविषयी संदेश असलेली घोषवाक्ये घेत शहरभर जनजागृती केली. शिक्षकांनीही नागरिकांना मतदानाचे महत्त्व पटवून देत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमात स्वीप अभियानातील कर्मचारी रामेश्वर जायभाये, राजेंद्र पट्टेबहादूर, ममता नवघरे आणि सुषमा देशमुख यांनी विशेष योगदान दिले.

# वाशिममध्ये मानसिक आरोग्य जनजागृती रॅली

### अंधश्रद्धेवर नव्हे, उपचारावर विश्वास ठेवा: डॉ. अनिल कावरखे

**वाशिम / प्रतिनिधी**



'अंधश्रद्धेला बळी पडू नका, वेळेत मानसोपचार तज्ञांचा सल्ला घ्या. मानसिक आजार हा कलंक नसून वेळेत उपचार घेतल्यास तो पूर्णपणे बरा होऊ शकतो,' असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे यांनी केले.

जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त जिल्हा रुग्णालय वाशिम अंतर्गत जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रमाच्या वतीने जनजागृती रॅली काढण्यात आली. या प्रसंगी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पुरी, डॉ. राहुल डोंगरे, डॉ. प्रसाद शिंदे, डॉ. स्वप्निल करवंदे, डॉ. श्वेता मोरवाल, डॉ. अनिल डोखळे, डॉ. मंगेश भाग्यवंत, डॉ. अविनाश झरे, रेणुकादास मेड, स्नेहल महाल्ले, मनोज गावंडे, प्रियंका वलके, राहुल कसादे आदी उपस्थित होते. डॉ. कावरखे म्हणाले की, 'नैराश्य, ताणतणाव, व्यसनाधीनता किंवा अंधश्रद्धा यावर उपाय म्हणजे संवाद आणि सल्ला. भीती नव्हे, समजुतीची गरज आहे, जिल्ह्यातील सर्व ग्रामीण रुग्णालयांत मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध असून, नैराश्य आलेल्यांनी टोल फ्री क्रमांक १४४१६ वर संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

#### पथनाट्य सादर करून जनजागृती

■ रॅलीत शासकीय नर्सिंग कॉलेजचे विद्यार्थी आणि वैद्यकीय अधिकारी यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी शहरात अंधश्रद्धा, व्यसनाधीनता, नैराश्य आणि ताणतणाव व्यवस्थापन या विषयांवर पथनाट्य सादर करून जनजागृती केली. 'मन जिंका जीवन जिंका', 'व्यसनाला नाही म्हणा', आणि ''अंधश्रद्धा सोडा, विज्ञानाचा स्वीकार करा'' अशा घोषणांनी शहर दुमदुमले. रॅली बसस्थानक परिसरातून मार्गक्रमण करत जिल्हा क्रीडांगणात समारोप झाला.

#### व्यसनमुक्तीविषयी पोस्टर स्पर्धा

■ या दरम्यान तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाचे डॉ. आदित्य पांढारकर आणि राम सरकटे यांनी तंबाखू आणि व्यसनमुक्तीविषयी पोस्टर प्रदर्शन आयोजित केले.जनजागृतीसोबत नर्सिंग कॉलेज विद्यार्थ्यांसाठी पोस्टर स्पर्धा घेण्यात आली, ज्यात विजेत्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय पारितोषिके प्रदान करण्यात आली.

# वाहतूक नियम मोडणाऱ्यांवर हायटेक पहारा !

**वाशिम / प्रतिनिधी**



जिल्ह्यात वाहतूक शिस्त प्रस्थापित करण्यासाठी मोठे पाऊल उचलत जिल्हा पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या पुढाकाराने दोन अत्याधुनिक इंटरसेप्टर वाहने जिल्ह्यात दाखल झाली आहेत. यामुळे नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर आता अधिक काटेकोर देखरेख ठेवली जाणार आहे.

इंटरसेप्टरमधील ऑटोमॅटिक हाय-टेक कॅमेरे वेगमर्यादा तोडणे, विनाहेल्मेट किंवा ट्रिपल सीट दुचाकी चालवणे, सीटबेल्टविना कार प्रवास करणे यासारख्या उल्लंघनांची त्वरित नोंद करणार असून उल्लंघन करणाऱ्यांवर तत्काळ कारवाई होणार आहे. अतीवेग आणि बेफिकीर वाहनचालकांसाठी ही वाहनं 'मोबाईल सापळा' ठरणार आहेत. जिल्ह्यातील इंटरसेप्टर वाहने क्रमांक एमएच १२ डब्लूझेड ४८११ आणि एमएच १२ डब्लूझेड ५०९१ अशी असून, यापैकी एक वाहन महामार्ग पोलीस केंद्र अमानीला तर दुसरे वाहन जिल्हा पोलीस वाहतूक शाखेला देण्यात आले आहे. या हाय-टेक यंत्रणेमुळे आता वाशिम जिल्ह्यातील बेशिस्त वाहनचालकांवर कडक 'डिजिटल नजर' ठेवली जाणार असून वाहतूक शिस्तीत लक्षणीय सुधारणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गुरुवारी ही वाहने संबंधितांकडे सुपूर्द करण्यात आली.

# सोयाबीन आवक वाढली ; बाजार समिती चार दिवस बंद

**वाशिम / प्रतिनिधी**

बिजवाई सोयाबीनला मिळत असलेल्या उच्चांकी भावामुळे परजिल्ह्यातील शेतकरी मोठ्या प्रमाणावर वाशिम कृषी उत्पन्न बाजार समितीकडे धावत आहेत. याच पार्श्वभूमीवर बाजार समितीत सोयाबीनची तब्बल २८ हजार क्विंटल विक्रमी आवक नोंदली गेली. अत्याधिक आवकेमुळे मोजणीसाठी अतिरिक्त वेळ लागणार असल्याने बाजार समिती १७ नोव्हेंबर रोजी पर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला.

# निवडणुकीत मनुष्यबळ व ईव्हीएम व्यवस्थापनाला प्राधान्य

**मानोरा / प्रतिनिधी**



निवडणूक ही एक व्यापक प्रशासकीय प्रक्रिया असून, प्रत्येक घटकाची सुसूत्र अंमलबजावणी अत्यावश्यक आहे. सर्व नोडल अधिकाऱ्यांनी वेळेच्या चौकटीत समन्वय साधून नियोजन पूर्ण करावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

नगर परिषद, नगरपंचायत तसेच आगामी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी बुधवारी नोडल अधिकाऱ्यांची बैठक घेऊन निवडणूकपूर्व सर्व तयारींचा सविस्तर आढावा घेतला. या बैठकीस अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, अपर मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, आणि नगरपालिका प्रशासन सहआयुक्त बी. डी. बिक्कड यांची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत मनुष्यबळ व्यवस्थापन व रॅन्डमायझेशन, मतपत्रिका आणि पोस्टल बॅलेट छपाई, मतमोजणी प्रशिक्षण, तसेच एसएसटी, एफएसटी आणि व्हीएसटी यांच्या कार्यपद्धतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर निवडणूक साहित्याचे नियोजन, साठवण, वाहतूक आणि वितरण, तसेच मतदान जनजागृती उपक्रमांवरही विशेष भर देण्यात आला.

जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले, निवडणुकीत मनुष्यबळ व्यवस्थापन, साहित्य वितरण, वाहतूक नियोजन आणि ईव्हीएम व्यवस्थापन हा मुख्य गाभा आहे. प्रत्येक विभागाने नेमून दिलेली जबाबदारी वेळेत, अचूक आणि समन्वयाने पूर्ण करावी. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि शांततेत पार पडावी, यासाठी प्रशासन सर्वतोपरी सज्ज राहावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. बैठकीत उपस्थित नोडल अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील तयारीचा आढावा सादर.

### १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत अभियान

# कुष्ठरुग्ण शोधासाठी घरोघरी होणार सर्वेक्षण

**वाशिम / प्रतिनिधी**



कुष्ठरुग्णांचा शोध घेऊन त्यांना योग्य उपचार उपलब्ध करुन देण्यासाठी राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमातंर्गत वाशिम जिल्हयात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरुग्ण शोध अभियान राबविण्यात येणार आहे. आरोग्य विभागाने हे अभियान प्रभावीपणे राबवावे, अशी सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी केली.

कुष्ठरुग्णांच्या शोधासाठी आपल्या घरी येणाऱ्या पथकास नागरिकांनी अवश्य सहकार्य करण्याचे आवाहनही त्यांनी केले. जि.प.येथील क्रांतिसूर्य महात्मा फुले सभागृहात बुधवारी पार पडलेल्या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी चौहान बोलत होते. यावेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.पी.एस.ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अमोल काळे, माता व बालसंगोपन अधिकारी डॉ. महेश चाफे, डॉ. निरज शिंदे सहायक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) आदींची प्रमुख उपस्थिती होती. समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण शोधून त्यांना त्वरित औषधोपचार देणे, संसर्गाची साखळी खंडीत करुन होणारा प्रसार कमी करणे, नवीन कुष्ठरुग्णांमध्ये विकृतीचे प्रमाण कमी करणे, समाजात कुष्ठरोगाविषयी जनजागृती करणे आदी कुष्ठरुग्ण शोध अभियानाचे प्रमुख उद्देश आहेत. वाशिम जिल्हयात कुष्ठरुग्ण शोधासाठी टीम तयार करण्यात आल्या आहेत. त्यात प्रामुख्याने आशासेविका, अंगणवाडी सेविका यांचा समावेश असणार आहे. घरोघरी जाऊन या टीम सर्वेक्षण करणार आहे.असे डॉ.शिंदे यांनी सांगितले.

#### अभियान प्रभावीपणे राबवा : अर्पित चौहान

■ जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियान यशस्वी करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करावे. यासाठी जनजागृतीवर अधिक भर द्यावा. प्राधान्याने सोशल मिडियाचा वापर करावी. ग्रामसभेत अभियानाबाबत माहिती द्यावी. शाळांमध्ये प्रार्थनेच्या वेळेस विद्यार्थ्यांना माहिती द्यावी, जिल्ह्यात कुष्ठरुग्ण शोध अभियान प्रभावीपणे राबवावे असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी अर्पित चौहान यांनी दिले.

# तरुणाईच्या उत्साहाने उजळला युवा महोत्सव

**वाशिम / प्रतिनिधी**




तरुणाईच्या उत्साहाने आणि सांस्कृतिक विविधतेने नटलेला जिल्हास्तर युवा महोत्सव वाशिम मधील वाटाणे लॉन येथे ११ नोव्हेंबर रोजी उत्साहात पार पडला. यंदाचा महोत्सव 'विकसित भारत चॅलेंज ट्रॅक' या थीमवर आधारित होता.या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील, प्रा. डॉ. ओमप्रकाश झंवर, प्रा.सचिन खरात, प्रा.विजय भड, अनिल ढेंगे आणि राजेश घुगे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे यांनी केले. देशाला विकसित राष्ट्र बनविण्याची जबाबदारी युवकांच्या खांद्यावर असल्याचे प्रतिपादन अप्पर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांनी यावेळी केले.

समूह लोकनृत्यामध्ये आर. ए.कॉलेज, वाशिमने प्रथम क्रमांक पटाकविला द्वितीय सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम, तृतीय जिजामाता विद्यामंदिर, अनसिंग, लोकसंगीतात आर. ए. कॉलेज, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, कानडे इंटरनॅशनल स्कूलने अनुक्रमे प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळवला.

#### विविध स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव

■ विविध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना प्रमाणपत्र,शिल्ड आणि पारितोषिक देऊन गौरविण्यात आले असून ते आता विभागीय स्तरावर वाशिम जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. महोत्सवाला विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिक उपस्थित होते.

# हे असायलाच हवे!

आजच्या कॉर्पोरेट युगात कायमच अप टू डेट राहावं लागतं. नोकरी असो वा व्यवसाय, प्रेझेंटेबल दिसणं ही काळाजी गरज आहे. प्रत्येक वर्किंग वूमन आपल्या दिसण्याकडे लक्ष देतेच. ऑफिसला जाण्याआधी आपण स्वत:च्या तयारीवर तासभर तरी खर्च करतोच. फॅशन, हेअरस्टाइल, मेक-अप यासाठी खूप वेळ घालवला तरी ऑफिसला पोहचेपर्यंत सगळा अवतार होऊन जातो. बस, रिक्षाचा प्रवास असेल तर लूकची पुरती वाट लागते. अगदी स्वत:च्या गाडीनं ऑफिसला जायचं असेल तरीही मेकअप खराब होतोच. ऑफिसला जाऊन आवरावं म्हटलं तर क्लाएंट मिटिंग ठरलेली असते. प्रेझेंटेशनची जबाबदारी अंगावर पडते. अशा वेळी आवरायलाही वेळ मिळत नाही. त्यातच मेक-अपचं साहित्य आपल्याजवळ असतंच असं नाही. पण तुमच्या डेस्कवर किंवा पर्समध्ये काही मेक-अप प्रोडक्टस असणं गरजेचं असतं. यामुळे तुम्ही अगदी झटपट तयार होऊन बुद्धीमत्तेसोबतच व्यक्तिमत्वाचीही छाप पाडू शकता.



**पॉवर मेकअप**

* शाईन स्प्रे तुमच्या डेस्कवर असायलाच हवा. तुमचे केस व्यवस्थित विंचरलेले किंवा बांधलेले असले तरी त्यांना चमक आली तर तुमचं व्यक्तिमत्त्व अधिक खुलून दिसतं. मोठ्या असाईनमेंटसाठी किंवा मिटींगसाठी तुम्ही अगदी पटकन तयार होऊ शकता. केसांवर शाईन स्प्रे मारल्यास तुमचे निस्तेज केस चमकदार दिसू लागतील आणि नवा लूकही मिळेल.

* तुमचे केस तेलकट होत असतील तर ड्राय शँपू जवळ बाळगा. चिकट केसांवर ड्राय शँपू स्प्रे केल्यास केस चमकदार दिसतीलच पण त्यांचा चिकटपणा, तेलकटपणाही दूर होईल. ड्राय शँपूमुळे तुम्हाला आठवड्यातून दोन ते तीन वेळा केस धुवावेही लागणार नाहीत.

* चेहरा कितीही सुंदर असला तरी रूक्ष हातांमुळे तुमचं व्यक्तिमत्वं उठून दिसत नाही. हातांकडे प्रत्येकाचंच लक्ष जातं. प्रेझेंटेशन देताना सतत हातवारे करावे लागतात. अशा वेळी हातांचा रूक्षपणा नजरेत भरतो. हा रूक्षपणा क्षणात दूर करण्यासाठी हँड क्रिमची मदत होते. त्यामुळे एखादं सुगंधी हँड क्रीम सोबत असायला हवं.

* उन्हाळ्याच्या दिवसात घामाने रंगाचा बेरंग होतो. अशा वेळी दर्जेदार परफ्युमची एक बाटली जवळ ठेवा. मनगटावर परफ्युम मारल्यावर तुम्हाला ताजंतवानं वाटेल. या परफ्युमचा सुगंध तुमचा मूड फ्रेश करेल.

* मिटींगसाठी फक्त पाच मिनिटं असतील आणि चेहरा धुण्यासाठी वेळ नसेल तर हायड्रेटींग मिस्ट तुमच्या मदतीला येईल. हे मिस्ट चेहऱ्यावर स्प्रे केल्याने तुम्हाला फ्रेश लूक मिळेल. तुमच्या त्वचेचा ओलावा कायम राहिल. अगदी झटपट तयार होण्यासाठी हायड्रेटींग मिस्ट हा बेस्ट ऑप्शन आहे.

# अस्मिता

**कौटुंबिक जबाबदाऱ्या, मातृत्त्व तसंच इतर काही अडचणींमुळे महिलांना नोकरी सोडावी लागते. आपल्या करीअरला ब्रेक द्यावा लागतो. काही काळ थांबावं लागतं. मुलं मोठं झाल्यावर पुन्हा काहीतरी करावसं वाटू लागतं. पण नेमकं करायचं तरी काय, हा प्रश्न समोर उभा ठाकतो. सौंदर्या राजेश यांनी यासाठी पुढाकार घेतला. महिलावर्गाला नव्यानं आपलं करीअर सुरू करता यावं यासाठी त्या प्रयत्नशील राहिल्या. अवतारच्या माध्यमातून त्यांनी दहा हजारपेक्षा जास्त महिलांना नवी वाट दाखवली. त्यांच्या या अनोख्या उपक्रमाविषयी...**

## वाट दाखवणाऱ्या सौंदर्या

आपल्या देशात नोकरी करणाऱ्या महिलांचं प्रमाण बरंच कमी आहे. देशातील बऱ्याच महिला आपलं करीअर मध्येच सोडून देतात. कौटुंबिक अडचणी, मातृत्त्व तसंच इतर अनेक कारणांमुळे त्यांना नोकरी सोडावी लागते किंवा काही काळासाठी करीअरची गाडी थांबवावी लागते. डॉ. सौंदर्या राजेश करीअर मध्येच सोडलेल्या महिलांना नवी वाट शोधायला मदत करतात. केंद्रिय महिला आणि बालकल्याण विभागानं समाजात बदल घडवणाऱ्या १०० भारतीय महिलांची निवड केली होती. या यादीत सौंदर्या राजेश यांनाही स्थान मिळालं होतं. सौंदर्या यांनाही करीअर मध्येच थांबवावं लागलं. त्यानंतर त्यांनी उद्योगक्षेत्रात नशीब आजमावलं आणि आज त्यांच्या अवतारचे अनेक अवतार आहेत.

**मानिनी**

सौंदर्या यांचे वडिल फार्मसी क्षेत्रातील यशस्वी उद्योजक. पण सौंदर्या यांना कधीही उद्योजक व्हायचं नव्हतं. म्हणून त्यांनी इंग्रजी साहित्यात पदवी मिळवली. मात्र वडिलांना सौंदर्या यांच्यातील उद्योजिका खुणावत होती. म्हणून त्यांनी मुलीला एमबीए करण्याचा सल्ला दिला. तिथेच त्यांना आयुष्याचा जोडीदार भेटला. या दोघांनीही सिटी बँकेत नोकरी पत्करली. पहिल्या मुलाच्या जन्मानंतर सौंदर्या यांना नोकरी सोडावी लागली. १९९३ ते १९९६ अशी तीन वर्षं त्यांनी करीअरमधून ब्रेक घेतला. त्यानंतर शहरातील एका महाविद्यालयात त्या पाहुण्या प्राध्यापक म्हणून मॅनेजमेंटचे धडे देऊ लागल्या. कॉर्पोरेट क्षेत्रासाठीही त्यांनी काही प्रकल्प केले. पण कामाच्या ठिकाणी त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला. नव्यानं करीअर सुरू करताना अनेक अडचणी आल्या. मग २००० मध्ये त्यांनी उद्योगक्षेत्रात नशीब आजमावण्याचा निर्णय घेतला. फक्त गरज म्हणून त्यांनी ही वाट निवडली. मित्र उमाशंकरसोबत त्यांनी एचआर क्षेत्रातली कंपनी काढायचं ठरवल. 'अवतार' हे हटके नाव त्यांनी आपल्या कंपनीला दिलं.

पुढच्या काळात अवतारचे एकूण तीन विभाग कार्यरत झाले. २००८ मध्ये त्यांनी 'अवतार ह्युमन कॅपिटल ट्रस्ट'ची स्थापना केली. तर २०११ मध्ये 'अवतार फ्लेक्सी करीअर इंडिया'ला सुरूवात झाली. २००५ मध्ये महिलांसाठी 'सेकंड करीअर प्रोग्राम'चं आयोजन करण्यात आलं. www.avtariwin.com या पोर्टलची निर्मिती करण्यात आली. आजघडीला या पोर्टलवर ४२ हजार महिलांनी नोंदणी केलीय. करीअरची नवी सुरूवात करण्याची इच्छा असलेल्या महिलांना मदत करणं हा यामागचा मुख्य उद्देश होता.



भारतात कॉर्पोरेट क्षेत्रात करीअरची नव्यानं सुरूवात करणं कठीण असल्याचं सौंदर्या यांना जाणवलं. कॉर्पोरेट क्षेत्राला समजावण्याचं मोठं आव्हान त्यांच्यापुढे होतं. हे आव्हान त्यांनी पेललं. 'अवतार आयविन' च्या माध्यमातून दहा हजारपेक्षा जास्त महिलांना करीअरची नवी वाट गवसली आहे. सौंदर्या यांच्या प्रयत्नांनी अनेकींनी नव्यानं आयुष्याला सुरूवात केलीय. महिलांना त्यांचं करीअर पुन्हा सुरू करण्याची संधी देण्याचे सौंदर्या यांचे प्रयत्न निश्चित कौतुकास्पद आहेत.

# लिपस्टिकची खरेदी

प्रसाधनांच्या यादीत लिपस्टिकला वरचं स्थान असतं. लिपस्टिकशिवाय मेक अप पूर्ण होत नाही. बाजारात लिपस्टिकचे अनेकविध प्रकार मिळतात. मॅट, ग्लॉसी, शायनी, लिक्विड आदींच्या भाऊगर्दीतून परफेक्ट शेड निवडताना बराच गोंधळ उडतो. आपल्या चेहऱ्याला, रंगाला साजेशी लिपस्टिक हवी. सौंदर्य खुलवणाऱ्या या प्रसाधनाची निवड कशी करायची? पाहू या.

* आपली नेमकी गरज ओळखा. क्रीम, मॅट, फ्रॉस्ट फिनिश, शिमर असे लिपस्टिकचे प्रकार बाजारात मिळतात. यापैकी कोणती लिपस्टिक निवडायची हे आधी ठरवा.

* लिपस्टिक निवडताना ओठांची रचना आणि त्वचेचा रंग या महत्त्वाच्या बाबी लक्षात घ्या. लिपस्टिकचा रंग ओठांवर प्रभाव टाकतो. डीप शेडमुळे ओठ मोठे दिसतात तर ब्राईट शेडमुळे लहान वाटतात.

* विविध प्रकारच्या आणि रंगांच्या लिपस्टिक्सची तुलना करुन पहा. इंटरनेटवर त्याविषयीच्या प्रतिक्रिया वाचा. दुकानात जाण्याआधी थोडा अभ्यास करा. ब्रँड्सबद्दल जाणून घ्या.

* आपल्याला प्रत्येक शेड शोभून दिसतेच असं नाही. त्यामुळे खरेदी करण्याआधी लिपस्टिक ट्राय करून बघा.

**स्मार्ट शॉपिंग**

* तुम्हाला टेस्टर्स दाखवले जातात. ते ओठांवर लावू नका. यामुळे जंतूसंसर्ग होऊ शकतो.

* लिपस्टिकचं आयुष्य तीन वर्षांपर्यंत असतं. त्यामुळे एक्सपायरी डेट तपासून मगच खरेदी करा.

* बजेट ठरवून घ्या. बाजारात महागड्या लिपस्टिक्सही मिळतात. तुमच्या बजेटमध्ये बसणारं, चांगल्या ब्रँडचं उत्पादन विकत घ्या.

* न्यूड शेड्च्या लिपस्टिक्स ऑनलाईन खरेदी करू नका. त्यातले घटक तपासून घ्या. पेराबेन्सयुक्त उत्पादन घेऊ नका.




# तिचा स्वीकार कर

मी पंधरा वर्षीय मुलीची आई असून तिच्या बदलत्या वागणुकीमुळे चिंताग्रस्त आहे. या वयात मुलींच्या शरीरात अनेक बदल होत असतात. भावविश्वात घडणारी अनेक स्थित्यंतरं वागणुकीतून दिसत असतात. या अवस्थेतून गेल्यामुळे मी हे सर्व जाणते. पण माझी मुलगी त्यातली नाही असं वाटतंय. तिला मुलांविषयी नाही तर मुलींविषयीच आकर्षण वाटतंय. त्यातल्या त्यात ती एका मैत्रिणीच्या जास्त जवळ असल्याचं मला जाणवू लागतंय. एखाद्या दिवशी तिची भेट झाली नाही तर ती चिडचिड करते. तिच्या फोनची वाट पहाते. ही लक्षणं दिसू लागल्याने मी चिंतेत आहे. तिच्याशी या बाबत कसं बोलावं हा प्रश्न आहे. काय करु?

– तुझी समस्या खरोखरच अत्यंत नाजूक आहे. अशा स्थितीत मुलीची काळजी लागून राहणं स्वाभाविक आहे. पण फार विचार करु नकोस. याबाबत समुपदेशकाची मदत घेणं अथवा डॉक्टरांकडून तिची तपासणी करून घेणं हे सर्वात उत्तम पर्याय आहेत. कदाचित तू विचार करतेस तसं काहीही नसेल. त्या मैत्रिणीचा सहवास हा तिचा कम्फर्ट झोन असेल. त्यामुळे लगेचच कोणत्याही निष्कर्षाप्रत पोहोचू नकोस.



**समपदेशन**

तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाने यावर निश्चित उपाय सापडेल. पण शेवटी निसर्गाचा मान्य करण्यातच शहाणपणा असतो हेदेखील लक्षात ठेव. आहे तसा तिचा स्वीकार करायचा आहे ही खुणगाठ पक्की बांधून ठेव.

# धोकादायक प्रोसेस्ड फूड

प्रोसेस्ड फूड हा आजचा परवलीचा शब्द झाला आहे. थकूनभागून घरी आल्यावर या तयार, चटपटीत अन्नाचा मोठा आधार असतो. आठवड्यातून बऱ्याच वेळा या पॅकबंद अन्नाचा आस्वाद घेतला जातो. मात्र प्रोसेस्ड फूडचा अतिरेकी वापर अनारोग्यास कारक ठरतो हे विसरता कामा नये.



**लक्षात घ्या**

* प्रोसेस्ड फूड पचनशक्तीवर विपरीत परिणाम करतं. पचनप्रक्रिया बाधित होण्यास या अन्नाचा मोठा सहभाग असतो.

* प्रोसेस्ड फूड्मुळे हाडांसंबंधी अनेक समस्या उद्भवतात. यामुळे किडनी खराब होण्याचा धोकाही बळावतो.

* प्रोसेस्ड फूड्मध्ये व्हिटॅमिन्स, प्रोटिन आणि फायबरची कमतरता असते. त्यामुळेच या अन्नामुळे शरीराला आवश्यक ती उर्जा मिळत नाही. उर्जेचा पुरवठा कमी राहिल्यानं शरीर कमकुवत होतं.

* प्रोसेस्ड फूड्च्या अतिरेकी सेवनाचा विपरित परिणाम प्रजनन शक्तीवरदेखील पहायला मिळतो.

* या अन्नाचं सेवन होत राहिलं तर कर्करोग, मधुमेह यांचा धोका वाढतो. या सवयीमुळे इन्शुलिनची मात्रा घटत असल्यामुळे टाईप-२ डायबेटिस होण्याची शक्यता बळावते.

* प्रोसेस्ड फूड्मध्ये फ्रक्टोज कॉर्न सिरपचा समावेश असल्यामुळे पोटासंबंधी काही गंभीर समस्या निर्माण होतात. या अन्नाची ॲलर्जीदेखील असू शकते. अशा वेळी त्वचेचा रंग बदलणं, त्वचेवर लालसर चट्टे उठणं, त्वचा खाजणं, रक्ताळणं आदी लक्षणं पहायला मिळतात.

* प्रोसेस्ड फूड्मध्ये कृत्रिम रंगांचा वापर केलेला असतो. पदार्थ दीर्घकाळ टिकावा म्हणून आरोग्यास हानिकारक अशा रसायनांचा वापर असतो. परिणामस्वरूप या अन्नाच्या सेवनामुळे अस्थम्याचा धोका वाढतो. शरीरात उष्णतेचा भडका झाल्याची जाणीव होणं, बेचैनी जाणवणं, श्वास घेण्यास त्रास होणं आदी घातक दुष्परिणाम बघायला मिळतात. म्हणूनच प्रोसेस्ड फूड्चं प्रमाण अतिशय मर्यादित असावं.

# सुगरणीचा सल्ला



लसणामुळे काही पदार्थांची लज्जत वाढते. पण लसूण सोलणं हे वेळखाऊ काम असतं. भरमसाठ लसूण सोलणं जीवावर येतं. अशा वेळी लसणाच्या पाकळ्या थोड्या गरम केल्या तर झटपट सालं निघतील.

* पाहुण्यांसाठी छोले करायचा बेत आखल्यानंतर रात्री ते भिजवायचे राहून गेले असतील तर काळजी करू नका. पाणी उकळून त्यात काबुली चणे भिजत घाला. काही वेळातच छान फुगल्यासारखे दिसतील.

* थंडीत दही लावताना नाकी नऊ येतं. थंड वातावरणामुळे दही लवकर विरजत नाही. अशा वेळी दूध थोडं गरम करून त्यात चमचाभर दही घाला. पातेल्यावर झाकण ठेऊन ते कुकरमध्ये ठेवा आणि कुकरचं झाकण लावून घ्या. या उपायाने दही चांगल्या प्रकारे लागेल.

* प्रत्येक फळ किंवा भाजी फ्रीजमध्ये ठेवण्याची गरज नसते. सफरचंद, केळी, संत्री शक्यतो फ्रिजमध्ये ठेऊ नका.



**किचन टिप्स**

थंडीत फ्रिजचा वापर मर्यादित ठेवा. फ्रिजमध्ये ठेवल्याने पदार्थांची चव बिघडते.

* दूध गरम करताना पातेल्यावर लाकडी चमचा ठेवल्याने ते उतू जाणार नाही.

* देठ तोडून फ्रिजमध्ये ठेवल्याने हिरव्या मिरच्या जास्त वेळ ताज्या राहतात.

* पारदर्शक बर्फ हवा असेल तर पाणी उकळून, थंड करून नंतर ट्रेमध्ये भरा.

* पालेभाज्या धुवून चिरल्याने त्यातले पौष्टिक घटक टिकून राहतात.

* नरम आणि फुगलेल्या पुऱ्यांसाठी कणीक दुधात मळा.

# सिमला मिरचीचा हलवा

हलवा म्हटलं की नजरेसमोर गाजर किंवा भोपळ्यापासून बनवलेली लज्जतदार डिश डोळ्यासमोर येते. हे नाव काढलं तरी तोंडाला पाणी सुटतं. बेसन, मूग डाळ अथवा कणकेचा हलवाही असतो. पण तुम्ही कधी सिमला मिरचीच्या हलव्याबद्दल ऐकलं आहे का? हो, सिमला मिरचीपासून हलवा बनवला जातो. झारखंडमध्ये हा पदार्थ खूपच लोकप्रिय आहे. थंडीच्या दिवसात सिमला मिरचीचा गरमागरम हलवा नक्कीच मजा आणेल. चला तर मग, या हलव्याची रेसिपी जाणून घेऊ या.



**साहित्य :** एक मोठी सिमला मिरची, एक चमचा तूप, २ कप दूध, ३ ते ४ वेलदोडे, ८-१० बेदाणे, थोडे बदाम आणि आक्रोड, एक वाटी किंवा चवीनुसार साखर इत्यादी.

**रसगंधा**

**कृती:** प्रथम सिमला मिरचीच्या बिया काढून बारीक तुकडे करून पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. मिरचीतलं पाणी निथळू द्या. आता कढईत तूप घालून त्यात बेदाणे आणि वेलची पूड चांगली परतून घ्या. त्यात चिरलेली सिमला मिरची घालून ४ ते ५ मिनिटं शिजवून घ्या. साखर घालून हलवून घ्या. आता दूध घालून ते आटेपर्यंत शिजू द्या. गार झाल्यानंतर वरून थोडी वेलची पूड भुरभुरा. बदाम आणि आक्रोडने डिश सजवा. गरमागरम खायला द्या. गोडाचा वेगळा पदार्थ म्हणून सिमला मिरचीचा हलवा करता येईल. हलव्याची ही वेगळी चव सगळ्यांना आवडेल.

**लिप केअर**

## ओठ फुटू नये म्हणून...

थंडीत वारंवार ओठ फुटत असतील तर रात्री झोपण्याआधी ओठांवर मध आणि ग्लिसरीनचं मिश्रण लावा. ओठांवर दहा मिनिटं साय लावून ठेवा. नंतर कोमट पाण्याने किंवा कापसाने पुसून टाका. ओठ छान मुलायम राहतील. खोबरेल तेल लावल्यानेही ओठांचा ओलावा टिकून राहतो. व्हॅसलिनमध्ये ऑलिव्ह ऑईल मिसळून ओठांवर लावा. रात्री झोपण्याआधी बेंबीत मोहरीचं तेल घातल्यानेही ओठांचा कोरडेपणा दूर होतो.




**हेअर केअर**



## घरगुती हेअर मास्क

केसांच्या झटपट वाढीसाठी नैसर्गिक हेअर मास्क लावा. घरच्या घरी मास्क बनवण्यासाठी कोरफडीचा गर, खोबरेल तेल, ऑलिव्ह ऑईल, एरंडेल तेल, बदामाचं तेल आणि ई जीवनसत्त्वाची कॅप्सूल घ्या. याच्या मिश्रणाने डोक्याला मसाज करा. चांगला परिणाम दिसेल. एक चमचा तेल घ्या. त्यात कॅप्सूलमधलं ई व्हिटॅमिन घाला. या मिश्रणाने केसांना मसाज करा. रात्रभर राहू द्या. सकाळी सौम्य शँपूने केस धुवा. आठवड्यातून एकदा हा प्रयोग केल्यानेही केस लवकर वाढतील.

**लाईफस्टाईल**

## हेल्दी डिटॉक्स ड्रिंक्स

लग्नाआधी मुलींना वजन कमी करायचं असतं. फिगर परफेक्ट हवी असते. यासाठी क्रॅश डाएटसारखे प्रयोग केले जातात. काही डिटॉक्स ड्रिंकमुळे तुमचं वजन कमी होऊशकतं. लिंबू आणि पुदिन्याच्या रसामुळे रोगप्रतिकारक शक्ती सुधारते. पचनक्रिया सुधारते. सफरचंद आणि दालचिनीमिश्रित पाण्यामुळे वजन आणि कोलेस्टेरॉल कमी होतं. ग्रीन टी च्या नियमित सेवनाचे अनेक लाभ आहेत. वजन नियंत्रणात राहतं. शिवाय ताजंतवानं वाटतं.



# इंडो-वेस्टर्न लूक मिळवण्यासाठी...



स्टाईल आणि कम्फर्टसाठी जीन्सला प्राधान्य दिलं जातं. जीन्सवर शर्ट, टी-शर्ट किंवा कुर्ता घातला की फॉर्मल, कॅज्युअल आणि एथनिक लूक मिळतो. म्हणूनच जीन्स हा 'ऑल टाईम फेवरिट' ऑप्शन आहे. इंडो-वेस्टर्न लूक मिळवण्यासाठी जीन्सवर पारंपरिक कुर्ती घालता येईल. सध्या बॉलिवूड सेलेब्जही हा लूक कॅरी करताना दिसतात. सारा अली खानने 'केदारनाथ'च्या प्रमोशनच्या वेळी रिप्ड जीन्सवर पिवळ्या-लाल रंगाची काठिया वर्कवाली कुर्ती आणि पंजाबी स्टाईल मोजडी घातली होती. तिचा हा लूक चांगलाच भाव खाऊन गेला. सोनम कपूरने प्लेन कुर्तीवर डेनिम कॅरी केली होती. फॅशनिस्टा सोनम यात खूप छान दिसत होती. कॅज्युअल ऑकेजनला तुम्हीही असा पेहराव करू शकता. कुर्ती आणि जीन्सचं कॉम्बिनेशन करून हटके लूक मिळवू शकता.

लाँग कुर्ता आणि जीन्स हा लूकही बेस्ट! सध्या डेनिमच्या जेगिंग्ज मिळतात. त्यावर कुर्ता घालता येईल. जीन्सवर कोणत्याही रंगाचे कुर्ते शोभून दिसत असल्याने मॅचिंग लेगिंग शोधण्याचा त्रास वाचतो. पायघोळ फ्लोरल कुर्तीचा ऑप्शनही आहे. दीपिका पदुकोणने हा लूक कॅरी केला होता. कुर्तीवर ट्रेंडी लाँग नेकलेस घालू शकता.

**फॅशन पॅशन**



सिंपल कुर्तीवर लांब कानातली घालता येतील. थंडीचा अंदाज घेता कुर्ती आणि जीन्सवर बूट घालता येतील. वेगवेगळ्या स्टाईलच्या, प्रकारच्या कुर्ती बाजारात उपलब्ध आहेत. तर सखींनो, आवडत्या कुर्ती जीन्ससोबत कॅरी करा आणि व्यक्तिमत्त्वाला आगळी झळाळी द्या.